नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड



# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

-: व्याख्याते :-

व मयेकर —०— पद्मभूषण धनंजय कीर

१२ मार्च १९७६

923.60954
NAG
G04276

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04276
DATE: 8/6/2015

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

वर्ष चौथे १९७६.

Y.C.P. LIBRARY
923.60954/NAG
G04276

किमत पांच रुपये

प्रकाशन :

डॉ. भालचंद्र फडके,
मराठी विभाग, प्रमुख
पुणे विद्यापीठ, पुणे.
यांच्या शुभहस्ते
१२ मार्च १९७८

काशक :
ी. पी. डी. पाटील,
ध्यक्ष,
राड नगरपालिका, कराड

मुद्रक :
श्री साईनाथ प्रिंटिंग प्रेस,
१८७, गुरुवार पेठ,
कराड

**मुखपृष्ठ छपाई व रचना :** व्हिज्युअल डिझाईन रिसर्च युनीट, कोल्हापूर.



मा. यशवंतराव चव्हाण

# मनोगत

'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' ही १९७३ साली सुरु झाली. १९७६ सालातील यशवंतरावांच्या वाढदिवशी ज्या थोर विचारवंतांची व्याख्याने झाली, त्याची ही मुद्रित प्रत वाचकांच्या हाती देतांना मनाला एक समाधान जाणवते.

साहित्य, सौंदर्य, संगीत, क्रीडा, करमणूक या समाज-जीवनाला सामर्थ्य देणाऱ्या गोष्टी आहेत. शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने कराड नगरपालिकेने या संदर्भात कराडची एक वैशिष्ठ्यपूर्ण अभिरुची निर्माण केली आहे.

कराडचे सुपुत्र यशवंतरावजी चव्हाण यांच्या स्वरुपात दिसणारे नेत्रदीपक प्रज्ञाप्रचीतीचे राजकीय आणि सामाजिक व्यक्तिमत्त्व कलेकलेने साकारत गेले; त्याचा विचार नि उच्चार समाज परिवर्तनाला उपकारक ठरेल या भावनेने त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' स्वतंत्रपणे आयोजित करण्यांत निश्चित औचित्य आहे!

आमच्या भारतीय समाजाच्या नि राष्ट्रीय जीवनाच्या समस्या, आव्हानाचे स्वरुप घेऊन आपल्या पुढे उभ्या ठाकल्या आहेत; त्या सामाजिक राजकीय, आर्थिक समस्यांचा अभ्यासपूर्ण उहापोह, अधिकारी व्यक्तिच्या आयोजित व्याख्यानांतून व्हावा, हाच प्रधान हेतू या व्याख्यानमालेचा आहे!!

आमच्या निमंत्रणाला मान देऊन प्राचार्य गोपाळराव मयेकर, देवगड आणि प्रसिद्ध चरित्रकार पद्मभूषण

धनंजय कीर, मुंबई या थोर विचारवंतांनी या मालेत व्याख्याने दिली, त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे आमचे कर्तव्य आहे.

त्या विचारवंतांच्या शद्बांचे हे 'अक्षर' स्वरुप प्रकट होताना प्रा. वि. पु. गोखले यांनी परिश्रम घेतले आहेत. तसेच व्याख्याने अक्षरबद्ध करून घेण्यासाठी ती ध्वनिमुद्रित करून घेणे आवश्यक असते. गेली दोन वर्षे याबाबत श्री. वसंतराव श्रोत्री यांचे हार्दिक सहाय्य झाले. म्हणून या दोघांचे आभार मानण्यांत आपलेपणाचा आनंदही मांठलेला आहे

व्हिज्युअल डिझाईन रिसर्च युनीट, कोल्हापूरचे डिझाईन आर्टिस्ट भूपाल मांगोरे यांनी सदर पुस्तिकेचे अंतरंग व बाह्यांग आकर्षित व मनोवेधक करणेसाठी जे परिश्रम घेतले; तसेचश्री साईनाथ प्रिटींग प्रेसचे व्यवस्थापक नि कामगार यांनी ही पुस्तिका वेळेवर व सुबक छापून दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

या व्याख्यानमालेत जे जे विचारमंथन, चिंतन होईल ते ते त्याच विचारवंतांच्या भाषेत 'अक्षर' करण्याच्या हेतूने प्रतिवर्षी व्याख्यानांची पुस्तिका प्रसिद्ध केली जावी हा ही हेतू आहे. ही पुस्तिका समाज पुरुषाच्या हाती देतांना एकच प्रार्थना –

मा. यशवंतरावजीना राष्ट्रसेवेसाठी उदंड आयुरारोग्य लाभो! त्यांच्या जीवनाचा आदर्श नव्या पिढीला जीवनाची विधायक दृष्टी देणारा ठरो!

कराड — पी. डी. पाटील

दिनांक १२ मार्च १९७८ — नगराध्यक्ष

# ' अंतरंग '

---

११ व १२ मार्च १९७६.

" भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग "

**श्री. गोपाळराव मयेकर**

माजी शिक्षण मंत्री, गोवा

व प्राचार्य,

देवगड कॉलेज, देवगड.

---

२९ मार्च १९७६.

" राजर्षी शाहू छत्रपती आणि नवभारताची मागणी "

प्रसिद्ध चरित्रकार

**पद्मभूषण धनंजय कीर**

मुंबई.

---



# "भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग"

प्राचार्य गोपाळराव मयेकर

## सामाजिक परिवर्तनाच्या प्रयोगाची जिद्द

भारत स्वतंत्र झाल्यानंतर या देशाचे निश्चित स्वरूप काय असेल या बद्दलच्या संकल्पनेचे स्पष्ट चित्र भारताच्या राज्यघटनेत उमटलेले दिसते. या ठिकाणी लोकशाही राज्य असेल, मानवतावादावरती आधारलेली समाजरचना असेल आणि धर्मनिरपेक्ष, सर्वसमावेशक विचार त्यात असेल. दारिद्र्य आणि अज्ञानाच्या गर्तेत रुतून पडलेल्या दुबळ्या समाजाला वर काढण्याचा आजही प्रयत्न असेल.

तथापि आपल्या जीवनामध्ये आढळणारे अनेक प्रकारचे विरोधाभास हेच आपल्या प्रगतीच्या मार्गातील धोंडे आहेत त्यामुळे स्वसंस्कृतीचा श्रेष्ठ वारसा असूनही आणि पाश्चात संस्कृतीकडून नवी मूल्ये लाभूनही व्हावी तेवढी प्रगती झाली नाही. कारण मानसिक क्रांती झाल्याशिवाय या राजकीय, सामाजिक, आर्थिक परिवर्तनाला खरा अर्थ प्राप्तच होणार नाही. असे असूनही भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा प्रयोग यशस्वी करण्याची भारताची जिद्द आहे, आणि त्यामुळेच या प्रयोगातून काय निष्पन्न होणार याच्याकडे सगळ्या जगाचे लक्ष लागलेले आहे. या भाग्याचे श्रेय या देशाची राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक उभारणी ज्यांनी ज्यांनी केली त्या नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वांना, त्यांच्या सांस्कृतिक अधिष्ठानाला आहे.

## प्राचार्य गोपाळराव मयेकर

जन्म : १९३४ मुंबई येथे.

शिक्षण : एम. ए. (मराठी व संस्कृत) एल्फिस्टन कॉलेज, मुंबई येथे प्रतिकुल परिस्थितीमध्ये शिक्षण पूर्ण.

१९६२ पासून पणजी (गोवा) येथील धेंपे महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सुरवात. अध्यापन क्षेत्रात १५ वर्षांचा अनुभव.

राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक चळवळीत नेहमीच भाग; त्यामुळे निरनिराळ्या संस्थांशी संबंध यातूनच राजकीय कर्तृत्वाला वाव मिळाला.

१९६७ नंतरच्या गोवा मंत्रीमंडळात समावेश (म्हापसा मतदार संघातून निवड) शिक्षण, आरोग्य, बांधकाम, माहिती आणि पर्यटन अशा पांच खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून अनुभव. गोव्यातील महत्त्वाचे प्रकल्प उभारण्याची संधी या काळातच लाभली.

१९७० मध्ये मंत्रीपदाचा त्याग.

अनेक शिक्षण संस्था, साहित्य व सामाजिक संस्था मधून वेगवेगळ्या पदावर काम करण्याचा अनुभव, साहित्य, शिक्षण, नाट्य, संगीत इत्यादि कलेची आवड, विविध संस्थांच्या विद्यमाने होणाऱ्या व्याख्यानमालातून अनेक विषयांवर व्याख्याने झाली.


थोडेसे कथा व कविता लेखन.

गोमंतक मराठी शिक्षण परिषदेचे संस्थापक सदस्य; भंडारी एज्युकेशन सोसायटी, मालवण या संस्थेचे उपाध्यक्ष.

मराठी नाट्य परिषदेवर उपाध्यक्ष म्हणून १९६८–६९ साली काम केले.

सध्या देवगड कॉलेज, देवगड येथे प्राचार्य म्हणून काम पाहतात.

मुंबई विद्यापीठाच्या ॲकॅडमिक कौन्सिलचे सदस्य.



कराड नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री. पी. डी. पाटील आणि या ठिकाणी उपस्थित असलेल्या प्रिय बंधू भगिनींनो, आज यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेच्या निमित्ताने पहिल्यांदाच कराडला येत आहे.

नुकत्याच होऊन गेलेल्या साहित्य संमेलनाला येण्याची संधी लाभली नव्हती. आणि त्यामुळे मन थोडसं खट्टू झालेलं. एका सुंदर अशा साहित्य सोहळ्याला आपण मुकलो त्याहीपेक्षा यशवंतराव चव्हाणांचं, दुर्गाबाई भागवतांच, आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचं अशी तिघांची विचारपरिपूर्ण भाषणे प्रत्यक्ष ऐकायची संधी मिळाली नाही. याची चुटपूट मनाला लागलेली होती. त्याच कराडमध्ये इतक्या अल्पावधीच्या काळामध्ये आपल्याला भाषण करायला यावे लागेल असे मला वाटले नव्हते. परंतु अचानक आमंत्रण येऊन ठेपले आणि ते नाकारणं तर अशक्य होतं. अडचणीच्या परिस्थितीत असूनही मी कराडच्या वेगळ्या आकर्षणाने ते आमंत्रण स्वीकारले. परंतु ते आमंत्रण स्वीकारीत असताना दोन महत्त्वाच्या गोष्टी मनात होत्या. एक गोष्ट मनामध्ये होती ती ही की यशवंतराव चव्हाणांसारख्या देशाला वैचारिक नेतृत्व देणाऱ्या एका श्रेष्ठ व्यक्तीच्या नावाने ही मालिका गुंफली जात आहे आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट होती ती ही की यशवंतरावांसारखं श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व असणाऱ्या माणसाच्या नावानं गुंफलेली गेलेली ही व्याख्यानमाला केवळ शोभेची व्याख्यानमाला नसून जीवनाच्या प्रचलित प्रश्नासंबंधीचे, जे गंभीर विषय असतील त्या विषयांचे संदर्भ लक्षात घेऊन त्या संबंधी गुंफली जाणारी असल्यामुळे मला येथे अगत्याने यावंसं वाटलं.
मी स्वतः जरी शिक्षण क्षेत्रामध्ये काम करीत असलो तरी माझं

आजवरचं जीवन हे समाजाच्या अगदी खालच्या स्तरामध्ये प्रारंभापासून आतापर्यंत व्यतीत झालेले आहे. त्यामुळे, त्या समाजाच्या उत्कर्षासंबंधानं ज्या विचाराचे चिंतन माझ्या मनात सतत चालू असते त्याचं परिशीलन करण्याचा, ते मांडण्याचा आनंद माझ्या मनाला होत आहे. यशवंतराव चव्हाणांशी माझे संबंध हे अत्यंत स्नेहाचे आहेत. एक विचारवंत मार्गदर्शक म्हणून अनेक वेळा अनेक विषयांवरती त्यांच्याशी बोलण्याचा, त्यांचेकडून मार्गदर्शन घेण्याचा प्रसंग माझ्यावर अनेक वेळेला आलेला आहे. जीवनाचं वैचारिक अधिष्ठान मानणारी व ते निर्माण करणारी जी थोडीथोडकी माणसं आहेत त्यांत यशवंतरावांचे स्थान फार वरचं आहे. त्यांच्या विचारशील व्यक्तिमत्त्वाच्या आकर्षणाने या व्याख्यानमालेमध्ये त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मी सहभागी होत आहे. उद्या त्यांचा वाढदिवस ! त्या संदर्भात आजच मला त्यांचा एक विशेष आवर्जून उल्लेख करावासा वाटतो तो अनेक वेळा संभ्रमित झाल्यानंतर आता नेमकं काय करावं अशी जी प्रत्येक माणसाची अर्जुनासारखी स्थिती होते त्या वेळी मार्गदर्शन देणारं कुणी तरी लागतं. " किम् कर्म किम् कर्मेति कवयोप्यत्र मोहिता : । " काय करावं व काय करू नये या संबंधीचा संभ्रम माणसाच्या मनामध्ये निर्माण झाला, की त्याला विचारांची स्फूर्ती देणारा आणि नव्या कार्याची दिशा दाखविणारा असा द्रष्टा माणूस माणसाला हवा असतो. सांगायला आनंद वाटतो की माझ्या राजकीय तसेच सामाजिक जीवनामध्ये ज्या ज्या वेळेला मला असा प्रश्न पडला त्या वेळेला जी फारच थोडी माणसं मला मार्गदर्शनासाठी मिळाली त्या मध्ये मा. यशवंतराव एक आहेत. याचा उल्लेख मी केवळ या ठिकाणी शोभेसाठी करीत नाही, तर माझ्या व्याख्यान-विषयामध्ये जे सूत्र येणार आहे, जो विषय मी माझ्या आजच्या प्रतिपादनासाठी घेतलेला आहे, " भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग " हा त्या विषयाशी त्याचा निक-

टचा संदर्भ आहे.कारण कुठल्याही समाजाचे आमूलाग्र परिवर्तन घडवायचं असेल तर केवळ त्याच्या बाह्यस्थितीमध्ये,त्याच्या आवती भोवतीच्या वातावरणामध्ये, त्याच्या कपडचालत्त्यामध्ये, वेषभूषेमध्ये, भाषेमध्ये वरवरचे फरक केल्याने ते परिवर्तन होत नाही. खऱ्या अर्थाने ते जर परिवर्तन व्हायचे असेल तर त्या समाजाच्या " मन, बुद्धी आणि आत्मा " या ज्या तीन महत्तम शक्ती आपण मानतो त्या तीन शक्तींमध्ये मूलभूत अशा प्रकारचे फरक झाले तर त्याला आपण परिवर्तन म्हणायला हवं. अशा या परिवर्तनामध्ये विचार हे फार मोठं शस्त्र होय. विचार हे फार मोठं साधन जगाच्या आतापर्यंतच्या इतिहासामध्ये क्रांती व परिवर्तन यासाठी आवश्यक मानलं गेलं आहे. विशेषत: लोकशाहीमध्ये त्याची अत्यंत गरज असल्यामुळे वैचारिक नेतृत्व देणारा माणूस म्हणून यशवंतरावांचा उल्लेख केला.

विचाराच्या साहचाने समाजाचं परिवर्तन करायचं असतं अशा प्रकारची प्रक्रिया या देशामध्ये सुदैवाने पारतंत्र्याच्या काळापासूनच सुरू झाली. ब्रिटिशांच्या गुलामगिरीत असलेला प्रचंड असा खंडप्राय देश, त्या वेळचा ३३ कोटी लोकांचा, जुलमाने गांजलेला, दुर्धर परिस्थितीने ग्रस्त असलेला, बुरसट रूढी व प्रथा-खोटचा धर्मकल्पना, खोटचा समजुती, नानाप्रकारची विषमता यांच्या मध्ये विभागलेला व निश्चल आणि निष्प्राण होऊन पडलेला हा देश. त्याचं भविष्य काय ? यासंबंधीचा विचार या देशात पारतंत्र्याच्या काळातच जन्मलेल्या विचारवंतांनी केला होता ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. आजच्या जगातील अनेक विकसनशील देशामध्ये (Developing Countries ) विकासाच्या दिशेने मार्गस्थ झालेला भारत देश अग्रदूत मानला जातो. कारण स्वातंत्र्याची चळवळ करीत असताना केवळ स्वातंत्र्यप्राप्ती एवढीच कल्पना आमच्या विचारवंत नेत्यांच्या डोळ्यांसमोर नव्हती. स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेतृत्व करणारी जी जी मंडळी या देशामध्ये होऊन गेली त्यामध्ये विशेषत: महात्मा गांधी,

त्यांचं शिष्यत्व करणारे पंडितजी आणि त्यांच्या बरोबरीनं काम करणारी इतर मंडळी व महाराष्ट्राच्या संदर्भात बोलायचं झालं तर लो. टिळक, आगरकर, ज्योतिराव फुले, दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, गोखले अशी कितीतरी माणसे की ज्या माणसांचे विचार इंग्रजी ज्ञानाच्या परिशीलनातून आलेल्या नव्या दृष्टि-कोनांनी, नव्या कल्पनांनी भारावलेले होते. या नेत्यांच्या डोळ्यांसमोर केवळ राजकीय स्वातंत्र्याचे ध्येय असते तर कोणत्याही एकाच भावनेवरती आधारलेल्या राष्ट्रीय सांस्कृतिक पारंपारिक अशा प्रकारच्या -अगर कुठल्या तरी एखाद्या तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन स्वातंत्र्य मिळवणं फारस कठीण गेलं नसतं. अशा प्रकारच्या चळवळी जगभर कुठल्याही राष्ट्राच्या इतिहासामध्ये नेहमीच होत असतात. परंतु केवळ कुठल्याही एका विशिष्ट धर्माचा, संस्कृतीचा वा संकुचित अशा प्रकारच्या कुठल्याही उत्कट भावनेचा आधार न घेता सर्व समावेशक जन-सामान्यांना बरोबर घेऊन जाईल आणि स्वातंत्र्यानंतरदेखील स्वातंत्र्याचा अर्थ परिपूर्ण करण्याला मदत करील अशा प्रकारच्या विचारांची शिदोरी त्यांनी त्याचवेळी बरोबर घेतली होती. या साठी आगरकरांनी आम्हाला विवेकनिष्ठा शिकविली, बुद्धिवाद शिकवला, बुद्धिप्रामाण्य शिकवलं. जी गोष्ट बुद्धीला पटेल तीच गोष्ट मी स्वीकारीन आणि म्हणून समाजातल्या सगळ्या रूढी – विधवाविवाहाच्या – बालविवाहाच्या इ० ज्यांमध्ये समाजाचे मन त्याचा आत्मा गुदमरला जातो असे प्रत्येक अमंगल बंधन बुद्धीच्या कसोटीवरती घासून ती उतरत नसेल तर टाकून दिले पाहिजे. अशा प्रकारची बुद्धिवादाची निष्ठा आगरकरांनी त्या वेळेला आम्हांला शिकविली. समाजा-तला रंजला गांजलेला दुबळा घटक केवळ जातीय विषमतेमुळे जर दुःखाचे अधिष्ठान बनला असेल, कुणाच्या तरी गुलामीत बांधला गेलेला असेल तर त्याला आधार देणारे व समतेचे, सत्यधर्माचे तत्त्वज्ञान सांगणारे म० ज्योतीराव फुले होत. आणि

या देशातील अर्थव्यवस्था एकाद्या ऑक्टोपसच्या कचाट्यात सापडावी त्याप्रमाणे ब्रिटिश अर्थव्यवस्थेच्या शोषणाला बळी पडलेली आहे. या देशाचं रक्त शोषण केलं जात आहे अशा प्रकारचा अर्थविचार मांडणारे दादाभाई नौरोजी होते, न्या. रानडे होते. याच वेळी राष्ट्रीयत्वाची प्रखर भावना इतिहासाच्या, संस्कृतीच्या आधारे मनात पेटवून आणि तत्कालीन युरोपामध्ये उदय पावलेल्या लोकशाहीच्या नव्या संकल्पनेवर आधारलेली अशी ज्वलंत भावना निर्माण करणारे टिळक होते. आणि त्यांच्या नंतरच्या काळामध्ये या सगळ्या विचारांना सामावून घेईल –आगरकरांची बुद्धिनिष्ठा, टिळक–दादाभाईंनी शिकवलेलं अर्थशास्त्र, टिळकांचा ज्वलंत अशा प्रकारचा राष्ट्रवाद, ज्योतिबा फुले यांची बहुजन समाजासंबंधीची आत्यंतिक करुणा, लोकहितवादींचा आणि आणि दादाभाईंचा नव्या लोकशाही जीवनपद्धतीसंबंधीचा आलेला विचार– या सगळ्यांना सामावून घेईल. आणि तरीही त्याच्यापलीकडे जाईल असे सर्वांगीण सर्वंकष जीवनाचा विचार करणारे म. गांधींचे सर्वस्पर्शी तत्वज्ञान या सगळ्याची पार्श्वभूमी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला लाभली होती.

आणि म्हणून मी असं म्हणेन की भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा कांय असेल याचा विचार केवळ स्वातंत्र्यानंतर झाला नाही तर स्वातंत्र्यपूर्व काळामध्येच तो झालेला होता. म्हणून भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये यच्चयावत स्त्री पुरुषांनी भाग घेतला होता. कॉलेजातल्या मुलांनी कॉलेजं सोडली, स्त्रियांनी घरेदारे सोडली व त्याही गोळ्या झेलण्यासाठी रस्त्यावर आल्या. पुरुष तर आघाडीवर होतेच. परंतु सर्व थरांतील आबालवृद्धांना अेकत्र गुंफणाऱ्या लोकशाहीचे एक नवे तत्वज्ञान या सर्व थरांतील चळवळीच्या रूपाने या देशामध्ये तयार झाले. त्याचा उपयोग स्वातंत्र्यानंतर जी प्रजासत्ताक तत्त्वप्रणाली आपण स्वीकारली त्याला काही निश्चित रूप व गती देण्याच्या दृष्टीने आपल्याला

झाला. मी त्या इतिहासामध्ये खोलात शिरू इच्छित नाही, माझ्या विषयाचा संदर्भ हा सद्यःस्थितिगतीशी नसल्यामुळे,माझ्या विषयाचा बराचसा ऊहापोह पुढल्या काळाशी निगडित असेल परंतु वर्तमान-कालाचे धागे हे नेहमीच भूतकालाशी जोडलेले असतात आणि या भूतकालाचा संदर्भ विसरून आपणाला भविष्याचा अर्थ लावता येत नाही. आणि म्हणूनच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाचे काय करायचं, या समाजाच्या परिवर्तनाचं निश्चित स्वरूप काय असेल, हा समाज निश्चित कोठे नेऊन आपल्याला पोहोचवायचा आहे. या संबंधीचा जो विचार झाला तो त्या विचाराचे जे वेगवेगळे दृष्टि-कोन आहेत, जे वेगवेगळे असे थर आहेत. त्यांचा मी माझ्या भाषणामध्ये ऊहापोह करणार आहे आणि त्या दृष्टीने आपला समाज आज कोठे जाऊन पोहोचला आहे यासंबंधी माझे जे विचार जे अजूनही अपरिपक्वच असल्याचे मी मानतो, ते मी आपल्यापुढे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

मी तुमच्या या पूर्वी झालेल्या व्याख्यानमालेतील भाषणे वाचली आणि मी पाहिले की लोकशाही, समाजवाद अशा प्रकारचे जे वेगवेगळे राजकीय विचार आहेत त्या संबंधीची मूलभूत बैठक या पूर्वीच्या व्याख्यानांनी तयार झालेली आहे. आणि कदाचित माझ्या भाषणामध्ये त्याची पुनरावृत्तीही होईल. सर्व भारतीय समाजाच्या पुनरुज्जीवनामध्ये, पुनर्रचनेमध्ये वा परिवर्तनामध्ये निश्चित असलेली तत्त्वे आणि त्या तत्त्वांचा तपशीलवार विचार या पूर्वीच्या वक्त्यांनी केलेला आहे. अर्थात तुम्ही त्या वेळी हजर असाल वा नसाल. मला त्याची पुनरावृत्ती करावी लागेल. भारतीय समाजा-च्या परिवर्तनासंबंधाने ज्यावेळी आपण विचार करतो त्यावेळी भारतीय समाज निश्चित काय होता आणि आज तो काय आहे, हे ज्या वेळी आपण अवती-भोवती पाहतो, त्यावेळी आपणाला समजायला लागते.

माझ्या सारखा मनुष्य, १९४७ साली ज्यावेळी स्वातंत्र्य मिळाले

त्या वेळी अगदीच लहान होता पण लहान असला तरी उघडया डोळयांनी सगळं जग पहात होता. त्या वेळचा उत्साह, त्या वेळची जी आत्मप्रेरक अशा प्रकारची ऊर्मी, होती त्याचं दर्शन अत्यंत जवळून घेतलं असल्यामुळे त्या वेळचं जीवन किती संकुचित किती आक्रसलेले डबक्याप्रमाणे साकळलेलं होतं, हे प्रत्यक्ष जीव–नामध्ये अनुभवलेलं असल्यामुळे आज मुक्त झालेल्या, विविध अंगांनी फुलणाऱ्या, विचारांना गती देणाऱ्या, अशा जीवनाचं ज्या वेळी परस्पेक्टिव्हने ( Perspective ), काही एका विशिष्ट सम्यक्, दृष्टिकोनातून पहातो– त्यावेळी नाही म्हटलं तरी माझ्या-सारख्या मनाला सानंद आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही. पण हे आश्चर्य वाटत असतानासुद्धा कुठेतरी एक असमाधानाची जाणीव मनाला पोखरत रहाते. कुठेतरी कसलीतरी खंत जाणवत राहते. ही परिवर्तनाची निश्चित दिशा ठरविल्यानंतर जी मूल्ये आपण आपल्या जीवनामध्ये स्वीकारली होती ती मूल्यं खऱ्या अर्थानं आपल्या जीवनामध्ये उतरली काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधताना, नाही म्हटलं तरी, मन थोडेसे खिन्न होते, त्याचा उल्लेख मी नंतर करीन. उद्याच्या व्याख्यानाचा बराचसा भाग हा यावरच आधारलेला असेल.

परंतु भारतीय समाजाला निश्चित दिशा देण्याचं कार्य या देशा–मध्ये, स्वातंत्र्यानंतर पंडितजीच्या नेतृत्वानं केलं. पं. जवाहरलालां-सारख्या अत्यंत उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या विचारवंताचं नेतृत्व या देशाला मिळालं हे मी मोठं भाग्याचं समजतो. त्याचे कारण असे आहे की जगाच्या इतिहासाचे, जगात होणाऱ्या सगळ्या घडामो-डींचे, जगातील बहुतेक सगळ्या राष्ट्रांचे अत्यंत जवळून दर्शनच– केवळ– घेतलं होतं असं नव्हे–, तर त्याच्या विचारांचा, त्यांनी कप्प्यांना हात घालून ते अलगदपणे उलगडलेलं होतं आणि हे विचार नीट समजून घेऊन त्यांनी ते आपल्या देशामध्ये कसे आणता येतील त्याची काही एक निश्चित कल्पना त्यांच्या मना–

मध्ये होती. माझं विधान कदाचित काही लोकांना अतिशयोक्तीचं वाटेल. परंतु भारतीय स्वातंत्र्यानंतरचा इतिहास जर आपण पाहिला, भारतीय लोकशाहीची वाटचाल पाहिली, भारतीय समाजवादाच्या कल्पनेचा विस्तार पाहिला, भारतीय जीवनप्रणाली संबंधाने आपण जवळून दर्शन घेण्याचा प्रयत्न केला तर आपल्या लक्षात येईल की या प्रत्येकावरती पंडितजींच्या विचारांची, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडलेली आहे. आणि याचे कारण तुमच्या लक्षात येईल की त्या काळात स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये इतर कितीही लोकांनी जरी भाग घेतलेला असला तरी स्वातं–त्र्याबरोबरीनंच स्वातंत्र्यानंतर या देशाची आर्थिक पुनर्रचना, सामाजिक पुनर्रचना, सांस्कृतिक पुनर्रचना कोणत्या तत्त्वाच्या आधारावर होणार आहे, त्याचंही निश्चित स्वरूप मनाशी ठरव–लेला, महात्माजीनंतरचा हा दुसरा नेता होता. महात्माजी हे विरक्त प्रवृत्तीचे, अध्यात्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळे प्रत्यक्ष सत्तेच्या राजकारणात उतरले नाहीत. त्यांचा हात आशीर्वादासाठी नेहमीच सत्ताधाऱ्यांच्या पाठीशी राहिला. आणि म्हणून पंडीतजींवरती ही अधिक महत्त्वाची जबाबदारी पडल्यामुळे जगाचा इतिहास बघत असताना त्यांना जाणवलं. जे होतं त्यांच्या चुका पाहून त्याचं सामर्थ्य काय ? त्याचं दौर्बल्य काय हे लक्षात घेऊन त्यांनी या देशाला दिशा लावण्याचा प्रयत्न केला आणि या देशामध्ये त्यांनी क चांगली गोष्ट केली की कुठल्याही तात्त्विक निष्ठेच्या आत्यं–तिक आहारी न जाता म्हणजे मार्क्सवाद घ्या, जर्मनीमधला नाझीवाद घ्या– फॅसिस्ट ज्याला आपण म्हणतो– किंवा पश्चिम युरोपातील अनेक राष्ट्रांमध्ये असलेला भांडवलवाद घ्या– अशा कुठल्याही आत्यंतिक विचारप्रणालीचा स्वीकार न करता या सगळ्या विचारप्रणालीमधे असलेलं समाजकल्याणाचं जे जे काही असेल तेच स्वीकारण्याची पुरोगामी वृत्ती पंडितजीनी प्रारं-भीच्या आपल्या रचनेमध्ये दाखविली. त्यांच्या विचारामध्ये हा असा एक संगम झालेला होता. आणि म्हणून या देशातील समा–

जाच्या परिवर्तनाची दिशा ही जगाच्या दृष्टीने काही विचारांची झापडे बांधलेल्या लोकांच्या दृष्टीनेही कदाचित अत्यंत मागासलेली वाटण्याची शक्यता आहे. कदाचित दिशाहीन ठरण्याची शक्यता आहे. निश्चित काही तरी स्वीकारा, कम्युनिझम तरी स्वीकारा, हुकूमशाही तरी स्वीकारा, वा भांडवलशाही तरी स्वीकारा, एक काही तरी स्वीकारा, ह्या सगळयांचं कडबोळ करण्याचा प्रयत्न करू नका. त्यामुळे घोटाळा होतोय असं म्हणणाऱ्या लोकांची संख्या या देशामध्ये होती.

असं असताना सुद्धा मानवतेसंबंधीचा अत्यंत मूलभूत विचारकेलेला असल्यामुळे पंडितजी आपली स्वतःची आवडती तत्त्वं काही क्षणाला बाजूला ठेवून इतरांची मने समजावून घेऊन त्यांनाही सामावून घेत. अशा प्रकारचा एक समन्वयवादी दृष्टिकोन भारताच्या राजकारणामध्ये, समाजकारणामध्ये आणला. घटनेमधेसुद्धा जगातल्या सगळया चांगल्या प्रवृत्तींचं दर्शन घडतं समाजवादाची कल्पना मार्क्सकडून ते शिकले. हेरॉल्ड लॉस्कीसारख्या मार्क्सचा नवा भाष्यकार, नवा अर्थ सांगणारा, त्याच्या कडून ते समाजवादाची संपूर्ण संकल्पना काय ते शिकले. पश्चिम युरोपमध्ये वाढीला लागलेल्या उदारमतवादातून निर्माण झालेली लोकशाहीची मूल्यें, व्यक्तिस्वातंत्र्याची मूल्ये, बुद्धिवादाची मूल्ये, ऐहिकतेची मूल्ये- तीही ते शिकले आणि भारतीय संस्कृतीमध्ये रुजलेल्या, इथल्या समाजरचनेतील काही चिरंतन अशा तत्त्वांचाही त्यांनी अभ्यास केला असल्यामुळे आणि विशेषतः गांधीजींच्या आशीर्वादाचा हात त्यांच्या पाठीशी असल्यामुळे, इथल्या खेडयांतून, इथल्या बहुजन समाजाच्या जीवनातून जी कामगिरी आपणाला घडवायची आहे. त्यामधून इथलीच काही तत्त्वं अंतर्भूत केली पाहिजेत असे समजून तीही तत्वं असं सगळया गोष्टींचं संमीलन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आणि अशी ही एक समन्वयवादी अशा प्रकारची दृष्टी भारतीय राजकारणामध्ये आणली. म्हणजे भारतीय समाजाच्या परिवर्तनामध्ये कुठलेही निश्चित अशा प्रका-

चं ठोक अगर ठोस तत्त्वज्ञान न स्वीकारता, जगातल्या सगळ्या चांगल्या अशा गोष्टी अेकत्र करून समाजाला पुढे नेण्याचं व्रत त्यांनी अंगीकारलं – त्यात ते कितपत यशस्वी झाले, त्यामध्ये त्यांना किती अडथळे आले, त्यांचे किती पराजय झाले हादेखील इतिहासाचा, चर्चेचा एक विषय आहे. परंतु त्यामुळे त्यांच्या हेतूची शुद्धता, त्यांच्या हेतूची परिणामकारकता, त्यांच्या कल्पनांची सत्यता खोटी ठरत नाही.

या ठिकाणी विचारासाठी एक मुद्दा मांडतो की एखादा विचार पराजित झाला म्हणजे तो विचार खोटा असतो असे कृपा करून कोणी समजू नये. विचार पराजित होण्यामध्ये अनेक प्रकारच्या शक्ती कार्यान्वित होऊ शकतात. तो ते विचार मागे खेचू शकतात आणि त्यामुळे विचार कदाचित मागे गेल्यासारखा वाटतो. परंतु तो मागे गेलेला नसतो. तो ढगाळलेला असतो, काजळलेला असतो. स्वच्छ करण्याची संधी मिळाल्यास तो पुन्हा स्वच्छ करायचा असतो. भारतीय समाजाच्या पुनर्रचनेमध्ये, परिवर्तनामध्ये पंडितजींनी हे जे समन्वयवादाचे, सर्वसमावेशकतेचे, जे तत्त्व आणले त्यामध्ये त्यांची स्वत:ची विज्ञाननिष्ठ दृष्टी होती. पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वाचा जर अभ्यास केला तर पंडितजी म्हणजे उत्तुंग बुद्धिमत्तेचा एक बुद्धिनिष्ठ आविष्कार होय. कलावंत प्रवृत्तीचा सौंदर्यवादी ( Romanticist ) आणि मानवतेवर उत्कटपणाने प्रेम करणारा असा मानवतावादी असे त्यांचे रूप होते. त्यांच्यामध्ये धर्मशीलता, जी काही विशिष्ट संकेतांच्या चौकटीत बंदिस्त असते अशा कल्पनेतून जन्मलेली धर्मनिष्ठता त्यांच्याकडे नव्हती. विश्वाच्या उत्पत्तिलयाची कारणमीमांसा करणारी धर्मनिष्ठ आध्यात्मिक वृत्ती नव्हती आणि असं असतानासुद्धा पू. गांधीजीसारखा महापुरुष त्यांचा मार्गदर्शक गुरू असल्यामुळे त्या आध्यात्मिकतेचा स्पर्श त्यांना राजकारणाला द्यावा लागला, द्यावासा वाटला. एका बाजूला आधुनिकाचा पुरस्कर्ता आणि बुद्धिप्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठ असतानाच त्यांनी गांधीजींच्या ग्रामोद्यो-

गाची, रामराज्याची, ग्रामस्वराज्याची कल्पना आपल्या नियोजनामध्ये, घटनेच्या मसुद्यामध्ये स्वीकारली होती हे लक्षात घेण्यासारखं आहे.

पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी एक गूढ मला नेहमीच वाटत आलेलं आहे की पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अशा प्रकारचे अनेक गुण प्रकर्षाने असतानासुद्धा या माणसाने या गुणांवरती असं काही एक सुंदर नक्षीकाम करून ठेवलं होतं की त्यांच्यातून निश्चित असा एक आकृतिबंध, आकार रंग रूप कोणतं हेच निश्चित समजणं कठीण होतं. असा जो एक समाज त्यांच्या डोळयांसमोर जो आदर्श स्वरूपात उभा व्हायचा होता त्या समाजामध्ये जगातल्या या सगळ्या सुंदर तत्त्वांचं संमीलन त्यांनी पाहिलं होतं. त्यांची लोकशाहीवर अनन्य निष्ठा असल्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याला या समाजात त्यांनी महत्त्वाचे स्थान दिलेलं होतं. लोकशाहीवरती त्यांची निष्ठा असल्यामुळेंच राजकीय समानतेपेक्षा त्यांना सामाजिक समानता जास्त महत्त्वाची वाटत होती. काही विरोधाभास त्यांच्या विचारांत आपल्याला वरकरणी दिसतात की कदाचित त्यांना अल्पसंख्याकांविषयी बहुसंख्यांकांपेक्षा जास्त प्रेम वाटत होतं, त्यामध्ये त्यांची लोकशाहीवादी वृत्ती होती. बऱ्याच वेळा त्यांच्यावर असा आरोप करण्यात येतो की त्यानी अल्पसंख्यांकांचे फारच लाड केले. गोव्याच्या प्रश्नासंबंधानं, मुसलमानांच्या प्रश्नासंबंधानं अशी भूमिका ते प्रत्येक वेळेला घेत असत की, त्यामुळे काही बहुसंख्य समाजाच्या प्रतिनिधींना राग यावा. ही वृत्ती स्वीकारण्यामागे पंडितजींची कल्पना ही इतकी संकुचित नव्हती तर उदारमतवादातून निर्माण झालेल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा विकसित झालेला विचार त्यांच्या मनामध्ये होता. आणि म्हणून लोकशाहीत बहुसंख्यांकांचे जरी राज्य चालत असले तरी बहुसंख्यांकांच्या हुकूमशाहीखाली अल्पसंख्यांक दबले जाऊ नयेत अशा प्रकारची लोकशाही विचारांची धारा त्या कृतीमागे होती. अल्पसंख्यांकांवरती आभासात्मक जरी अन्याय होत असला तरी

तो आभासात्मक अन्याय होऊ देणार नाही यासाठी ठाम उभे राहण्यामागे त्यांची लोकशाहीवरची आत्यंतिक निष्ठाच होती. हे आपल्या लक्षात येते. त्यांच्या जीवनातील विरोधाभास समजावून घेण्याचा प्रयत्न केला तर लक्षात येते की ते तळमळीचे समाजवादी होते. मार्क्सला गुरु मानण्यापर्यंत! मार्क्सचे जे समाजवादाचे तत्त्वज्ञान शोषक आणि शोषित, भांडवलदार आणि कामगार, शेतकरी आणि भांडवलदार किंवा जमीनदार यांच्या संघर्षातून शेवटी नव्या समाजाची रचना होते आणि त्यानंतर मग कोणतेही वर्ग शिल्लक रहात नाहीत. दंडशक्तीसुद्धा शेवटी शिल्लक रहात नाही - ही कल्पना त्यांना पूर्ण मान्य होती. असं असतानासुद्धा त्यांनी त्या विचारांचा प्रयोग या देशामध्ये केला नाही. त्यांच्या जीवनावर भाष्य करणाऱ्या अनेक लेखकांनी असं लिहून ठेवलं आहे, की पंडितजींनी जर मनात आणले असते की सर्व सत्ता आपल्या हातात घ्यायची, तर त्याला कोणीही विरोध केला नसता. इतकी लोकप्रियता त्यांना लाभलेली होती. पाश्चात्य विचारवंतांनी आणि या देशातील विचारवंतांनीदेखील हे मान्य केलेलं आहे की सगळी सत्ता आपल्या हातात घेऊन आपल्या मनाला येईल ते या देशाचे करीन असे त्यांनी ठरविले असते तरी त्या काळच्या लोकांनी त्यांना विरोध केला नसता. लोकांचे इतके प्रेम पंडितजींना मिळालेलं होतं. गांधीजीनंतर इतकी लोकप्रियता मिळालेला नेता या देशात त्यावेळी दुसरा कोणी नव्हता. हे जर लक्षात घेतलं तर लोकसत्ताक पद्धतीवरती त्यांची श्रद्धा ही या भारतीय समाजाला मिळालेली एक फार मोठी दिशा होती.

आपल्या राष्ट्रीय जीवनाला एक निश्चित दिशा लावण्याचा प्रयत्न करणारे नेतृत्व या देशाला प्रारंभीच लाभले होते. हे जर लक्षात घेतलं तर, हा देश २७–२८ वर्षे आज प्रगतीच्या दिशेनं वाटचाल करतो आहे; आणि निश्चित तत्त्व मनाशी बाळगून पुढे जातो आहे; याचं मग आश्चर्य वाटणार नाही. तुलनेसाठी युरोपात वा नव्याने आफ्रिकेत स्वतंत्र झालेले किंवा वसाहतवादाच्या कचा-

ट्यातून मुक्त झालेले देश घ्या. त्यांच्या स्वातंत्र्याच्या चळवळी कितीही उत्कट असल्या तरी त्यांच्या पाठीशी राजकीय नेतृत्व करणारा विचारवंत तत्त्वज्ञ नेता नसल्यामुळे त्यांची पुढे काय परिस्थिती झाली हे बघण्यासारखे आहे. शेजारचं पाकिस्तान राष्ट्र जरी उदाहरणासाठी घेतलं तर लक्षात येईल की कुठलंच राजकीय असं तत्त्वज्ञान नसल्यामुळे या देशाचे धिडवडे निघाले आहेत. किती रक्तपात, किती बदल झाले, किती नेते बदलले कितींचे खून झाले. या देशामध्ये असे काही झाले नाही. याचे सगळे श्रेय पंडितजींना जाते. आणि इतर समानशील व समविचाराच्या नेत्यांच्या सहकार्याकडे येते. पंडितजी यांत प्रमुख होते याचं कारण पंतप्रधान म्हणून नेतृत्व स्वीकारण्याची जबाबदारी त्यांच्यावरती प्रारंभीच पडलेली होती. या देशाला जी एक निश्चित दिशा त्यांनी आपल्या कारकीर्दीत लावून दिली, जी चौकट घालून दिली, त्या चौकटीमध्ये हा देश, हा समाज म्हणूनच सुरक्षित राहिला.

अराजक अलीकडे थोडेसे वाढलेले आहे, आपण दुबळे ठरलो काही बाबतीत, आपल्यामध्ये काही उणीवा असतील. आपला जेवढा विकास व्हायला पाहिजे तेवढा झाला नसेल. परंतू आपण ज्या काही मूलभूत कल्पना स्वीकारल्या त्या कल्पनांचं कवच आपल्याभोवती असल्यामुळे आपण या जगामध्ये नष्ट होऊ शकलो नाही. उलट आज आपण एका पायरीवर येऊन ठेपलेलो आहोत की, जगातल्या पुढारलेल्या राष्ट्रांनाही दर क्षणाला हा देश काय म्हणतो हे ऐकावं लागतं. समर्थ राष्ट्र या आपल्या देशाला निर्माण करण्याचं श्रेय हे या विचारपरंपरेला आहे. आज अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशाला या देशात काय चाललं आहे याकडे सतत लक्ष ठेवावं लागतं. तो असं म्हणत नाही, " भारत मागासलेला देश आहे, त्याचं काय व्हायचं असेल ते होऊ द्या, आम्हाला त्याचा विचार करायचं काय कारण आहे?" ब्रिटन असं म्हणत नाही, फरान्स असं म्हणत नाही, चीन असं म्हणत नाही, रशिया

असं म्हणत नाही. सगळेजण भारतामध्ये काय चालले आहे याकडे कान लावून, डोळे लावून बसलेले आहेत. याचा अर्थ या देशामध्ये चाललेल्या या महान प्रयोगाला, विकासाच्या दिशेने चाललेल्या इतर कुठल्याही देशामध्ये तुलना नसल्यामुळे एक प्रयोग म्हणून, एक कसोटी म्हणून, या सर्व तत्त्वांची सत्यता या दगडावरती तपासली जात आहे. म्हणून, या देशाकडे सगळे देश पहात आहेत. मोठी अभिमानाची गोष्ट आहे ही ! या परिवर्तनाची निश्चित दिशा ठरविण्याचे वैचारिक काम या आपल्या पहिल्या नेतृत्वाने केले.

ही निश्चित दिशा काय होती ? आपण म्हणतो की लोकशाही संसदीय पद्धती आपणाला मिळाली. समाजवादी समाजरचनेचं – १९५५ च्या आवडी येथील काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये मान्य झालेलं तत्त्व – आर्थिक सामाजिक पुनर्रचनेसाठी आम्ही स्वीकारलं, व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेल्या मूलभूत हक्कांची देणगी आम्ही समाजाला दिली. अशा अनेक गोष्टी मार्गदर्शक तत्त्वे म्हणून परिवर्तनाच्या कुठल्या दिशेने आम्ही जाणार आहोत हे ठरविण्यासाठी आम्हांला मिळाल्या. नियोजनासारखे मागासलेल्या देशाला व समाज घटकांना विकासाच्या दृष्टीने प्रेरित करील अशा प्रकारचे एक साधन याच काळामध्ये आपल्याला मिळाले. अशी जी तत्त्वे आपल्या जीवनामध्ये अंतर्भूत झाली ती तत्त्वे जगातील वेगवेगळ्या राष्ट्रांच्या प्रयोगातून निर्माण झालेली आहेत. मी त्यांचा ओझरता उल्लेख या ठिकाणी करणार आहे. ही समाजवादाची कल्पना उद्‌भूतच कशी झाली ? कारण सामाजिक परिवर्तनाचा विचार करीत असताना तो काही एका राजकीय दृष्टिकोनातून करता येतो असं नाही. किंबहुना या देशाचा जो चिवटपणा आहे. तो कशातून निर्माण झाला असेल ? तर येथील संस्कृतीच्या मूलभूत सिद्धांतावरती, त्रिकालाबाधित सिद्धांतावरती तो उभा आहे, आणि म्हणून कुठलेही तत्त्व आम्हाला नवीन वाटत नाही. समतेचे तत्त्व आम्हांला पूर्वीपासून ठाऊक आहे. समतेचं

तत्त्व आमच्या प्राचीन ऋषीमुनींपासून आतापर्यंत सगळयांनीच पुरस्कारलेले आहे. स्वातंत्र्याचं तत्त्व तेही आम्हाला नवीन नाही. कारण आत्ममुक्तीचा आमचा धर्म असल्यामुळे, आत्मसाक्षात्काराचा मार्ग असल्यामुळे सगळया बंधनांतून मुक्त होणं हीच आमची धार्मिक परंपरा आहे. त्यामुळे स्वातंत्र्याचं तत्त्वसुद्धा आम्हाला नवीन नाही. सर्वांभूती एकच परमेश्वर पहाणारे आम्ही असल्यामुळे, एकच चित्तत्त्व, एकच आत्मतत्त्व प्रत्येक प्राणिमात्रामध्ये – मनुष्येतर प्राणी सुद्धा – इतकेच नव्हे तर जड सृष्टीमध्येसुद्धा – असल्यामुळे, सगळेच समान आहे. सगळेच सारखे आहे. हीच समत्वाची भावना हीदेखील आम्हाला नवीन नाही. बंधुता, समता आणि स्वातंत्र्य या फ्रेंच राज्यक्रांतीतून निर्माण झालेल्या या कल्पना आम्हाला नवीन आहेत असं आपण काही समजण्याचे कारण नाही. आमच्या संस्कृतीतून, आमच्या जीवन प्रवाहातून, आमच्या अध्यात्मिक दृष्टीतून या देशामध्ये त्या यापूर्वीच रुजलेल्या होत्या. मोक्षात त्याचं रूपांतर झालेलं होतं. नंतर त्या जीवनातून सुटल्या होत्या, हा नंतरचा भाग आहे. लोकशाहीची कल्पनाही काही नवीन नव्हती, इथे गणराज्यं होऊन गेली. आपल्या देशाला आपण भारतीय गणराज्य म्हणतो. ही गणराज्याची कल्पनाही आम्हाला नवीन नव्हती. विशेषतः भगवान श्री कृष्णाचा या देशातील जो महान प्रयोग होता तो राजसत्ता नष्ट करून गणसत्ता स्थापण्याचा होता. जरासंधासारख्या एखाद्या राजसत्तेचा नाश करून यादव गणांची, वृष्णीगणांची स्थापना करण्याचा त्याचा हेतू होता.

असं म्हणत म्हणत जर आपण मागं गेलो तर आपल्या लक्षात येतं की जगातल्या राजकीय तत्त्वज्ञानांतून आलेली सगळी नवी विचारसरणी आम्हाला तशी नवीन नव्हती. असं तेजस्वी तत्त्वज्ञान लाभूनसुद्धा आम्ही मागासलेलो होतो, असं असूनसुद्धा आमच्या स्वातंत्र्याचं अपहरण शतकानुशतकं होत होतं, असं असून

सुद्धा आम्ही विषमतेमध्ये गुरफटलेलो होतो, असं असून सुद्धा आम्ही दारिद्रयामध्ये पीडलेलो होतो. त्याची कारणमीमांसा शोधायला लागलं की आपल्या असं लक्षात येतं की हे सगळं धन आम्ही ग्रंथांमध्ये गुंडाळून ठेवलेलं होतं. हे सगळं आम्ही देवळाच्या धर्माच्या चार भिंतींमध्ये तेवढयाच पुरतं मानीत होतो. हे सगळं परलोकाच्या दृष्टीने – या समोर दिसणाऱ्या सृष्टीच्या पलीकडे असल्यामुळे – त्याचा विचार या जगामध्ये करायची काय गरज आहे ? असं म्हणून परलोकामध्ये रमलेलो होतो. आणि त्यांमुळं हे सगळं समर्थ तत्त्वज्ञान जवळ असूनसुद्धा आमच्या समाजाची पुनर्रचना आम्ही करू शकलो नाही. आमच्यामध्ये कितीतरी अंतर्विरोध होते. आम्ही स्वःतःला पुरोगामी म्हणत असताना अत्यंत प्रतिगामी होतो. समतेचा उद्‌घोष करत असतांना विषमतेचा उच्चबिंदू आम्ही गाठला होता. असं जरी असलं तरी ह्या नव्याने आलेल्या कल्पना नवीन नसल्यामुळे या देशामध्ये त्या सहज रुजणे सोपे होते. महात्माजींनी या देशामध्ये जी स्वातंत्र्याची चळवळ उभी केली त्या चळवळीमध्ये या संस्कृतीच्या काही मूलभूत अंगांचा स्पर्श देखील त्यांनी या चळवळीला घडवला होता. हे लक्षात घेण्यासारखं आहे. समाजाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने विचारवंत, प्रतिभावंत माणसं लोकांमध्ये आधीच असलेल्या, मुळातच सहज रूपात असलेल्या गोष्टींचा वापर करून त्याची पुनर्रचना, त्याचा नवा आकृतिबंध, कसा तयार करतात आणि आपली कार्यसिद्धी कशी करून घेतात याचं उत्तम उदाहरण म्हणजे महात्माजींची राजकीय दृष्टी आहे. त्यानी बुद्धाचं सत्य अहिंसेचं तत्त्वज्ञान राजकारणात आणलं. त्यानी भारतीय संस्कृतीतलं आत्मसाक्षात्काराचं तत्त्वज्ञान आणलं. त्यांनी अध्यात्मातले आत्मक्लेषाचे तत्त्वज्ञान आणलं त्याच्या अधिष्ठानावर उभ्या असलेल्या असहकार, सत्याग्रह, समता, अस्पृश्यता निवारण, स्त्री मुक्ती या सगळ्या आधुनिक कल्पना या सांस्कृतिक संचिताशी त्यांनी जोडल्यामुळे इथल्या लोकांना चटदिशी समजल्या. स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये महात्माजींच्या मागे लोक सागरा -

सारखे लोटले. दांडीयात्रेमध्ये जे दृश्य लोकांनी पाहिले. ते अपूर्व होतं, अतूट होतं. जगातल्या इतिहासामध्ये न घडलेलं होतं. शस्त्र-सज्ज अशा सरकारपुढे निःशस्त्र माणसं प्राणाची पर्वा न करता केवळ मिठाची एक मूठ उचलण्यासाठी रामचंद्राच्या सेतूबंधना-साठी वानर सेना गेली त्या वानरसेनेप्रमाणे विशिष्ट निष्ठेने, निर्भयपणे, निर्मल मनाने, विरक्त बनून जाऊ शकत होती. त्याचे का-रण भारतीय राजकारणातल्या स्वातंत्र्याच्या निष्ठेला महात्मा-जींनी हा अध्यात्मवादाचा स्पर्श दिलेला लोकांना चटदिशी समज-लेला होता. लोकांच्या मनामध्ये तशा प्रकारची बैठक पूर्वीच्या संतांनी, विचारवंतांनी निर्माण केलेली होती. ती सुप्तावस्थेत होती. त्याचा बरोबर फायदा आपल्या राष्ट्राला मिळाला. म्हणून मी म्हणतो या मूलकल्पना, समाजाला जिथे आपण घेऊन जाणार त्याची साधनं, लोकशाहीच्या, समाजवादाच्या, संसदीय पद्धतीच्या कल्पना किंवा व्यक्तिस्वातंत्र्याची, व्यक्तिमुक्ततेची, कल्पना या सगळ्या या देशांत नवीन नसल्यामुळे नव्या राजकीय विचारामध्ये लोकांना त्या समजून सांगणे व लोकांनी त्या समजावून घेणे सोपं गेलं. त्यामुळे हा देश अनेक अंतर्गत विरोधाभास असताना सुद्धा जगाच्या आजच्या सगळ्या गुंतागुंतीच्या राजकारणामध्ये सदैव अचल खडा आहे. उभा आहे

परंतू हे जरी असलं तरी ही अप्रत्यक्षरीत्या घडणारी गोष्ट! एखादं झाड उभं असतं, वठलेलं दिसतं, त्याच्यातलं सत्त्व जर निघून जात असेल तर ते नुसतं उभं आहे म्हणून चालत नाही. उभ्या असले-ल्या झाडामधलं सत्त्व जर निघून जात असेल, त्यातला प्राण जर निघून चालला असेल, त्याचा तजेला, त्याचा हिरवेपणा त्याची फलधारणाशक्ती ही जर निघून जाणार असेल तर त्याची तत्क्षणी देखभाल करण्याचे, त्याला खतपाणी पुन्हा घालून संजीवन देण्याचं काम करावं लागतं. म्हणून ज्या गोष्टी मुळात होत्या असं आपण मानतो त्यामुळे आपलं केवळ अस्तित्त्व सिद्ध होईल, त्यामुळे आप-लं सामर्थ्य सिद्ध होणार नाही. त्याच्या संबंधींचा विचार आपणाला उद्याच्या व्याख्यानात करता येईल.

या ज्या मूलभूत कल्पना, त्या मूलभूत कल्पनांच्या आधारावरती एक नवा समाज पंडितजींना आणि त्यांच्या तत्कालीन सहकाऱ्यांना या देशात उभा करायचा होता या पार्श्वभूमीवर देशाचं राजकारण सुरू झालं. राष्ट्राच्या अर्थकारणाला एक निश्चित दिशा सापडली. अर्थकारणाला दिशा आली समाजवादाची ! आता हा समाजवाद काय होता ? या समाजवादाचं आज आपण नेहमीच नाव घेतो. समाजवाद म्हणजे काय ? आता एक आधुनिक कल्पना समाजवादाची झालेली आहे. पूर्वीची कल्पना काय होती ? की उत्पादनाची साधनं काही मूठभर व्यक्तीच्या हातामध्ये असतात. उत्पादनवाढ झाली म्हणजे त्याचा फायदा मूठभर माणसांच्या हातामध्ये जातो. मूठभर माणसे श्रीमंत होतात. आणि ज्यांच्या आधाराने ती श्रीमंत होतात ती असंख्य माणसं दारिद्र्यामध्ये पिचत राहतात.जुलमाखाली भरडली जातात. आणि ही माणसं बंड करून उठली की मग अशा प्रकारचा श्रीमंत वर्ग नष्ट करून टाकतात. शस्त्रबलाने, क्रांती करून, त्याचे रक्त शोषून आणि उत्पादनाची साधनं सगळ्या समाजाच्या हातामध्ये देऊन, जे काही त्याच्यातून निर्माण होईल ते सगळयांना वाटणे आणि असं सगळयांना वाटून झालं की मोह शिल्लक राहत नाही. जास्त कुणाला मिळत नाही, स्पर्धा शिल्लक रहात नाही. आणि त्यामुळे द्वेष उरत नाही, आणि द्वेष नसलेला, वर्ग नसलेला अशा प्रकारचा वर्गविहीन समाज निर्माण होतो. आणि द्वेष नाही, मत्सर नाही, स्पर्धा नाही तिथे राज्य करण्याची सुद्धा गरज नसल्यामुळे तिथे राज्य यंत्रणा सुद्धा गळून पडते. अशी दंडहीन आणि वर्गहीन अशाप्रकारची समाजरचना निर्माण होणे यालाच समाजवाद असं म्हणतात. मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद हा अशा प्रकारचा होता. परंतु त्या समाजवादाची कल्पना आता त्याच देशामध्ये बदलली. रशियाने ज्या मार्क्सच्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर आपल्या राष्ट्रामध्ये समाजवाद स्थापन करण्याचा प्रयत्न केला, एक पक्षीय हुकमशाही स्थापन करून ! त्याच राष्ट्रामध्ये आता याची पुनर्-

चना करण्याची गरज त्यांना भासायला लागली. आणि जिथे कुठलाही खाजगी मालकीचा माणसाला अधिकार नव्हता तिथे आता काही निवडक क्षेत्रांमध्ये खाजगी मालकीचा अधिकार दिला तरी चालेल असा विचार यायला लागला. अल्पकाळामध्ये याच विचारसरणीतून मोठी प्रगती साधणाऱ्या चीनसारख्या देशामध्ये सुद्धा त्यांच्या पंतप्रधानांचं निधन झाल्यानंतर आता तिथे काय होते आहे याच्याकडे जगाचं लक्ष लागले आहे ? म्हणजेच मानवी मूलभूत अशा प्रकारच्या विकारापासूनही थोर तत्त्वज्ञानंसुद्धा सुटू शकत नाहीत. असा अनुभव आज जगाला येतो आहे.

निव्वळ थोर तत्त्वज्ञान जगातल्या कुठल्याही राष्ट्राचा प्रश्न सोडवू शकत नाही. आणि म्हणून त्याच्या मूल्यामध्ये काळाप्रमाणे पुनर्रचना करावी लागते. कुठलेही तत्त्व हे एखाद्या काळाला पूर्ण लागू ठरले, ते यशस्वी झाले, म्हणून ते सगळयाच काळांना सगळयाच ठिकाणी, सगळयाच समाजाला लागू पडते असे नसून त्याचा वेगवेगळ्या समाजाला वेगवेगळया काळी, वेगवेगळया परिस्थितीत यशस्वी व्हायचं असेल तर त्या तत्त्वांची पुनर्रचना करावी लागते. भारतीय समाजरचनेच्या पुनर्रचनेमध्ये किंवा त्याच्या परिवर्तनामध्ये जर कुठला प्रयोग चालू असेल तर या तत्त्वांच्या पुनर्रचनेचा प्रयोग चालू आहे. म्हणून या देशामध्ये समाजवादाकडे वाटचाल करणारी सार्वजनिक क्षेत्रं आहेत. राष्ट्रीयीकरणाचे प्रयोग चालू आहेत. त्याच वेळेला माणसाच्या अस्मितेला, माणसाच्या निर्मितिक्षमतेला, माणसातील महत्त्वाकांक्षेला आणि त्याचा आधार घेऊन राष्ट्राला पुढे नेण्याचा खाजगी क्षेत्रालासुद्धा तितकाच वाव आहे. समाजसत्ताक राष्ट्रात सर्व समान आहेत. अशा प्रकारच्या समतेचा स्वीकार करीत असतानाच व्यक्तिगत विचारांना आपल्या मनाला येईल त्याप्रमाणे आचार विचार करण्याचे स्वातंत्र्य व संधी देऊन अशी व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना स्वीकारून या मूळभूत हक्काची प्रतिष्ठाही राखलेली आहे.

पण या सर्व संकल्पनाचा विचार व आचार या देशातील केवळ नेत्यांनी करून चालणार नाही; हे आव्हान या देशातील पुढाऱ्यांनीच केवळ स्वीकारून चालणार नाही. तर हे आव्हान सामान्य माणसांनी समजावून घेण्याची वेळ आलेली आहे. आणि हे जे दुसरे परिवर्तन आहे त्याचा विचार समाजाच्या अगदी शेवटच्या थरापर्यंत नेऊन पोहोचविण्याचे बाबतीत आपण दुबळे ठरलेलो आहोत. सुशिक्षित म्हणवणारी माणसंदेखील या बाबतीत कितीतरी अडाणी असलेली मी पाहिलेली आहेत. राजकीय दृष्टीने अपक्व असलेली पाहिली आहेत. त्यांना राजकीय विचारच माहित नसतात. त्यांना राजकीय विचारप्रणालीच नसते. राष्ट्रामध्ये निर्माण झालेले विविध ताणही माहीत नसतात. ते स्वःतःच्या सुखदुःखामध्ये इतके रममाण असतात की त्यांच्या वैयक्तिक सुखाला एकदा कात्री बसली की ते ताबडतोब प्रतिकूल उद्गार काढतात. त्यांच्या सुखामध्ये थोडी वाढ झाली की ताबडतोब अनुकूल उद्गार काढतात. व्यक्तिगत स्वार्थापोटी सगळं राजकारण, सगळं अर्थकारण, सगळं समाजकारण तपासणाऱ्या माणसांची संख्या सध्या देशामध्ये ज्यास्त झाली असल्यामुळे बऱ्याच वेळेला राष्ट्रीय संदर्भ चुकतो, सुटतो आणि आपण नेमकं काय मिळवलं हे लक्षात न आल्यामुळे आपण खूप खूप गमावले असं सारखं आपणाला वाटत रहातं. परंतू राजकीय दृष्टिकोनातून अशाप्रकारची फार मोठी क्षमता या देशाने प्राप्त केलेली आहे. हे जर आपण लक्षात घेतले तर राजकीय परिवर्तनाच्या दृष्टीने या देशाने फारच मोठा पल्ला गाठला आहे असे जर मी म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

राजकीय परिवर्तनाच्या दृष्टीने, जे परिवर्तन आपल्या समाजाच्या आताच्या काळात अनुषंगाने यायला हवं ते कितपत आलं किंवा ते कोणतं या विचाराकडे आपण वळतो. आणि मग नाही म्हटलं तरी थोडीशी निराशा येते. पंडितजींनी ज्या दूरदृष्टीने, ज्या ध्येय धोरणांनी समाजवादाचा अंगीकार केला. त्याचवेळी लोक–

शाहीची संसदीय प्रणालीसुद्धा त्यांनी स्वीकारली. हे सगळं एकत्र आणीत असताना काही गणितं चुकली असं मी म्हणतो कारण त्यांच्या बरोबरीने राज्य करीत असताना हे सगळे अंमलात आणण्याचे काम त्यांना करायचं होतं. ते करणं स्वजनांतीलच परस्पर विरोधी विचारधारांमुळे अत्यंत कठीण गेलं. तुम्हांला माहीत असेल राज्यकर्त्या पक्षामध्ये, त्या वेळच्या काँग्रेस पक्षामध्ये विविध मतप्रणाली असणारी माणसं होती. भांडवलशाहीवर विश्वास असणारी, जमीनदारीवर विश्वास असणारी होती, राजेशाहीवर विश्वास असणारी होती. म्हणजे राष्ट्रीय उद्धारावरती श्रद्धा असताना सुद्धा तो उद्धार करण्याचे जेवढे मार्ग असतील तेवढे मार्ग दाखविणारी – मानणारी अशी माणसं या देशामध्ये होती आणि त्यामुळे या सगळ्यांना सांभाळून घेता घेता कधी कधी फार मोलाची अशा प्रकारची तत्त्वं आपण गमावून बसलो. आणि म्हणून सार्वजनिक क्षेत्रामध्ये महान उद्योग निर्माण झाले. समाजवादाचे जर पहिले मुख्य लक्षण कोणते असेल तर ज्याला Strategic किंवा बेसिक इंडस्ट्रिज म्हणतात (अवजड उद्योगधंदे) किंवा राष्ट्राच्या उत्कर्षासाठी लागणाऱ्या मूलभूत गरजा निर्माण करणारे अशा प्रकारचे उद्योगधंदे, राष्ट्राच्या संरक्षणासाठी आवश्यक असणारे उद्योगधंदे – शस्त्र निर्मितीचे – विमान निर्मितीचे, लोखंड पोलाद इत्यादी निर्माण करणारे उद्योगधंदे, रस्त्याचे जाळे विणून त्यावरची वाहतूक ताब्यात ठेवणारी यंत्रणा इ०, राष्ट्राच्या रक्षणासाठी, राष्ट्राच्या अभ्युदयासाठी आणि राष्ट्राच्या नाड्या हातांत ठेवण्यासाठी आवश्यक असणारे जेवढे घटक होते ते आम्ही सार्वजनिक क्षेत्रामध्ये आणले. राष्ट्रीयीकरणाचा एक विशिष्ट दृष्टिकोन स्वीकारून बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. कोळशाच्या, सोन्याच्या खाणींचे राष्ट्रीयीकरण केले, विम्याचे राष्ट्रीयीकरण केले. काही ठिकाणी आपण वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण केले. आणि अशा रीतीने सामाजिक नियंत्रण समाजवादाच्या दृष्टिकोनाने, राजकीय विचारांच्या आधाराने सामाजिक क्षेत्रामध्ये आणण्याचा आम्ही प्रयत्न केला. पण त्याच वेळेला जो खाजगी क्षेत्रा-

चा बराच मोठा अशा प्रकारचा टापू आम्ही मुक्त ठेवला,- काही एका विशिष्ट मतांच्या लोकांचा विरोध होऊ नये म्हणून- त्यामुळे सुद्धा या देशाची प्रगती झाली.

तुम्ही या देशाची उत्पादनाची आकडेवारी जर पाहिली तर ती घटलेली नाही. सगळया क्षेत्रामध्ये, सार्वजनिक क्षेत्रांमध्ये देशाचे उत्पन्न १९४७ सालापासून आज १९७५ पर्यंत सतत वाढत गेलेले आहे आणि इतके सगळे होऊन सुद्धा या देशात दर डोई उत्पन्न किती असा प्रश्न विचारला की त्याचं उत्तर असं मिळतं- २५० रुपये किंवा ४०० रुपयाचेवर आम्ही अजून गेलेलो नाही. दरडोई उत्पन्न वार्षिक ४००।- रुपये ! तर काही लोक दिवसाला चार आणे कमवणारे आहेत!! हा विरोधाभास आपण जर नीट लक्षात घेतला तर मन व्याकूळ झाल्याशिवाय रहात नाही, देशाची संपत्ती वाढते आहे. असे दृश्य एकीकडे दिसत असताना, देशातील कारखानदारी वाढते आहे, देशातील उद्यमशीलता वाढते आहे देशातील बुद्धीची भरारी चौफेर क्षेत्रांमध्ये भराऱ्या मारताना दिसते आहे. हे सगळं दिसत असताना सुद्धा याच्यातून निर्माण झालेली सगळी समृद्धी गेली कुठे? इथे समाजवादाला पहिला हादरा बसलेला तुमच्या लक्षात येईल. या बाबतीत कुणाचेही दुमत नाही. या देशामध्ये या सगळया क्षेत्रांतून निर्माण झालेले उत्पादन संपत्ती ज्या प्रमाणात राष्ट्राच्या हाती गेली त्या पेक्षा कितीतरी पटीने ती मूठभर लोकांच्या हातांत गेली. आणि त्यामुळे समाजवादाच्या या सर्वसमावेशक तत्त्वांचा अवलंब करताना आपण फार मोठी गोष्ट गमावली. या देशामध्ये दारिद्रयरेषेखाली जगणारा समाज ५०% हून अधिक आहे. त्याला दुपारचे पोटभर खायला कसे मिळेल, काम कसे मिळेल याची चिंता आहे. अशाप्रकारची लक्षावधी माणसे या देशामध्ये आहेत. आज प्रगतीची भरारी दिसते. आर्यभट्ट आकाशामध्ये फिरताना आपल्याला दिसतो. पोलादाच्या प्रचंड अशा अवजड उद्योगाचे एक मनोहर दृश्य आपल्याला दिसते. हिंदुस्थान मशिन टूल सारखा अद्ययावत मशि-

न्स निर्माण करणारा अशा प्रकारचा कारखाना दिसतो. नव्हे, तर आपल्या तंत्रज्ञानाच्या आधारावर इराकसारख्या राष्ट्रात आपले शास्त्रज्ञ जाऊन तशा प्रकारचा कारखाना त्यांना घालून देताना आपण पहातो. आपली लढाऊ विमानं आकाशामध्ये भरारी मारून आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या विमानाशी टक्कर देताना आपण युद्धामध्ये पाहिली. काही राज्यांमध्ये अन्नधान्याच्या दृष्टीने प्रचंड अशा प्रकारची क्रांती झाली तिला आपण हरितक्रांती म्हटलं. असे सगळं असतानासुद्धा काही माणसं अजून चार आणे दरडोई उत्पन्नाखाली जगत आहेत.

हा विरोधाभास निर्माण झाला त्याचं कारण, समाजप्रगतीची काही तत्त्वं फक्त कागदावरतीच राहिली. प्रत्यक्ष आचरणात आली नाहीत. उदाहरण देतो : कर आकारणी करणे हे प्रत्येक राज्याचे कर्तव्य असते. करआकारणीशिवाय राज्याचं उत्पन्न वाढू शकत नाही. म्हणून कर आकारणी करावी लागते. परंतु करआकारणी केल्यानंतर ज्यांच्यावरती कर आकारणी होते. त्यांच्यामध्ये राष्ट्रभावना नसेल, त्यांच्यामध्यं सामाजिक नीतिमत्ता नसेल, त्यांच्यामध्ये व्यक्तिमात्राविषयी प्रेम नसेल, तर जे प्रामाणिक असतात ते कर भरत राहतात आणि जे अप्रामाणिक असतात ते पळवाटा काढून कर चुकवेगिरी करतात. जगात ज्यास्तीत ज्यास्त टॅक्सिग करणारा देश म्हणून भारत ओळखला जातो. पण सगळ्यांत कमीत कमी कर कुठे गोळा होतो तर तो भारतातच होतो. याचं कारण टॅक्स न देणारे बुद्धिवान लोक आमच्या देशामध्ये जास्त आहेत. त्यामुळे पैश्याचा ओघ देशाच्या तिजोरीकडे न लागता प्रामाणिक माणसाकडून अप्रामाणिक माणसाच्या खिशात जाण्याकडे होतो. हे जर आपण लक्षात घेतलं तर एवढी सगळी प्रगती होऊनसुद्धा, एवढं सगळं संपत्तिमान वाढूनसुद्धा, दरडोई उत्पन्न का वाढलं नाही याचं उत्तर आपणाला बरोबर सापडत. एरव्ही काळाबाजार, कर चुकवेगिरी, स्मगलिंग करणारे लोक केवळ प्रदर्शनासाठी ज्या वेळेला राष्ट्रप्रेमाचं नाटक करतात त्या

वेळेला ते खोटं असतं हे आपणाला दिसून येतं. ज्याच्या बाथरूम-मध्ये कोटयावधी रुपयांची संपत्ती दडवून ठेवलेली सापडली अशा बातम्या आपण वाचलेल्या असतात ; ती माणसं पदर पसरून आपल्या भोवती ज्या वेळेला एखाद्या राष्ट्रप्रेमाचं नाटक करून मदत गोळा करायला येतात त्यावेळी त्यातल्या विरोधाभासाची कीव येते, किळस येते. प्रत्यक्ष आयुष्यामध्ये देशद्रोह करणारी अशा प्रकारची माणसं वरकरणी केव्हा केव्हा नाटक करतात. त्यावेळे-ला फसून जाण्यामध्ये स्वारस्य नाही. हे जर आपण लक्षात घेत-लंत तर या देशातील संपत्ती वाढूनसुद्धा गरिबांच्या खिशात अ-जून पैसा गेलेला नाही हे सत्य आपल्याला नाकारता येत नाही.

आणि कदाचित या सत्याचा साक्षात्कार झाल्यामुळे गेल्या सहा-महिन्याच्या काळामध्ये जो आणिबाणीचा असा एक झगझगीत झोत आपल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक सग-ळयाच जीवनामध्ये प्रकाशासारखा आलेला आहे. त्याच्या मागची कारणमीमांसा आपल्याला समजू शकेल. कुठेतरी काहीतरी प्रचंड प्रमाणात गमावतो आहोत; याला खीळ कुठेतरी घातली पाहिजे. विकासाचा गाडा चालल्याचा नुसता आवाज होतोय. तो चालले-लाच नाही. त्याची चाकं फक्त एकाच जागेवरती फिरत आहेत. दोन चार माणसांच्या दारांतच ती फिरताहेत. चाके फिरल्यामुळे आपल्याला वाटते की रथ पुढे चाललेला आहे. रथ पुढे चालले-लाच नाही. आणि म्हणून हा रथ त्या चार चौघांच्या दारांतला काढून आता तो समाजाच्या प्रांगणामध्ये आणून ठेवण्याचं काम या काळामध्ये चाललं आहे, असं जर मी म्हटलं तर ते अतिशयो-क्तीचं होणार नाही. आणि म्हणून वेग आणि शक्ती हा शब्द वापरलेला आहे – सामाजिक परिवर्तनाचा वेग – मंदावलेली गती सगळयांनाच जाणवलेली आहे. मला जाणवलेली आहे – तु-म्हांला जाणवलेली आहे. गरिबाला तो बऱ्याच वेळेला गरिबी-मुळे जाणवलेली नसते. भूक लागून लागून भूक मेली की भूक कळत नाही. ही अत्यंत विपन्नावस्था आपल्या देशामध्ये येण्याइत-

पण परिस्थिती निर्माण झाल्यानंतर आज जर त्याला गती दिली नाहीतर हा गाडा कोलमडन पडेल अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर हा एक नवा प्रयोग चालला आहे. असं निदान माझ्या दृष्टीला वाटतं. त्यासाठी काही किंमतही मोजावी लागेल. सर्व अधिकार, सुखोपभोग भोगणारे, परंपरेने, संस्कृतीने ज्याला सगळेच अधिकार ( Previlages ) म्हणतात. उपभोगता आले त्यांना आपल्या हक्कावरती गदा आल्यामुळे कदाचित हे काय चाललंय, काहीतरी विपरीत चाललंय आमच्या स्वातंत्र्यावरती किंवा आमच्या उत्कर्षावरती गदा येतेय असं वाटले तरी ज्या समाजवादाचं कंकण या देशाने बांधले त्या समाजवादादाच्या दिशेने प्रगतीकरण्यामध्ये हे जर अडथळे म्हणून येत असतील तर ते अडथळे दूर केले पाहिजेत. समाजाच्या अंतिम हिताच्या दृष्टीने हा विचार समजावून घेण्याची वेळ आज आलेली आहे. या राजकीय परीवर्तनाबरोबर ज्या चांगल्या गोष्टी आम्ही आज जगापुढे मांडतो आहोत. त्या राजकीय परिवर्तनाबरोबरच जे आर्थिक परिवर्तन व्हायला हवे होते, जे सामाजिक परिवर्तन व्हायला हवं होतं ते न झाल्यामुळे ती दिशा मात्र आपण चुकलो आणि म्हणून सुकाणू फिरवून कुठल्यातरी ध्रुवाकडे लक्ष ठेवून थोडसं मार्गस्थ होण्याचा प्रयोग आपण करतो आहोत आणि म्हणून वेठ बिगारी नष्ट होत आहे; म्हणून कर्जमुक्ती कायदा कर्जामध्ये बुडालेल्या लोकांची गुलामगिरीतून त्यांना मुक्त. करण्याचा प्रयोग चालू आहे; म्हणून भूमिहीनांना भूमी देण्याचा प्रयोग चालू आहे; म्हणून गृहहीनांना घरं देण्याचा प्रयोग चालू आहे; उद्योग नसलेल्यांना पोटापुरते मिळेल अशा प्रकारचा उद्योग देण्याचा प्रयोग चालू आहे. प्रचंड प्रयोग ! वाटतं तितकं सोपं नाही. जादूच्या कांडीने करता येण्यासारखं हे काम नव्हे. पण याची तीव्र जाणीव होण्या इतकी परिस्थिती आज झाली असल्यामुळे आज त्या लोकांचा – त्या दलितांचा दूरगामी विचार करण्याची गरज असल्यामुळे, मला असं वाटतं की समाजामध्ये याचदृष्टीने अधिक जागृती व्हायला हवी.

भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा व वेग हा विषय घेत असताना माझ्या मनासमोर हा वर्तमानकालीन संदर्भ होता. आणि माझी अशी खात्री आहे की या देशामध्ये याच्यापुढे एअरटाईट कंपार्टमेंट मधील विषयांची चर्चा कमी होईल तितकी बरी. पण त्यामुळे ज्याचं पोट उपाशी असतं त्याला काहीच मिळत नाही. आणि शब्दाच्या शृंगारिक आणि आकर्षित आतषबाजीने भूकेपोटी व्याकुळलेल्या माणसाला समाधान लाभत नाही आणि म्हणून अशा एका वर्तमानकालीन संदर्भावरतीच आपण बोललं पाहिजे असे माझ्या मनानं ठरविल्यामुळे मी हा विषय घेतला. सामाजिक परिवर्तनाचा असा कोणता मार्ग आपण स्वीकारतो आहो ? त्यातून काही कटुता येईल. मनाविरूद्ध करावं लागेल, संयम पाळावा लागेल, स्वःताच्या सुखाला कात्री लावावी लागेल. आणि समाजाची तशी तयारी होण्यासाठी तशा प्रकारचा विचार समाजापर्यंत पोहोचला पाहिजे :असं मला वाटतं. कारण या देशामध्ये ६० टक्यांहून लोक दारिद्रयाच्या रेषेखाली जगतात ही काही या देशाला मोठी भूषणावह गोष्ट नव्हे. हे ज्यांनी आतापर्यंत उपभोग घेतले त्यानी पहिल्यांदा लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. आणि म्हणून आपली जादा जमीन काढून घेतली म्हणून दुःख करण्याचे किंवा आपल्या हक्कावरती गदा येते असं मानण्याचं काही कारण नाही. परंतु ज्या समतेचा, स्वातंत्र्याचा, बंधुत्वाचा आपण उद्घोष करतो याच्यावरतीच आधारलेलं हे राजकारण आहे. याच्या बाहेरचं नाही. त्याला तडा जाऊ नये.

समाजवादाची आजची कल्पना बदललेली आहे. ती सगळया मनुष्यमात्रामध्ये असलेल्या एकत्वाचा शोध घेण्याच्या दृष्टीने जी एक नवीन रचना, अर्थरचना आणि सामाजिक रचना आपणाला करायची आहे. त्याला प्रौढ समाजवाद असं एक नवीन नांव आलेलं आहे आणि म्हणून काही विचारवंत त्याला मॅच्युअर सोशॉलिझम ( Mature Socialism) असं म्हणतात. परिपक्व समाजवाद ! कारण यापूर्वी होऊन गेलेल्या अनेक घटनांचा, अनेक अनु-

भवांचा आधार घेऊन त्यात काय काय बदल करायचे हे ठरवून त्याच्या प्रमाणें त्या मूल्यांची पुनर्रचना करत जायचं असल्यामुळे काही गोष्टी मुक्त ठेवून, कांही गोष्टी बंधनांत टाकून या गोष्टी साधाव्या लागणार आहेत. असा विचार त्या दृष्टीने आज समाजामध्ये येतो आहे. आणि म्हणून हा एक दुसरा विचार तुमच्या विचारासाठी मी ठेवतो. या आर्थिक परिवर्तनाच्या संदर्भामध्ये आमचं नियोजन काही ठिकाणीं यशस्वी होऊनसुद्धा कृषि प्रधान अर्थ व्यवस्था दुष्काळाच्या तावडीतून पुन्हा बाहेर काढण्याचा उमेदीचा प्रयत्न करून सुद्धा, उद्योगधंद्याच्या क्षेत्रामध्ये नेत्रदीपक प्रगती करून सुद्धा ही आर्थिक पुनर्रचना करण्याच्या बाबतीत आपण यशस्वी झालो नाही असं दुःख या सामाजिक परीवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळे हा विचार मी आपल्यापुढे मांडला आणि त्याच्या संदर्भात तिसऱ्या विचाराकडे येतो.

खरं म्हणजे हे सगळं करण्यासाठी जी एक मानसिक परिवर्तनाची बैठक लागते दुर्दैवाने तीच सबंध स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आपण गमावून बसलेलो आहोत. मार्क्स तत्वाज्ञानामध्ये सांगितलं गेलं की समाजाची बाह्य परिस्थिती सुधारली, त्याला खायला प्यायला चांगलं मिळालं, त्याला समाधान लाभलं, त्याच्या सगळ्या गरजा पूर्ण झाल्या, की त्याचे विचार आपोआपच बदलायला लागतात- त्याच्या विचारामध्ये मुद्दाम क्रांतीकरण्याची गरज पडत नाही. त्याच्या बाह्यसृष्टीमध्ये त्याच्या बाह्य जीवनामध्ये फरक घडला की आपोआपच त्याच्या विचारांमध्ये फरक घडतो, दुर्दैवाने या देशामध्ये हे सत्य लागू पडणारं नाही. या देशामध्ये बाह्यकारी बदल जरी आपण केले, बाह्यकारी जरी लोकशाही आणली, बाह्यकारी आपण सामाजिक पुनर्रचनेचा, आर्थिक पुनर्रचनेचा विचार केला तरी मनामध्ये अजून जी क्रांती व्हायला पाहिजे ती झालेली नाही. म्हणून अप्रामाणिकपणे संपत्ती जमवणारे लोक या देशामध्ये जास्त संख्येने आहेत. म्हणून स्वार्थावर ती आधारलेली व्यक्तिजीवने उभारणारे लोक या देशामध्ये आहेत. त्याच कारण हे

आहे की जी मानसिक क्रांती अभिप्रेत असते ती मानसिक क्रांती अजून या देशामध्ये झालेली नाही. हे मानसिक परिवर्तन झाल्याशिवाय या आर्थिक, सामाजिक, राजकीय परिवर्तानाला पूर्ण अर्थ कधीच प्राप्त होणार नाही. हे छोटी छोटी उदाहरणे देऊन सांगता येईल राजकीय क्षेत्रामध्ये आपण जी लोकशाही आणली. मतदानाचे हक्क वगैरे आणले. मतदानाच्या हक्काची सामर्थ्ये अजून आपल्या मनाला कितपत कळलेली आहेत ? बऱ्याच वेळेला त्या बाबतीत निराशाच पदरात येते. आज एक लेख कुठेतरी वाचला. स्त्रिया फार सुधारल्या असं आपण म्हणतो. फार सुधारणा झाली. वैचरिक सुधारणा झाली, त्यांना कायद्याने अधिकार मिळाले. समान हक्क मिळाले. स्त्रीला मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. पण मतदान कसे होत होते? पातिव्रत्याच्या कल्पनेचा तिच्या मनावरती इतका पगडा असतो की त्या पातिव्रत्याचा भंग करतो असं वाटत असल्यामुळे आपल्या नवऱ्याचं जे मतअसेल तेच आपले मत; आपलंही मत त्याच पेटीत जाणार असं एक उदाहरण एका स्त्रीच्या संदर्भात आजच कुठेतरी एका लेखामध्ये वाचलं. वाचल्यानंतर लक्षात आलं की मी जी मानसिक क्रांती अभिप्रेत आहे असं म्हणतो ती मानसिक क्रांती इथं अपेक्षित आहे. पातिव्रत्याची एकाकाळी समाजाच्या आवश्यकतेनुसार निर्माण झालेली कल्पना लोकशाहीच्या मूल्याशी जर आपण जोडली तर ते लोकशाहीचं मूल्यच आपण गळा घोटून मारून टाकतो हे आपल्या लक्षात येत नाही. जे मूल्य एका काळामध्ये प्रतिष्ठित झालं ते मूल्य नवीन काळामध्ये प्रतिष्ठित झालेल्या मूल्याला लावून त्या मूल्यांची जर बरोबरी करण्याचा प्रयत्न केला तर काहीच साधत नाही. धड पातिव्रत्यही साधत नाही धड लोकशाही ही साधत नाही. आपणाला नेहमीच्या उदाहरणांत आढळते की देवीच्या रोगाच्या बाबतीत किती अपसमज लोकांच्या मनात असतात. देवी म्हणजे कुठलीतरी आधिदैविक अशा प्रकारची शक्ती असल्यामुळे देवीची माहिती कळवायची नाही, अंगारे धुपारे करत रोग बरा होईल म्हणून प्रयत्न करायचे. डॉक्टर वगैरे आला तर त्याला

सांगायचे नाही ! मेडिकल सायन्स इतकं पुढं जाऊन सुद्धा, विज्ञानाने हे सिद्ध करून सुद्धा, या माणसाच्या मनापर्यंत या विज्ञानाचा विचार पोहोचलेलाच नाही. म्हणून डॉक्टर आला की रोगी पळवायचा. माहिती कळवायची नाही. नुकतेच एका घरात देवीची लागण झाल्याची बातमी एका मनुष्याने दिल्यामुळे त्या मनुष्याला जाळून मारण्यात आल्याचे उदाहरण वर्तमान पत्रांत मी वाचले. अशा विसंगती आपल्या जीवनात आहेत. ह्या विसंगती असल्यामुळे जे राजकीय परिवर्तन होतंय, जे सामाजिक, आर्थिक परिवर्तन होतंय त्या सामाजिक, आर्थिक राजकीय परिवर्तनाचे सगळे लाभ हे मातीत जिरून जाणाऱ्या पाण्याप्रमाणे निष्फळ जिरून जातात. कितीतरी बाबतीत. अजूनही आधिदैविक, धार्मिक अशा प्रकारच्या समजुती वरती अवलंबून राहिल्यामुळे या नव्या मूल्यांची आज एक शोकांतिका होऊन एक संभ्रनावस्थेत आपला समाज सापडलेला आहे. म्हणून या मानसिक क्रांतीची आजच्या घटकेला अधिक गरज आहे.

केवळ माणसाला पोटाला चांगलं खायला दिल्यावर भागणार नाही. हे चांगले खायचं ? ते कसं निर्माण करायचे ? हा विचार जर त्याच्या पर्यंत पोहोचणार नसेल तर त्याच्या नुसत्या खाण्याला अर्थ नाही, म्हणून त्याच्या पोटापर्यंत पोहोचत असताना त्याच्या मनापर्यंत पोहोचण्याचा सुद्धा प्रयोग केला पाहिजे. आणि मला असं वाटतं की आपल्या गेल्या वाटचालीमध्ये आपण त्याच्या शरिरापर्यंत पोहोचण्याचा प्रयोग केला. त्याच्या बाह्यांगाला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या सार्वजनिक जीवनाला आकार देण्याच्या दृष्टीनं, त्याला तसे शिक्षण देण्याच्या दृष्टीनं, तसे विचार रुजविण्याच्या दृष्टीनं काही अल्पसे प्रयोग झाले असतील परंतु त्यात फारसे यश आले नाही. या देशात आगरकर जन्माला येवून सुद्धा बुद्धिनिष्ठा आणि विवेकनिष्ठा या देशात रुजलेली नाही. ज्योतिबा फुले या देशात

जन्माला येऊन सुद्धा, राजर्षी शाहू सारखा एक समाजसुधारक नेतृत्त्व देणारा राजा होऊन सुद्धा, खऱ्या अर्थाने समानता अजून आमच्या समाजामध्ये आलेली नाही. याचे कारण काही एका संकेतांचं, काही एका जुन्या विचार प्रणालींचं, परंपरेचं असं एक प्रचंड दडपण आपल्या मनावरती असतं. त्याच्यातून अजून आपण बाहेर पडू शकत नाही. जातीभेदाचं उदाहरण घ्या. कितीतरी सामाजिक चालीरीती आहेत. हुंड्याच्या चालीरीती–वरती पंतप्रधान तर रोजच बोलतात. अशा कितीतरी बुरसलेल्या कल्पनांच्या चौकटीत आमचे आत्मे गुदमरलेले असल्यामुळे; धर्मकल्पनांमध्ये, भूताखेताच्या कल्पनांमध्ये जुन्या चाली–रीतीमध्ये हे सगळे आमचे आत्मे गुदमरलेले असल्यामुळे-बाह्य-करणी आमच शरीर जरी सुधारल्या सारखं दिसत असलं तरी खऱ्या अर्थाने ते सुधारलेलं नाही. अंतर्गत विरोधामुळे प्रगतीची जेंवढी फळं आम्हांला मिळाली पाहिजे. तेवढी मिळत नाहीत. हरिजनांना कायद्याने पूर्ण अधिकार दिले. समानता दिली सगळं काही दिलं. पण अजूनही एखादा हरिजन गाडीमध्यें जवळ येऊन बसू लागला तर सवर्ण अंगचोरून बसतो. आपल्या अंगरख्याला माती लागेल म्हणून एखादा गरीब शेतकरी आतल्या बाजूला येऊन बसला तर आपण अंग संकोचतो. भूमिपुत्र असल्यामुळें तो मातीत खेळणारच. आणि त्या मातीशी माझाही संबंध असल्या–मुळे थोडी माती लागली तर चालेल. असं म्हणण्या इतकी आपल्या मनाची अजून तयारी झालेली नाही ही नेहमीच्या जीवनातील उदाहरणे दिसताहेत बहुसंख्य समाज असा असल्या–मुळे जो पर्यन्त या आचारांमध्ये, विचारांमध्ये बदल घडत नाही तो पर्यन्त या आधुनिक मूल्यांचा कितीही उद्‌घोष केला, बाह्य–करणी ती आपल्या जीवनांत उतरत आहेत असे वाटले तरी ती निष्प्रभ ठरतात, त्याचे परिणाम व्हायला हवे ते होत नाहीत हे या विरोधाभासाचं उत्तर सापडतं.

एवढं सगळं होऊन सुद्धा त्याची फळं का मिळत नाहीत? काही वेळा पोटभर खायाला का मिळत नाही ? त्यास प्रतिष्ठा का मिळत नाही ? हरिजन शिक्षक गावात आले तर त्यांना रहायला घर मिळत नाही. सरपंच सुद्धा त्याला विरोध करतो. म्हणजे लोकशाहीच्या आधारावरती, नव्या मूल्यावरती अधिकार प्राप्ती करून घेतलेल्या माणसाला सुद्धा लोकशाहीचे अधिष्ठान असलेली ही समता समजलेली नसते हा केवढा मोठा विरोधाभास ! ही मूलभूत अशा प्रकारची मूल्ये आपल्या जीवनामध्ये आणत असतांना सांकेतिक जुन्यापुराण्या मूल्यांशी जर टक्कर होत असेल तर ही सांकेतिक मूल्ये पहिल्यांदा उखडून टाकली पाहिजेत. या अंतरविरोधामुळे आपले जीवन समृद्ध होऊ शकत नाही. म्हणून आपल्याला दारिद्रच दिसतं,म्हणून आपल्याला अज्ञान दिसतं किती अज्ञान, किती दारिद्रच आपल्या देशामध्ये आहे. रस्त्यावरून नुसती फेरी मारली तरी तुमच्या लक्षात येईल. आरोग्याविषयी अज्ञान, शिक्षणाविषयी अज्ञान, समाजातल्या विज्ञानाविषयी अज्ञान अशी कितीतरी उदाहरणे पाहिली आहेत. एका खेडचात जाण्याचा प्रसंग आला. वाद करावा लागला. कुठल्या विषयावरती ? आश्चर्य वाटेल तुम्हाला तो मला म्हणत होता की चंद्रावरती मनुष्य पाऊल ठेवणंच शक्य नाही. खोटं नाटक अमेरिकेने केलं ! आता काय करणार याला ? त्याच्याशी वाद करताना तो मला विचारतो की तुम्हीं पाहिला होता का चंद्रावरती मनुष्य चालताना, उतरताना ? असा वाद घालणारी मनाने मागासलेली सामाजिक परिस्थिती आपल्या भोवती दिसते. शंकरराच्या मस्तकावरती असलेल्या चंद्रावरती मनुष्य पाय ठेवणार ? कसं शक्य आहे ? असा प्रश्न ज्यावेळी गावामधून अजूनही विचारला जातो. त्या वेळेला मग आपल्याला त्याच्या शेतामध्ये नवं अवजार, त्याच्या शेतामध्ये नवा विचार, त्याच्या शेतामध्ये नवं बी बीयाणं पोचवतांना किती कष्ट करावे लागत असतील ही गोष्ट तुमच्या लक्षांत येईल. ही केवळ फुटकळ उदाहरणे दिली आहेत. अशी कितीतरी उदाहरणे देता

येतील. अशिक्षितांची नव्हे, सुशिक्षितांची सुद्धा देता येतील. एखादी लुंगी लावलेली विद्यार्थिनी किंवा बेलबॉटम घातलेली विद्यार्थिनी मुंबईमध्ये फेरफटका मारताना जर तुम्हाला त्या प्रभादेवीच्या सिद्धी विनायकाच्या रांगे मध्ये दिसली तर आश्चर्य नाही वाटायचं ! बाह्य वेषाने अत्यंत आधुनिक झालेली ही मंडळी आपल्या विचाराने किती मागासलेली असतात? धर्मश्रद्धा वेगळी! वैयक्तिक धर्माच्या विचारात मी येथे शिरत नाही. परंतु विज्ञानाच्या कॉलेजात शिकणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनी ज्यावेळी अशा प्रकारचे वर्तन करताना दिसतात त्या वेळेला आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही. हे जे आंतरविरोध आहेत त्यांनी आम्हाला खाऊन टाकलेले आहे. सामाजिक परिवर्तनामध्ये जर सगळयात मोठा अडथळा कोणता निर्माण झालेला असेल तर आमच्या मानसिक स्थितीमध्ये जो बदल मधल्या काळामध्ये होऊ घातलेला होता तो स्वार्थाची वृत्ती बोकाळल्या मुळे, अर्थार्जनाकडे ज्यास्त लक्ष दिल्यामुळे, नैतिक जाणिवा दुर्बळ झाल्यामुळे, सामाजिक जबाबदारीची जाणीव कमी झाल्यामुळे हळूहळू गळून पडायला लागला आणि त्याचा संपूर्ण संदर्भ आज बहुतांशाने तुटलेला आपल्याला दिसतो. हा आपला मोठा पराभव आहे. म्हणून सगळे विधायक घडते त्याचे परिणाम दिसत नाहीत. सगळं उगवतं पण त्याचं फळ पदरांत पडत नाही. अशी जी परिस्थिती आपणाला दिसते. नव्यामूल्यांना सामावून घेणारी जी एक नवी विचारधारा प्रत्येक व्यक्तिमात्रामध्ये निर्माण व्हायला पाहिजे, समाजामध्ये निर्माण व्हायला पाहिजे, ती अजून झालेली नाही, अजून धर्माधर्मावरती जाती जातीवरती, पंथापंथावरती, देवदेवतावरती, गावागावामध्ये तंटे होतात. होळीचा मान कोणी घ्यायचा याच्यावरती आमच्या कोकणामध्ये मारामाऱ्या होतात. दोन तट पडतात. खून करण्यापर्यंत मजल जाते केवढा दैवदुर्विलास हा ? या वर्षी दंडाधिकाऱ्यांना हुकूम काढावा लागला, की अशाप्रकारचं वर्तन करणाऱ्या माणसाला मिसा खाली अटक करण्यात येईल. देशद्रोहा सारखंच हे काम

आहे. असा विचार त्या हुकूमाद्वारे माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी ही खटपट करावी लागते. त्या पातळीवरती खाली उतरावं लागतं. या देशातील पंतप्रधानांना हुंडयाच्या विरूद्ध मधून मधून बोलावं लागतं. किती क्षुद्र विषय आहे हा, वास्तविक पंतप्रधानांच्या दृष्टीनं ? पण त्यांना बोलावं लागतं. ही शोकांतिका आहे या समाजाची, आपल्या सामाजिक कार्यकर्त्यांची, आपल्या सामाजिक पुढाऱ्यांची ! हे आपण आपल्या समाजात रुजवू शकलो नाही. पंतप्रधानांना सगळ्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचे, देशाचे राजकारणाचे विषय सोडून स्त्री स्वातंत्र्यावरती, हुंडा मुक्ततेवरती आजही बोलावं लागतं. ही मोठी भूषणात्मक गोष्ट नाही !

नव्या विचारांना फलद्रूप करणारी अशा प्रकारची जी नवी मानसिक विचारसरणी आपल्यामध्ये आली पाहिजे ती आलेली नाही. धर्माच्या खोटया कल्पना आपल्या मनामध्ये असतात. धर्म हा खोटया कल्पनेच्या पलीकडे असतो. खरा धर्म हा कुठल्याही विधिलिखितामध्ये मानलेला नसतो. खरा धर्म हा निरर्थक आचारांचा नसतो. तुम्ही सकाळी उठल्यावर संध्याकाळी झोपेपर्यंत देवाला किती वेळ नमस्कार करता याच्यावरती धर्म अवलंबून नसतो. तुम्ही किती वेळा स्नान संध्या करता याच्यावरती धर्म अवलंबून नसतो. तुम्ही कोणाला अस्पृश्य लेखता याच्यावरती धर्म अवलंबून नसतो. तुमच्या मनावरची बंधने किती मुक्त झाली आणि त्यामुळे तुमचे कल्याण आणि त्याच बरोबर इतरांचे कल्याण साधण्याची क्षमता तुम्ही किती प्राप्त करून घेतली याच्यावरती धर्म अवलंबून असतो. आपली धर्माची अभिमान वाटण्यासारखी व्याख्या ही अशी आहे. " धारणात् धर्ममित्याहु धर्मात् धारयते प्रजा " जो समाजाची धारणा करतो तो धर्म. समाज विस्कळीत होऊ लागला, समाज अधःपतित होऊ लागला, समाज दिशाहीन झाला की त्याला नवीन मूल्य देऊन जुन्य मूल्यांची पुनर्रचना करून उत्थापनाला जो प्रेरणा देतो त्याला धर्म म्हणतात अशी आपली] व्याख्या आहे. त्याला

अनुसरुनच भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात, " स्वधर्मे निधनम् श्रेय: परधर्मो भयावहः ! " त्यातला धर्म हा हिंदुधर्म नसतो. त्यातला धर्म ख्रिश्चन धर्म नसतो. त्यातला धर्म हा सत्धर्म असतो. हा सत्धर्माचा विवेक आपल्या या नव्या मूल्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी वापरला नाही तर आजची जी परिस्थिती आपल्याला दिसते तीच परिस्थिती सदैव काळ आपल्याला भोगावी लागेल. म्हणून या मूलभूत कल्पना पुन्हा नव्याने शिकविण्याची गरज निर्माण झालेली आहे. वास्तविक या सामाजिक पुनर्रचनेचा, सामाजिक परिवर्तनाचा विचार हा नवीन नाही! " संगच्छध्वं संवदध्वं संयो मनांसि जानताम् । " संगळयानी बरोबर गेले पाहिजे, सगळयानी एकसाथ व्यवहार केला पाहिजे. सगळयांचे मन एकात्म झाले पाहिजे असं ज्या वेळी आमचे ऋषी ऋग्वेदात सांगतात तेव्हा ते समाजवादाचीच कल्पना मांडत असतात. ' समाना आकृती व: समानानि हृदयानि व: ।' असं ज्यावेळी आपण म्हणतो, आकारांनी आणि मनाने आम्ही समान आहोत, असं ज्यावेळी ऋषी हात उभारून सांगतात त्यावेळी ते समतेची लोकशाहीच सांगत असतात. " जे का रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले; तोचि साधु ओळखावा देव तेथेचि जाणावा " असे तुकाराम महाराज ज्या वेळी म्हणतात, त्यावेळी लोकशाही व समाजवादाच्या ठायी असलेली मूलभूत माणुसकीची प्रेरणाच सांगत असतात. " दुरिताचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ॥" असं ज्या वेळी ज्ञानेश्वर सांगतात त्यावेळी ते खरा धर्म सांगत असतात. या सगळयांची नावं घेऊन ज्ञानेश्वराचं नाव घेऊन, तुकारामाचं नाव घेऊन ऋषींचं नाव घेऊन आम्ही मात्र जो धर्म पाळतो तो नेमका याच्या विरूद्ध असतो. तो खुळया आचाराचा धर्म, पूजा अर्चेचा धर्म, तो खोटया कल्पनेचा धर्म असतो. तो समाजातली विषमता वाढविणारा धर्म असतो. तो चातुर्वण्याची घातक कल्पना मनामध्ये रूजवणारा धर्म असतो. या धर्माला आपल्या धर्मामध्ये खरोखर

थारा नाही. आपलाच धर्म पुन्हा नव्याने सांगण्याची वेळ आज आलेली आहे. तो धर्म सांगण्याचा प्रयोग महात्माजींनी एके काळी केला. तो प्रयोग विनोबाजी आज करीत आहेत. पण आज त्यांच्याकडे लक्ष द्यायला आपणाला वेळ नाही. त्यांना सांगायला भरपूर वेळ आहे. आमच्याकडे ऐकायला वेळ नाही ! हा किती दारूण विरोधाभास ! विनोबासारख्या ऋषितुल्य माणसाला धर्म सांगण्याला भरपूर वेळ आहे. त्यांच्याकडे जाऊन ऐकायला आ–म्हांला वेळ कोठे आहे ?आम्हांला पैसे कमवायचे आहेत, आम्हा-ला स्वार्थ साधायचा आहे, आम्हाला अन्याय करायचे आहेत; आम्हाला विषमता पाळायची आहे. हे सगळं करीत असताना धर्म आहे का नाही हे पहायला वेळ कुठे आहे. आणि वर त्यांची आ-म्ही टिंगल करणार! त्याच्या सर्वोदयाची आम्ही टिंगल करणार! त्यांच्या भूमिदानाच्या चळवळीची आम्ही टिंगल करणार ! कारण आम्ही स्वतःला पुढारलेले, विद्वान, बुद्धिनिष्ठ, व्य-क्तिस्वातंत्र्यवादी वगैरे वगैरे मानून घेण्यात मग्न झालेले आहोत!

हा विरोधाभास ज्या वेळेला आपण लक्षात घ्यायला लागतो त्या वेळेला या समाजाचे दुखणे नेमकं काय आहे हे आपल्या लक्षात यायला लागलं. मूल्यांची आलटापालट करणे म्हणजे सुधारणा नव्हे. जी आम्ही जुनी मूल्ये टाकून दिली आणि नवी मूल्ये स्वी-कारली म्हणजे काय ? मानवी मूल्ये समाजहितकारक,व्यक्ति हि-तकारक असतील; मग ती जुनी नवी असा भेद आपणाला करा-वाच लागत नाही! मूल्यांच्या बाबतीत जुनं नवं असं काही असतच नाही. मूल्यांच्या बाबतीत एकच प्रमाण असू शकतं की, हे मूल्य व्यक्तीच्या त्याचप्रमाणे समाजाच्या धारणेसाठी किती समर्थ आहे. याच्यावरतीच त्या मूल्यांची योग्यता व सामर्थ्य अवलंबून असतं. आणि म्हणून हे मनाचं मूल्य, हे आत्म्याचं मूल्य, ज्या वेळी बुध्दी-ला जोर देईल, आपल्या विचाराला जोर देईल, आपल्या भावने-ला जोर देईल त्या वेळी आपल्या पूर्वजांनी, आपल्या ऋषींनी, आपल्या संतांनी सांगितलेली आदर्श समाजाची खऱ्या परिवर्तना-

ची दिशा आपल्याला सापडेल. त्या दैदीप्यमान दिशेकडे मी वळलोच नाही. कारण ती दिशा फारच अवघड आहे. " जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परें पडो ! मैत्र जिवांचे " ही फारच पुढची दिशा आहे. ती सांगितली ज्ञानेश्वरांनी ! दुर्जन जगातून नाहीसे होऊ दे असं नाही ते म्हणाले. दुष्टांचं निर्दालन करू या असं नाही म्हणाले. माणसांमध्ये दुष्टपण असते ते नाहीसं होऊ दे, म्हणजे निर्मल–स्वच्छ– मांगल्यकारक मनुष्यत्व शिल्लक राहिलं ते हवे आहे. मनुष्य नाही मारायचा! मार्क्ससारखेच ज्ञानेश्वर सांगतात. मार्क्सने हेच सांगितल. की भांडवलशाही विचाराची ही कीड मारायची. मार्क्सने असं सांगितलं की त्याची वृत्ती मारायची. त्या माणसाला नाही मारायचं " खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । " सत्कर्म करण्याकडे त्याच्या मनाची प्रवृती होवो. " भूतां परस्परे पडो । मैत्र जिवाचे " आणि या भूतलावरती जन्मलेल्या केवळ माणसातच नव्हे तर जन्म घेतलेल्या प्रत्येक प्राणिमात्रात मैत्र-सेवाभाव निर्माण होवो. लोकशाहीच्या समाजवादाच्या पलीकडचा हा वाद आहे. विनोबाजी त्याला सर्वोदयवाद म्हणतात.

शोकांतिका ही आहे की संपूर्ण समाजाला सद्धर्माचा, कल्याणाचा मार्ग दाखविणारा एवढा प्रचंड बुध्दिमत्तेचा ऋषितुल्य मनुष्य आपल्यात असताना, आमची कुवत नसल्यामुळे ती दिशा आम्ही पाहू शकत नाही. तो त्यांचा पराभव नव्हे, बऱ्याच वेळेला लेख येतात वर्तमानपत्रातून की यांचं तत्त्वज्ञान अपयशी आहे ! यांचं तत्वज्ञान पराभूत आहे! यांना काहीच साधलेलं नाही! ते तसे नसते! आमची क्षमता वाढलेली नसते! ते स्वीकारण्यास आम्ही दुबळे असतो आणि आम्ही दुबळे असल्यामुळे तिथपर्यंत जाऊ शकत नाही. तो त्या पर्वताच्या उंच शिखरावर बसलेल्या माणसाचा दोष नव्हे. आम्ही तिथपर्यंत जाऊ शकत नाही. ती शक्ती आमच्या पायामध्ये आम्ही अजून आणलेलीच नाही. पूर्ण राज-

कीय विचारांचे, पूर्ण सामाजिक परिवर्तनाचे, पूर्ण आर्थिक परिवर्तनाचे, एवढेच सत्य आम्हाला सध्या गाठायला अवघड होते आहे तेवढेच गाठूया. हे सत्य फारच पुढचे आहे. हा जो परिवर्तनाचा प्रयोग वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये अगदी पूर्वीपासून सुरू आहे. माणसाला बदलण्याचा प्रयोग माणसाच्या निर्मितीपासूनच सुरू झालेला आहे. माणसालाच माणसाने बदलायचे असते. ज्यावेळी माणसाने अणुकुचीदार दगड तासला. बाण शोधून काढला त्यावेळी त्याला आपल्या जीवनामध्ये परिवर्तन करण्याची ईर्षा होती म्हणून त्यांनी हे सगळं केलं. पण त्या वेळच्या अवस्थेतल्या परिवर्तनाचा अडथळा आणि आजच्या प्रगतकाळातील परिवर्तनाचा अडसर एक असू शकत नाही. माणसाला इतर प्राणिमात्राप्रमाणे बुध्दी आणि भावना या दोन गोष्टी जरी असल्या, कुत्रा, मांजर यांना भूक लागते, ते माणसावर माया करतात, त्यांना ही भावना असते, असं जरी असलं तरी या जगतामध्ये – गतिमान असलेल्या या विश्वामध्ये जन्माला आलेला मनुष्यप्राणी हा एकच असा आहे की ज्याची बुद्धी आणि भावना ही देखील गतिमान असतात. गतीशिवाय पुढचं पाऊल तो टाकूच शकत नाही म्हणूनच त्यानं चंद्रावर पाऊल टाकलं. ते इतर प्राण्यांना जमत नाही. ठराविक वेळ झाली की कुत्रं अन्न खायला येणार. त्याच्या पलीकडे त्याला समजत नाही त्याच्या पलीकडे तो प्रगती करू शकत नाही. मनुष्यमात्राला याच्या पलीकडची शक्ति परमेश्वराने दिलेली आहे. बुद्धीला आणि भावनेला गती देऊन आपल्या मनासारखं विश्व कसं घडवायचं याचे ज्ञान माणसाला असल्यामुळे हे ज्ञान समजावून घेणे जरूर आहे. ज्ञानामध्ये या परिवर्तनाचं मूळ आहे अस जर मी म्हटलं तर ते आतापर्यंतच्या प्रचलित तत्त्वज्ञानाच्या विरूद्ध होईल असं मला वाटत नाही.

या परिवर्तनाचे जे काही वरकरणी दिसणारे घटक होते त्या संबंधींचे विवरण मी आता केले. उद्याच्या माझ्या भाषणामध्ये

या परिवर्तनाच्या प्रयोगासाठी कुठली कुठली साधनें उपलब्ध आहेत कुठली कुठली क्षेत्रे उपलब्ध आहेत आणि या क्षेत्रांमध्ये या साधनांच्या द्वारे आपणाला किती वेगाने पुढे गेले पाहिजे, किती वेगाने पुढे सरकलो किंवा सरकलो नाही. याचं विवरण मी करीन. तेव्हा आजचं हे भाषण या ठिकाणी संपवितो. आणि आजच्या या भाषणाला उपस्थित राहून अत्यंत एकाग्र चित्ताने माझे विचार आपण ऐकून घेतलेत या बद्दल मी सगळ्यांचे मनःपूर्वक आभार मानून आजचे भाषण संपवितो.

**जयहिंद !**

आजच दुसरं व्याख्यान सुरू करण्यापूर्वी एक दोन महत्वाच्या गोष्टी, केवळ उपचार म्हणून नव्हे, तर मनापासून करणार आहे त्याच्यापैकी एक गोष्ट म्हणजे पुस्तक प्रकाशनाची. या व्याख्यान-मालेमध्ये आतापर्यंत जे जे नामवंत वक्ते भाषणे करून गेले त्यांच्या विचारांचे संकलित अशाप्रकारचे रूप पुस्तकरूपान प्रकाशित करण्याची एक उत्तम प्रथा या व्याख्यानमालेच्या आयोजकांनी सुरू केली आहे याबद्दल पहिल्यांदा मी त्यांचे मन:पूव क अभिनंदन करतो. कारण बऱ्याच वेळेला असे घडते की आमच्या सारखी माणसं बोलली की त्यांचे शब्द वाऱ्यावरती उडून जातात. विरून जातात. मागे काही शिल्लक रहात नाही. पुष्कळांना सवड नसल्यामुळे सगळीच माणसे या ठिकाणी येऊ शकत नाहीत. मुद्दाम कष्ट करून, अभ्यास करून काही निश्चित अशा प्रकारचा विचार घेऊन येणारी माणसं, त्यांचे विचार जर असे वाऱ्यावरती उडून गेले, तर त्यांनाही त्यात फारसं समाधान वाटत नाही. तेव्हा यावर एक उत्तम तोडगा म्हणजे त्यांचे विचार वाऱ्यावरती न सोडता ते शब्द-बद्ध करून अक्षरबद्ध करून त्याला पुस्तकाचे रूप देणे व नंतर ते जास्तीत जास्त लोकांपर्यंत कसे पोहोचतील याची दक्षता घेणे. या वाचनालयाने ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट साधलेली आहे.

आज दुसरा योग असा आहे की तुमच्या या परिसरातले महाराष्ट्राचेच असे नव्हे तर संबंध देशाचे मा. नेते श्री. यशवंतरावजी चव्हाण यांचा आज वाढदिवस आहे. यशवंतरावांच्या संदर्भामध्ये सांगण्यासारखं खूप आहे. आजच्या राजकारणामध्ये जशी केवळ कृतीच्या राजकारणाला वाहून घेणारी माणसं असतात तशीच आपल्या कृतीला विचारांची जोड देणारी, आणि कृतीबरोबरच

विचारांचे सुद्धा एक महत्त्वाचं देणे समाजाला प्रदान करणारी अशी माणसे आवश्यक असतात. अशी जी फार थोडी माणसं आपल्या देशामध्ये आहेत त्यांच्यामध्ये यशवंतरावांचं स्थान फार मोठे व वरचे आहे. हे मी अत्यंत जवळून पाहिलेले आहे. सतत चिंतन करणारा, सामाजिक प्रश्नांची अत्यंत उत्तम जाण असणारा त्या समस्यांची उत्तरे कशी शोधून काढता येतील याच्या शोधा–मध्ये व्यग्र असलेला आणि जनसामान्याविषयी जी अपार करुणा, त्या करुणेचे द्वारे जीवनाचे सम्यक् दर्शन घेऊ इच्छिणारा एक दार्शनिक अशा प्रकारचं चिंतनशील रूप मा. यशवंतरावांमध्ये असल्यामुळे त्यांच्या नावाला केवळ कुठल्यातरी एका इमारतीचं, कुठल्यातरी एखाद्या शोभेच्या कार्यक्रमाचं, असं रूप देण्याच्या ऐवजी तुम्ही विचाराचं मंथन होईल, विचाराचं जिथे आदान-प्रदान होईल अशाप्रकारच्या व्याख्यानमालेशी त्यांचं नाव जोडून एक उत्तम प्रकारची कृतज्ञता त्यांच्या संबंधात व्यक्त केली आहे असं मला वाटतं.

मला या ठिकाणी आठवतं, की मा. यशवंतराव कराडच्या साहित्य संमेलनात एक महत्त्वाचा विचार सांगून गेले. जी पुस्तके, जे बिचार समाजामध्ये निर्माण होत असतात ते ज्यास्तीत ज्यास्त लोकांच्या घरापर्यंत व मनापर्यंत पोहोचले पाहिजेत. पुस्तके आपल्याकडे खूप प्रसिद्ध होतात परंतु प्रसिद्ध झालेली पुस्तके विकत घेण्याची ताकद सामान्य माणसामध्ये नसल्यामुळे ते विचार पुन्हा पुस्तकामध्येच राहतात म्हणून हे विचार जनसामान्यापर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीनं स्वस्त प्रकाशने आणि त्या प्रकाशनाची सर्वत्र उपलब्धी होणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. समाज–वादाला योग्य व आवश्यक अशाप्रकारचा हा विचार सहजरीत्या त्यांनी कालच्या साहित्य संमेलनामध्ये सांगितला. आणि प्रकाश–कांची, पर्यायाने शासनाची आणि त्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या वेगवेगळ्या संस्थांची जबाबदारी काय याचीही जाणीव करून दिली.

आज या ठिकाणी गेल्या वर्षीच्या ज्या वक्त्यांनी या व्याख्यान मालेत भाषणे दिली त्यांची व्याख्याने पुस्तकरूपाने छापून आणलेली आहेत. त्या पुस्तकाचे प्रकाशन मी आज करणार आहे. आपल्या सगळ्याच्या साक्षीने त्या पुस्तकाचे प्रकाशन झाले असे मी जाहीर करीत आहे. या प्रसंगी मा. यशवंतरावांना उदंड आयुरारोग्य लाभो. या देशाच्या सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने थोर अशी पावले अलीकडच्या काळात उचलली जाताहेत त्यातला त्यांचा वाटा अत्यंत प्रकर्षाने उचलण्यासाठी त्यांना शक्ती लाभो. आतापर्यंत हाती घेतलेलं व्रत पूर्ण करण्याच्या त्यांच्या कामामध्ये आपण आपला सहभाग देण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू. अशा प्रकारच्या एका आत्मविश्वासाने, कृतज्ञ भावनेने, मला असं वाटतं की त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या भावना व्यक्त करू या.

मा. यशवंतरावांच्या चिंतनशील व्यक्तिमत्त्वासंबंधी नेहमीच मला आकर्षण वाटत आलेलं आहे. हे आकर्षण असण्याला दुसरं एक कारण आहे. त्याचा आजच्या माझ्या विषयाशी संबंध आहे. कालच्या माझ्या भाषणाचा बराचसा भाग असा होता. – या देशाच्या सामाजिक पुनर्रचनेमध्ये, परिवर्तनामध्ये पं. जवाहरलाल नेहरूंचे एक अत्यंत महत्तम अशा प्रकारच दान होतं – ज्याला आपण योगदान म्हणतो, काँट्रिब्यूशन म्हणतो -- स्व. पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वामध्ये असे चकित करून टाकणारे वेगवेगळे पैलू होते. उत्तुंग बुद्धिमत्ता होती. कला आणि सौंदर्य यांच्या विषयीचे जबरदस्त आकर्षण होतं. विद्या आणि संस्कृती यांच्या संबंधीची अत्यंत सखोल अशी जाणीव होती आणि या सगळया क्षेत्रामध्ये, विद्येच्या, कलेच्या, ज्ञानाच्या, संगीताच्या, शिक्षणाच्या, सामाजिक सेवेच्या अशा जीवनाच्या सगळ्या अंगांमध्ये काम करणारी जी जी काही उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची माणस होती – या देशातली व जगातील सुद्धा, – त्यांचा आदर सत्कार करण्याची आत्यंतिक महत्त्वाची

गुणग्राही वृत्ती त्यांच्या ठिकाणी होती. यशवंतरावांच्या ठिकाणी सुद्धा या गुणांचे दर्शन मला अनेक ठिकाणी घडलेलं आहे. म्हणून त्यांनी जरी विनम्रपणाने म्हटलं असलं की मंत्रिपदाची बिरुदावली बाहेर ठेऊन मराठी भाषेचा एक रसिक म्हणून या ठिकाणी या साहित्यिकांच्या सोहोळ्यामध्ये मी उपस्थित रहात आहे. तरी असं म्हणत असताना त्यांच्या ठिकाणची ही रसिकता, त्यांच्या ठिकाणचा हा एक जीवनाकडे ममतेने. एका आपुलकीने पहाण्याचा जो गुण आहे त्याचे दर्शन मला घडलेलं आहे. आणि म्हणून आजच्या या प्रसंगी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने माझ्या शुभेच्छा मी या ठिकाणी व्यक्त करतो. आपण सगळे त्यांत सहभागी असाल.

काल मी माझ्या विषयासंबंधी बोलत असताना विशेषतः तीन महत्त्वाचे विचार तुमच्यापुढे मांडले. देश स्वतंत्र झाला, देश स्वतंत्र झाल्यानंतर या देशाचे निश्चित स्वरूप काय असेल या संबंधीचं चिंतन स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये अग्रणी म्हणून जे होते— विशेषतः महात्माजी व त्यांच्या बरोबरीने पंडितजी आणि इतर ही अनेकांनी केले. – त्यांच्या विचारांच्या मंथनातून निर्माण झालेली एक निश्चित राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनाची जी संकल्पना होती त्या संकल्पनेचं स्पष्ट चित्र १९४९ मध्ये जाहीर झालेल्या भारताच्या राज्यघटनेमध्ये अुमटलेलं आपणाला दिसतं. आपण त्यासाठी कटिबद्ध झाल्याची प्रतिज्ञा घेतल्याची जाणीव या आपल्या घटनेमध्ये दिसते या ठिकाणी लोकशाही राज्य असेल, या ठिकाणी प्रजासत्ताकराज्य असेल, समाजवादाची मानवतावादावरती आधारलेल्या मूलभूत तत्त्वावर श्रद्धा ठेवणारी समाजरचना असेल, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन अवलंबून सर्व धर्मांना योग्य प्रकारची मोकळीक देणाऱ्या अशा प्रकारचा सर्व समावेशक, सर्व समन्वयकारक विचार त्या मध्ये असेल. त्या मध्ये एखाद्या व्यक्तीला स्वतःच्या कल्याणासाठी स्वतंत्ररीतीने उद्योग करण्याचं स्वातंत्र्य असेल, त्याच प्रमाणे दुबळ्या, असहाय्य,

पिढयान्‌पिढया दारिद्रयाच्या आणि अज्ञानाच्या गर्तेत रुतून पडलेल्या अशा समाजाला एका सामाजिक जाणीवेने हात देऊन वर काढण्याचा आग्रही प्रयत्न असेल याची निश्चित जाण या घटनेमध्ये या घटनेच्या शिल्पकारांनी प्रगट करून ठेवलेली होती. भारतीय समाजाच्या परिवर्तनाच्या दिशेने निश्चित आपणाला काय साधायचं आहे हे संविधानाच्यावर अक्षरबद्ध झालेलं अनेक वर्षं आपण पहात आहोत. त्या राजकीय क्षेत्रामध्ये आपण किती प्रगती केली ? या संबंधी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक असा एक जुजबी आढावा मी काल घेतला. आणि त्यातल्या त्रुटी काय होत्या त्या मी सांगितल्या. आज जरा मी खोलात जाण्याचा प्रयत्न करणार आहे. कारण या सगळया सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिवर्तनाच्या कार्यक्रमामध्ये आपल्या जीवनामध्ये आढळणारे अनेक प्रकारचे विरोधाभास हेच खरे आपल्या पायातले किंवा आपल्या मार्गातले धोंडे आहेत. याच खऱ्या आपल्या पायातल्या बेडया आहेत. अशा प्रकारचा विचार मी काल मांड लेला होता.अनेक उत्तमोत्तम तत्त्वे सांगणारी भारतीय संस्कृती आपल्या हाताशी असताना आणि पाश्च्यात्य संस्कृतीकडून अनेक उत्तमोत्तम नवी मूल्ये आपल्याकडे आलेली असतांना या दोघांचा वापर आपला रथ पुढे नेण्यासाठी करण्याची संधी आपल्याला प्राप्त झाली असतानासुद्धा ज्या गतीने त्याची प्रगती व्हायला पाहिजे होती तेवढी ती आपल्याला दिसत नाही. त्याची कारणं काय? याचे ओझरते उल्लेख मी काल केले होते. आज मी या गतीला प्रगतीच्या दृष्टीनं अधिक गती येण्याच्या दृष्टीनं आपण कुठे कुठे कमी पडतो या संबंधीचा विचार आपल्या पुढे मांडणार आहे.

तुम्हांला ठाऊक असेल की पारतंत्र्याच्या काळामध्ये स्वातंत्र्य लढयातील सगळया नेत्यांनी ज्या एका भावनेच्या आधारावर या देशातला समाज एकवटला, संघटित केला त्यातली मूळ प्रेरणा राष्ट्रीयत्त्वाची होती. राष्ट्रीयभावनेला वेगवेगळया प्रकारचा विचारस्पर्श- नव्या राजकीय विचारांचे, नव्या वादांचे, बुद्धिनि-

ष्ठेचे, व्यक्ति स्वातंत्र्याचे, असे वेगवेगळे स्पर्श देऊन ती राष्ट्रीय भावना अधिक प्रखर करून त्या राष्ट्रभावनेच्या जोरावर सबंध इंग्रजी साम्राज्याविरूद्ध उभे राहण्याची एक जिद्द त्या वेळेला आपल्या समाजाने दाखविली आणि स्वातंत्र्य पदरात पाडून घेतलं. ही राष्ट्रीयत्वाची भावना राष्ट्राच्या जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाची असते आणि मी जर असं म्हटलं की नंतरच्या राष्ट्राच्या प्रगतीमध्ये मोठा अडथळा जर कशाचा आला असेल तर या राष्ट्रीय भावनेचा हळू हळू होत गेलेला ऱ्हास, तर हे अतिशयोक्तिचं होणार नाही. राष्ट्रीयत्वाची कल्पना ही निश्चित काय कल्पना आहे ? राष्ट्र हे कांही सरहद्दीवरून ठरत नाही. कदाचित माझं हे विधान तुम्हाला चमत्कारिक वाटेल. जगाच्या इतिहासामध्ये सगळया राष्ट्राच्या सरहद्दी कालानुक्रमे बदलत आलेल्या आहेत. भारताचा देखील प्राचीन नकाशा पाहिला, मध्ययुगीन कालातला नकाशा पाहिला, आजचा नकाशा पाहिला, तर एकच सरहद्दी त्यांत नाहीत. त्या सतत बदलत आलेल्या आहेत. तुम्हांला आणखी असे दिसेल की कांही विशिष्ट धर्माच्या, विशिष्ट अशा संस्कृतीच्या नावानेच राष्ट्र ओळखले जाते, असा एक जमाना होता. ते ते राष्ट्र त्या त्या धर्माने त्या त्या संस्कृतीने ओळखले जात होते. परंतु युरोपामध्ये औद्योगिक क्रांती झाली, युरोपामध्ये विज्ञान निष्ठा आली, युरोपामध्ये धर्माची चौकट गळन पडली, युरोपामध्यं अंधश्रद्धेचं प्राबल्य कमी झालं आणि नव्या वैज्ञानिक शोधाने जग अत्यंत जवळ येत चाललं ते इतकं जवळ आलं की आता दुसऱ्यापासून आपण वेगळे आहोत असं मानण्याची जर कुणी इच्छा प्रदर्शित केली असती तर तो मूर्ख ठरला असता. आणि म्हणून जवळ आलेल्या जगामध्ये एकमेकांना दूर करणारे जे घटक होते ते पहिल्यांदा जगाच्या सगळ्या तत्त्वज्ञानातून बाहेर फेकले गेले. आणि विशिष्ट संस्कृती, एक विशिष्ट धर्म, एक विशिष्ट पंथ, एक विशिष्ट जात यांच्यावरती आधारलेली राष्ट्रकल्पना नंतर कुठेच राहिली नाही. राष्ट्राच्या कल्पनेला वेगवेगळे अर्थ वेगवेगळ्या काळामध्ये निर्माण झालेले आहेत. आपल्याकडेसुद्धा तुम्हाला असे दिसेल आपण ज्या वेळेला भारत राष्ट्र असे म्हणतो

तेव्हा काही तरी विशिष्ट सरहद्दीमध्ये जरी आपण तो नकाशा रूपाने पहात असलो तरी देखील काही विशिष्ट गट, समूह, भाषा, विशिष्ट संस्कृती, विशिष्ट धर्म या अर्थाने आपण राष्ट्राकडे आज पहात नाही. तर या राष्ट्रामध्ये या राष्ट्रावर प्रेम करणारा, राष्ट्र आपलं म्हणणारा, आणि या राष्ट्राच्या अभ्युदयासाठी आपलं सर्वस्व वेचण्याची प्रतिज्ञा घेणारा आणि त्यासाठी राब-णारा जो जो घटक असेल तो या राष्ट्राचा घटक ठरतो. अशी जी राष्ट्रीयत्वाची कल्पना, त्या राष्ट्रीयत्वा-च्या कल्पनेचा जेवढा प्रचार आणि प्रसार बीजारोपण आणि त्याचे वृक्षामध्ये रूपांतर, स्वातंत्र्याच्या नंतरच्या काळामध्ये व्हायला हवं होतं तितक झालेलं नाही. हे स्वातंत्र्या-नंतरच्या आपल्या निरनिराळया चळवळी, भाषिक चळवळी, प्रांतिक चळवळी, जातीय चळवळी, धार्मिक चळवळी यांचा जरा आढावा घेतला तर तुमच्या लक्षात येईल. इथे अनेक प्रकारच्या दंगली होतात त्या वेळी आपण एका राष्ट्राचे पुत्र आहोत हे विसरतो. कुठल्यातरी क्षुद्र कारणावरून, संकुचित कारणावरून, संकुचित प्रश्नावरून आपण आपआपसांत भांडून आपली इतकी शक्ती खर्च केलेली आहे की, तेवढी शक्ती जर आपण राष्ट्र उभारणीच्या कार्यामध्ये लावली असती तर माझी अशी खात्री आहे की आज आपण जी प्रगती साधली त्याहून कितीतरी अधिक त्या काळातच प्रगती साधली असती. नद्यांच्या पाण्यावरून भांडणे, प्रदेशांच्या सीमेवरून भांडणे, जातीच्या एकमेकांच्या वर्ण श्रेष्ठत्वाच्यावरून भांडणं, धर्माच्या कुठल्यातरी क्षुद्र अशा प्रका-रच्या कलहावरून भाडणं, असं जे स्वरूप आपल्याला सतत दिसत गेलं- गेल्या २०-२५ वर्षामध्ये- त्यामध्ये आपल्या राष्ट्राची बरीचशी शक्ती खर्च झाली. आज एक अशी वेळ आलेली आहे की एक राष्ट्र म्हणून आज जर आपण उभं राहिलो, आणि राष्ट्राचा एक दिलाने, एक मनाने, एक विचाराने विचार केला तर जे अनेक प्रश्न होते व आहेत त्या प्रश्नांची उत्तरे सांपडतील. आणि उत्तरे सांपडली की प्रगती करणं सोपं जातं आणि आपली

प्रगती अधिक गतीने होईल म्हणून माझ्या भाषणामध्ये किंवा व्याख्यानाच्या विषयामध्ये ‘ वेग ’ हा शब्द मुद्दाम वापरलेला आहे.

राष्ट्राचा वेग हा तासात– मैलांत– सांगता येत नाही. या गतीला रोखणारे कोणते कोणते घटक होते हे आपणाला ठाऊक आहे. त्यातला राष्ट्रीयत्वाचा होत असलेला लोप हा एक महत्त्वाचा घटक आहे. आणि या घटकाकडे आपण जेवढे लक्ष द्यायला हवे होते तेवढे दिले नाही. आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की राष्ट्रीय पातळीवर जगातल्या सगळचा उदात्त तत्त्वज्ञानाचा घोष करणारे सगळे राजकीय पक्ष हे प्रांतीय वादावर उतरले की अत्यंत संकुचित बनत होते. हा ही एक विरोधाभास आहे आपल्या, जीवनातला ! एरव्ही राष्ट्रीय पातळी वरती समाजवादाचं म्हणा, कम्युनिझमचं म्हणा किंवा भांवलशाहीचं म्हणा उदात्त तत्त्व सांगणारे लोक अशा प्रकारचे प्रांतीय भाषिक प्रश्न आले की वेगवेगळया भूमिका एकाच विचाराचे लोक घेत होते आणि आपल्याला प्रश्न पडत होता की राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेमध्ये ही विसंगती कशी राहू शकते. आज तुम्हाला अशी एक परिस्थिती आलेली दिसेल किंवा आणली गेली आहे की जीमुळे आपणाला राष्ट्राचा विचार करण्याशिवाय दुसरा विचार करणे आज अशक्य झालेले आहे. वर सांगितलेलं संकुचित प्रांतीयीकरण हे राष्ट्रद्रोहाचे ठरेल. अशा प्रकारची भीती आता आपल्याच मना–मध्ये निर्माण व्हायला लागली आहे. त्यामुळे हे सगळेच प्रश्न काल पर्यंत जिवंत होते ते कुठे गायब झाले ते कळेनासे झाले आहे. सगळे माना मोडून पडलेले आहेत. अशीच जर शांत सुस्थित परिस्थिती राहिली तर ते प्रश्न सामंजस्याने, आदान प्रदानाने सोडवता येतात, सुटतात. कृष्णा–गोदावरी–नर्मदा या नद्यांच्या पाण्याचा प्रश्न इतकीवर्षं ताटकळत पडला होता तो केवळ सामंजस्याच्या भूमिकेवर आला व सुटून गेला. असे अनेक प्रश्न आहेत. पंजाबी सुभ्याचा प्रश्न आला, चंदिगडच्या राजधा–

नीचा प्रश्न, गोव्याच्या विलिनीकरणाचा प्रश्न आला अजून बेळगावच्या प्रश्नासंबंधी घोळ चाललेलाच आहे. अनेक प्रश्न झटपट सुटत गेले. आता कदाचित प्रश्न सुटण्याची तड लागेल आणि त्याच्यातून प्रश्न सुटेल. आणि ज्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा आपण आता पर्यंत मोठ्या इच्छेने, आतुरतेने वाट बघत होतो ती निर्माण करण्याच्या दृष्टीने अत्यंत अनुकूल अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होईल आणि आपल्या प्रगतीतला एक महत्त्वाचा अडथळा दूर होईल. तो ही एक विचार आपण लक्षात घेतलातर राष्ट्रीयत्वाची कल्पना ही संकुचित असत नाही कारण जगातल्या सगळ्या मानव समाजाची विभागणी राष्ट्रामध्येच झालेली आहे. आणि प्रत्येक राष्ट्र घटनेला आपल्या राष्ट्राचं सार्वभौमत्व सांगितल्याशिवाय त्यामध्ये आपल्या तत्त्वांची मांडणीच करता येत नाही. त्यामुळे अमेरिकेचं असेल, आफ्रिकेतल्या राष्ट्राचं असेल, जर्मनीचं असेल, ब्रिटनचं असेल, फ्रान्सचं असेल. चीनचं असेल, रशियाचं असेल या प्रत्येकाच्या राष्ट्रीयत्वावरती त्याच्या सगळ्या आर्थिक रचनेची, सामाजिक रचनेची तेथील राजकीय विचारांची उभारणी झालेली आहे. ज्या अधिष्ठानावरती सबंध राष्ट्र उभारायचं, ती भावना जर खच्ची झाली, ती जर विस्कळीत झाली, ती जर मंद झाली तर राष्ट्राच्या गतीमध्ये मंदगती येते हे आपण आपल्या इतिहासाच्या अभ्यासावरून शिकलो आहोत. ही चूक या पुढे सुधारली– आणि मला अशी आशा वाटते, की या पुढे ती सुधारली जाईल– तर निश्चितच हा देश अधिक गतीने आपल्या परिवर्तनाकडे गेल्याशिवाय राहणार नाही.

दुसऱ्या आणखी एक दोन गोष्टींचा मी मुद्दाम उल्लेख करणार आहे. मी काल ज्याचा उल्लेख केला त्या धर्मसमजुतीचा किंवा अंधश्रद्धेचा पुन्हा मी उल्लेख करीनच. परंतू या देशाच्या लोकसंख्येकडे जर पाहिलं तर तुम्हाला असं दिसेल या देशामध्ये असलेल्या जवळ जवळ ५५ कोटी लोकांपैकी ८० टक्के लोक खेड्यांतून

राहतात. साधारण १९ ते २० टक्के लोक शहरांतून विखुरलेले आहेत. शहरीजीवन जगताहेत मध्यम वर्गीयांचं. सगळेच्या सगळे नव्हे २० टक्क्यांत २५ टक्के लोक त्यांतल्या त्यात मध्यम वर्गीयांचे जीवन जगत असतील. उच्च जीवन जगणारे किती टक्के आहेत ते तुम्ही शोधू शकता. ते चार पाच टक्केच असतील. म्हणजे जवळ जवळ ८० ते ९० टक्के लोक अशा एका विशिष्ट परिस्थितीमध्ये जगतात, काही शहरात जरी असले तरी ग्रामीण जीवनापेक्षाही अत्यंत हलाखीने जगतात. अशा या देशामध्ये दोन रोग आपणाला फार महत्त्वाचे जडलेले आहेत. त्यातला एक महत्वाचा रोग म्हणजे अज्ञान. इतकं अतोनात अज्ञान आपल्या या खेडयापाडयांतून पसरलेलं आहे. हे जे अज्ञान म्हणून मी म्हणतो ते कसलं अज्ञान? तुम्ही म्हणाल आम्हाला सगळयागोष्टी माहीत आहेत. विमान जातं डोक्यावरून, एस्. टी. ने मुंबईला जायचं असतं, नवी बी बीयाणं वापरायची असतात, नवं खत वापरायच असतं, धरणाचं पाणी घ्यायचं असतं, इलेक्ट्रिक दिवा लावावयाचा असतो आता सगळं कळतयं की ! खेडयातील लोक काय इतके अगदी अडाणी आहेत? या अर्थाने मी त्यांना अज्ञानी म्हटलं नाही. मी ज्या अर्थाने त्यांना अज्ञानी म्हणतो त्याचा अर्थ असा की या देशाच्या राजकारणामध्ये समाजकारणामध्ये आणि अर्थकारणामध्ये अंतर्भूत असलेली जी मूलभूत तत्त्वं आहेत त्यांचा अर्थ अजून त्यांच्या पर्यंत जाऊन पोहोचलेला नाही आणि ज्या वेळेला ही जी बी बीयाणं वापरता, जी खतं वापरता, त्या वेळेला त्यांची एक व्यक्तिगत प्रेरणा त्याच्यामध्ये असते. त्यांच्या कार्यात राष्ट्रीय, जोम असायला पाहिजे, तो त्या ठिकाणी असत नाही. त्याचं कारण या तत्त्वाचं विश्लेषण, या तत्त्वांचं स्पष्टीकरण त्याच्या पर्यंत पोहोचलेलं नाही. हा त्यातला एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी आपणाला त्यांना इंसेटिव्ह द्यावे लागतात. सबसिडी द्यावी लागते. त्याच्या साठी खास वर्ग आयोजित करावे लागतात. त्याच्यासाठी पुन्हा पुन्हा जाऊन खेपा

घालून ते समजावून सांगाव लागतं. आणि इतकं सगळ केल्या- नंतर मग माझा यात फायदा आहे हे त्याच्या लक्षात आल्या- नंतर तो त्याच्या प्रयत्नात पडतो. त्याला हे सगळं कळलेलं असतं. पण माझा फायदा होतोय त्या एका विचाराच्या पलीकडे, याच्यातून सर्वसमावेशक असा सबंध समाजाचा उत्कर्ष होणार आहे. हा जो एक मूलभूत राष्ट्रीय विचार त्या माणसापर्यंत जायला पाहिजे तो गेलेला आपल्याला दिसत नाही. आणि म्हणून हा विचार त्याच्या मनात शिरून ज्या वेळी ज्ञानाची खरी दारं उघडी होतील, त्यावेळी आपली गती अधिक वेगवान झालेली तुम्हांला दिसेल. ज्या वेळेला अशा प्रकारचा प्रवाह साचलेला आपल्याला दिसतो. खेडयापाडयांतून काय परिस्थिती दिसते ? खेडयापाडयांतून तसं, सगळं चित्र, जरी आधुनिक झालेलं दिसत असलं तरी जे मूलभूत असे मनाचे बदल घडावे लागतात आचा- रांचे आणि विचारांचे, ते घडलेले नाहीत ती वागण्याची, विचा- रांची कुटुंबपद्धत तीच आहे. त्याच्या वापरायच्या बियाण्यामध्ये, खतांमध्ये, अवजारांमध्ये फरक झालेला असेल परंतू त्याच्या घरातल्या वागण्यामध्ये, रहाण्यामध्ये त्याच्या मुलांच्या होणाऱ्या आदान-प्रदानामध्ये, त्याच्या कुटुंबामध्ये कांही नव्या ज्ञानाच्या गोष्टी शिरल्या आहेत असं काही चित्र आपणाला या बहुसंख्य ग्रामीण समाजातून दिसलेलं नाही. याचं कारण काय ?

याची कारणं दोन, पहिलं कारण साक्षरतेचं प्रमाण अत्यंत अल्प आहे हे. या देशामध्ये नुकतीच कोठे पुरुषांची ४० टक्के व स्त्री- यांची २० टक्के इतकी साक्षरता गाठली गेली आहे. आकडा जरा मोठा दिसतो ४० टक्याचा ! पण ४० टक्क्याची साक्षरता म्ह- णजे काय? या साक्षरतेच्या पाहणीमध्ये नुसती सही करणे. नुसते वाचता येणे त्याचासुद्धा अंतर्भाव होतो आणि अशांची संख्या आपल्याकडे ज्यास्त आहे. आपल्या साक्षरतेमध्ये ज्याला Functional Literacy कार्याक्षय साक्षरता असे म्हणतात, ज्याला ज्ञानाची विशिष्ट पायरी म्हणतात, अशा पायरीवर गेलेले त्यांच्या-

हून आणखी कितीतरी कमी लोक आहेत. म्हणजे या ४० टक्के पुरुषांच्या साक्षरतेमध्ये खऱ्या अर्थाची ज्ञानाची साक्षरता नव्या कल्पनांची, नव्या गुणांची साक्षरता ही कदाचित ५ टक्के सुद्धा आढळणार नाही. बाकीची पुस्तके वाचण्यापलीकडे, वर्तमानपत्रे वाचण्यापलीकडे गेलेली नसल्यामुळे जे नवे ज्ञान, नवे विचार, नवी मूल्यं या लोकांपर्यंत पोहोचायला हवीत ते पोहोचविण्याचं एक महत्त्वाचं साधन गायब झालेलं आहे. वर्तमानपत्रे किती लोक वाचतात ? शहरावरून जरी आकडेवारी पाहिली तरी तुम्हांला असे दिसेल. शहरांत सुद्धा फारशी वाचली जात नाहीत. म्हणजे महाराष्ट्रामध्ये जी २ –२॥ कोटीची लोकसंख्या आहे त्या लोकसंख्येपैकी १ । २ लाख सुद्धा लोक वर्तमानपत्रे वाचीत नसतील. अशी जी परिस्थिती आकडेवारीवरून पाहिली तर तुमच्या असं लक्षात येईल की जिथे नेहमीचे वर्तमानपत्र वाचण्याची संख्या इतकी कमी आहे, तिथे मूलभूत विचार सांगणारा, निरनिराळ्या ज्ञानाची क्षितीजे मोकळी करणारा, निरनिराळया प्रकारच्या कल्पना मनामध्ये रूजवणारा, अशाप्रकारचा ग्रंथ संभार वाचण्याची पात्रता आपणापर्यंत यायला आणखी किती वर्षे लागतील याचा विचार आपण केलेला बरा.

आणि म्हणून या राष्ट्राच्या प्रगतीमध्ये ज्या तत्त्वांचा आंतर्भाव अभिप्रेत होतो, ज्या समाजवादासंबंधी आपण घोषणा करतो, ज्या लोकशाही संबंधी आपण अभिमान बाळगतो, ज्या व्यक्ति स्वातंत्र्याचा आपण नेहमी गौरव करतो, आणि ज्या धर्म निरपेक्षते संबंधी आपण जगामध्ये ताठ मान करून वावरतो, त्यांचा निश्चित अर्थ अजून आपल्या जनसामान्यांना कळलेला नसावा. ते जो पर्यंत कळलेले नसतात तो पर्यंत लोकशाहीचे खरे फायदे, समाजवादाचे खरे फायदे, व्यक्ति स्वातंत्र्याचे खरे फायदे, त्याच्या पर्यंत जावून पोहोचू शकत नाहीत, म्हणून ही अज्ञानाची अत्यंत प्रचंड अशा प्रकारची भिंत, आलेली नवीन मूल्यं आणि त्याचा पलीकडचा हा जनसामान्य यांच्यामध्ये उभी राहिल्यामुळे देशाच्या फल-

कावरती जे लिहिलं आहे, जे घडलं जात आहे त्या बिचाऱ्याला कळलेलंच नसतं. आणि म्हणून तो अडाणी समाज खेड्या मध्ये गेल्यानंतर ' चंद्रावरती माणूस जाणे शक्य आहे काय ? शंकराच्या मस्तकावरती विराजमान होणारा चंद्र त्याच्यावरती मनुष्यासारखा पापी प्राणी पाय देऊ शकेल ? याच्यावरती आपला नाही बुवा विश्वास ! ' असे सांगणारा मनुष्य ज्यावेळी आपणाला भेटतो त्या वेळेला इतकी साधी गोष्ट समजून घेण्यासाठी जीमनाची क्षमता लागते, जो नवा दृष्टिकोन लागतो, तोच त्याच्यापर्यंत पोहोचलेला नाही; त्याला गावच्या प्रगतीची आणि आपल्या राष्ट्राच्या प्रगतीची आकडेवारी आणि त्याचं दृष्य समजावून घेण्याचं अत्यंत अवघड आहे. त्याला आकाशात भारताचा आर्यभट्ट आकाशात फिरतो म्हणजे काय ? हे तर त्याला कळणचं अशक्य आहे. त्याच्या मागे कोणाची प्रेरणा आहे, त्याच्यामागं भारतातील शास्त्रज्ञांची बुद्धिमत्ता आहे त्याच्यामागं आमचं स्वतःच रचना कौशल्य आहे. त्या मागे आमच्या विज्ञान शाळेमधून केले जाणारे प्रयोग त्याच्यामागे आहेत. त्याच्यामागे आमच्या एका ऊर्जस्वल आत्मविश्वास उभा राहिलेला आहे, अशा राष्ट्रीय अस्मितेचं दर्शन आहे. हा विचार त्याच्यापर्यंत पोहोचू शकत नाही. सुशिक्षितांपर्यंत ही जो पर्यंत पोहोचू शकत नाही. बऱ्याच जणांना मी विचारल्यानंतर त्यांची कल्पना अशी असते की अमेरिकेने मदत म्हणून आर्यभट्ट बहुतेक आकाशात सोडला असावा. वाचलेलंच नसतं. आकाशामध्ये आमचा ज्या वेळेला उपग्रह जातो, आमचा ज्या वेळेला अग्निबाण जातो त्या वेळेला तो आमचा आहे. हे देखील विश्वास ठेवण्याइतकी माहिती आपल्याला नसते. सुशिक्षितांना सुद्धा नसते. अशी परिस्थिती ज्या देशामध्ये आहे. तितल्या जन सामान्याला या देशामध्ये होत असलेला बदल प्रयत्नपूर्वक समजावून सांगणे, हे अत्यंत आवश्यक झालेलं आहे. कारण घडणारे बदल लक्षात येण्यामुळे, मग पुढे घडवायचे बदल करण्यामध्ये त्याच्याही वाटा तो द्यायला पुढे होतो. नाहीतर त्याची अज्ञानामुळे समजूत असते की आपला

देश मागे आहे, आपण गुलामीत आहोत, आपण मागासलेलेच आहोत इ० असा एका, अगतित, असा एका निराशाजनक परिस्थितीमध्ये तो राहिल्यामुळे त्याच्यात जी जिद्द निर्माण व्हायला पाहिजे ती जिद्द निर्माण होत नाही. आणि तो पुन्हा जुन्या वळणामध्ये, जुन्या समजुतींमध्ये, जुन्या अंधश्रद्धेमध्ये, जुन्या व्रत वैकल्यांमध्ये स्वतःला गाडून घेतो आणि पुन्हा आपली आणि आपल्याबरोबर देशाची सुद्धा प्रगती खुंटवून टाकतो, हा एक भाग झाला. आणि या नंतर हा एक भाग झाल्यानंतर या समाजामधले अज्ञान दूर करण्यासाठी जी एक समाज कार्यकर्त्यांची फळीच्या फळी उभी राहिल्याचे दिसायला पाहिजे होते या देशामध्ये, ती दुर्दैवाने स्वातंत्र्याच्या काळामध्ये कमी कमी होत गेलेली आपणाला दिसते. म्हणजे राजकीय कारणांसाठी सतत आजही कार्यकरणारे कार्यकर्ते तुम्हाला दिसतील. आणि त्याचा हेतू सत्ता मिळविणे, आपल्या विचाराचा प्रसार करणे, आपल्या पक्षाचे झेंडे मिरविणे याच्यासाठी आपल्याला अगदी अहमहमिकेने स्पर्धा लागलेली दिसते. लोकशाहीच्या दृष्टीने, राजकीय विचाराच्या दृष्टीने, फार चांगली गोष्ट आहे. वाईट काही नाही. परंतु हे करणाऱ्या मंडळीवरती आणखी एक फार मोठी जबाबदारी असते, ती राजकीय पक्षाच्या पलिकडे जावून – मग कुठल्याही पक्षाच्या विचारांच्या पलिकडे जाऊन – या राष्ट्राच्या प्रगतीच चित्र, या राष्ट्रामध्ये आलेल्या नव्या विचाराच चित्र, या राष्ट्रामध्ये घडत असलेल्या नव्या बदलांचं चित्र, या जनसामान्याला समजून सांगण्यासाठी अशा कार्यकर्त्यांची आयोजना ठिकठिकाणी करावी लागते. याचा संदर्भ नसल्यामुळे आज काही एका विशिष्ट राजकीय हेतूच्या पलीकडे आपल्या जनसामान्याशी आपल्या राजकीय कार्यकर्त्यांचा किंवा सामाजिक कार्यकर्त्यांचा संबंध दिसत नाही, ही दुसरी गोष्ट झाली. आणि तिसरी गोष्ट अशी झाली की या जनसामान्यातून, काही वेगळी साधनें त्यांना प्राप्त झाल्यामुळे परिस्थितीमुळे, ज्यांची परिस्थिती सुधा-

रली त्यांच्याकडे जमीन होती ती कसली त्यांनी कष्ट केले. त्यांच्यातून त्यांची परिस्थिती सुधारली नवे उद्योग आले. या परिसरांत तुम्ही साखरेचे सहकारी कारखाने काढता आहात त्याच्या आधारावरती अनेक शेतकरी कुटुंब उर्जितावस्थेला आली. परंतु उर्जितावस्थेला येत असतांना केवळ श्रीमंतीचा, केवळ धनार्जनाचा हेतू डोळयासमोर ठेवल्यामुळे विद्या-कला-संस्कृती यांचेकडे त्यांचेही दुर्लक्ष होत गेलं आणि म्हणून बुद्धिवंतामध्ये अशा प्रकारचा एक समाज आढळतो की काय ही तुमची नवीन अशा प्रकारची श्रीमंती, हे नव्या प्रयोगातून निर्माण होणारा neo rich class आहे. नवीन असा श्रीमंताचा वर्ग आहे-त्यांना विद्यार्जनाचे आकर्षण नाही. ते म्हणतात की आम्ही बुद्धिवंत विकत घेऊ शकतो. आणि त्यामुळे या देशातील बुद्धिमत्ता काही आता याच्या पुढे उपयोगी पडणार नाही असा एक समज आढ-ळतो. याचे कारण हे की पैसा मिळाला की आपणाला सर्वस्व मिळालं असे समजण्याची प्रवृत्ती नकळत का होईना या देशा-मध्ये वाढत चाललेली आहे. म्हणजे ज्यांची परिस्थिती सुधारते त्यांनी त्या परिस्थिती बरोबर ज्ञान मिळवायचं आहे. आपल्या घरांतील मुलाबाळांना नव्या ज्ञानाच्या कक्षा मोकळया करून द्यायच्या आहेत, त्याला भरारी मारायला शिकवायचं आहे, त्यांच्या ऐवजी त्याला देखील पैश्याची तू चैन कर, तू मौज कर, तू खा,पी आपल्या आयुष्यात पूर्वी कधी नव्हतं आता ते मिळते आहे. अशा एका अल्पसंतुष्ट, आत्मतृप्त आणि म्हणून आत्मघातकी विचारामध्ये समाज जर राहिला तर ज्यांची परिस्थिती सुधारते ते ही तसेच ज्यास्त सुधारलेले रहात नाहीत. अशा रीतीने आपल्या बुद्धीची वाढ, पर्यायाने आपल्या ज्ञानाची वाढ आणि अखेर शेवटी आपल्या प्रगतीची वाढ खुंटायला ते कारणीभूत होतात. हाही एक विचार या संदर्भात लक्षात घेतला पाहिजे. तेव्हा अज्ञान, ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये अज्ञान केवढं प्रचंड आणि मोठं आहे ते तुम्ही लक्षात घ्या. शाळेत मुलांना शिकवायला पाठवितो,

त्या वेळेला आपल्या डोक्यात एकच विचार असतो की शिकला की तो नोकरीला जाईल. दुर्दैवाने आपल्या शिक्षणामुळे, शिक्षण पद्धतीत असलेल्या परीक्षा पद्धतीमृळे, परीक्षा पद्धतीत असलेल्या अनेक चुकीच्या कल्पनामुळे, शिक्षण, हे समाजरचनेच्या आवश्यकतेचे एक महत्त्वाचं साधन आहे, मनाच्या वाढीचं, बुद्धीच्या वाढीचं, संस्कृतीच्या वाढीचे ही कल्पनासुद्धा समाजातून हळू हळू नाहीशी होत चाललेली आहे. मी तर असे म्हणेन याच्या पुढे शिक्षणाचा आणि नोकरीचा संबंध जितका कमी होईल तितका अधिक चांगला, नोकरीचा आणि वेगवेगळया व्यवहार ज्ञानाचा ज्या शिक्षणामध्ये संबंध असेल तेवढयापुरता तो राहील. परंतु इतिहास शिकण्याने, भूगोल शिकण्याने, गणित शिकण्याने, भाषा शिकण्याने, मनाच्या ज्या वेगवेगळया शक्तींचा असा जो विकास होत असतो त्याच्याकडे आपण दुर्लक्ष करतो सध्या. मॅट्रीक झालेल्या मुलाला या देशातल्या अनेक घडामोडींचं ज्ञान असत नाही, मुलाखतीसाठी अनेक लोक बोलावल्यानतर ते प्रश्नांची काय गमतीदार उत्तरे देतात. वर्तमानपत्रांतून ती प्रसिद्ध झालेली आहेत इतकं प्रचंड अज्ञान शिकून प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांच्या बाबतीत सुद्धा दिसतं. असं पाहिल्यानंतर ज्यांची परिस्थिती सुधारली ते अज्ञानी, ज्यांची सुधारली नाही ते अज्ञानी आणि जे स्वतः शिकले असे म्हणतात ते ही अज्ञानी.

अशा एका विचित्र परिस्थितीमध्ये आज आपण सापडलो असल्यामुळे ज्ञानाचा काही एक एक नवा अर्थ, ज्ञानाची काही एक नवी संकल्पना समाजापर्यन्त पोहोचविण्याचे विचार राजकीय नेतृत्व करणाऱ्यांनी सामाजिक नेतृत्व करणाऱ्यांनी शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्यांनी आज समाजापुढे नेण्याची गरज निर्माण झालेली आहे. या मुद्दे वरती मी अधिक जोर देतो की जगातली आतापर्यन्तची सगळी राष्ट्रं कशाच्या बळावरती पुढे गेली असतील तर ती ज्ञानाच्या बळावर. युरोपातील सामाजिक क्रांती कशातून निर्माण झाली ? गॅलिलिओने लावलेल्या दुर्बिणीच्या

शोधातून, न्यूटनने लावलेल्या गुरुत्वाकर्षणाच्या शोधातून, कोपर्निकसने सांगितलेल्या पृथ्वीच्या आणि सूर्याच्या गतीच्या सिद्धांतातून या सगळया नव्या ज्ञानाचा शोध लागल्यानंतर त्याच्या आधारावरती माणसाला या पृथ्वीची रहस्ये कळली आणि सृष्टी माझ्यावरती नियंत्रण करते तिचे नियम मी जाणून घेतले की मी या सृष्टीचे नियंत्रण करीन अशा जिद्दीतून युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि ज्या क्षणी औद्योगिक क्रांती झाली त्याच क्षणी धर्माची, राजकारणाची, जमीनदारीची, वेगवेगळया कल्पनांची मनावरची बंधने गळून पडली असा युरोपचा सबंध वैचारिक इतिहास आहे, विकासाचा इतिहास आहे. नेमकी हीच गोष्ट आपल्याला करायला पाहिजे. केवळ राजकीय कायदे करून विधानसभेमध्ये वेगवेगळया प्रकारचे नियम पास करून, समाजाचं परिवर्तन होत नाही, समाजाचं परिवर्तन करायला कायदा निश्चितच मदत करतो. परंतु या कायद्याचा अर्थ खऱ्या अर्थाने जीवनामध्यें उतरण्यासाठी त्याला आपल्या प्रत्यक्ष कर्तृत्वाची आणि विचाराची जोड द्यावी लागते म्हणून ज्ञानाची गरज आहे. आनंदाची गोष्ट आहे की अशा प्रकारच्या ज्ञानाची आराधना, अशा प्रकारच्या ज्ञानाची साधना, या देशामध्ये आज सगळया क्षेत्रांमध्ये चाललेली आहे. त्याचं प्रमाण अल्प आहे. आज जगामध्ये ज्या ज्या ज्ञानाच्या वाटा आहेत, आज जगामध्ये जे जे महत्वांचे उद्योग आहेत, आज जगामध्ये जी जी आर्थिक संक्रमणाची साधने निर्माण झालेली आहेत ती सगळी या देशामध्ये निर्माण होत आहेत. ही गोष्ट अनेक लोकांना ठाऊक नसते. इलेक्ट्रॉनिक्सचे क्षेत्र घेतलं, आण्विकशास्त्र, अणूसंबंधीच्या संशोधनाचं क्षेत्र घेतलं, वेगवेगळया उद्योगधंद्यांना लागणाऱ्या मशिनरी निर्माण करण्याचं क्षेत्र घेतलं, वेगवेगळया प्रकारच्या वैज्ञानिक अशा प्रकारच्या प्रयोग शाळेतून निर्माण होणाऱ्या ज्ञानाचं नव्या संशोधनाचं क्षेत्र घेतलं, निरनिराळया प्रकारच्या, ज्याला पायाभूत गरजा असे म्हणतो, त्या गरजांसंबंधी अभ्यास करणारी जी वेगवेगळी क्षेत्रे

घेतली, तर पंडितजींच्या दूरदृष्टी ध्येय धोरणांतून, त्यांच्या विज्ञान निष्ठेतून, त्यांच्या बुद्धिवादातून या देशात जर पहिली गोष्ट कोणती आणली, तर त्यांनी त्यांचं नियोजन आणलं. पंच–वार्षिक योजना आणली. ज्यांचा विकास झालेला नाही आणि विकासाच्या मार्गावरती लागलेले आहेत, अशा देशांमध्ये भारत हाच पहिला देश आहे की ज्याने रशियाच्या पंचवार्षिक योज–नेच्या पद्धतीची, पंचवार्षिक योजनेची नियोजन पद्धत या देशात आणली. आम्ही आपल्या साधन संपत्तीचा आढावा घेतला, आपल्या साधन संपत्तीची मोजदाद केली आणि आपल्याला प्राधान्याने काय साधायचं आहे आणि ते साधायच्या यादीमध्ये पंडितजींनी शास्त्राला, विज्ञाननिष्ठेला, ज्ञानाला फार महत्त्वाचं स्थान दिलेलं होतं. पण ते स्थान वरती राहयलं आहे, खालपर्यन्त पोहोचलं नाही ही माझी तक्रार आहे.

हे ज्ञानाचे झरे तिथंच झरत राहिले त्याचे परिणाम आज आपल्याला दिसताहेत. आकाशामध्ये आर्यभट्ट भ्रमण करताना दिसतो आहे, आणि राजस्थानच्या पोखरणच्या वाळवंटामध्ये अणूंचा स्फोट झालेला आहे. हे आपण पहातो आहे आणि या अणुशक्तीचा उपयोग वीज निर्मितीसाठी, वेगवेगळ्या प्रकारची रसायने, वेगवेगळ्या प्रकारची औषधे, वेगवेगळ्या प्रकारची बी बीयाणे या सगळ्यासाठी होणार आहे, हे अनेक लोकांना माहित नसतं. या देशामध्ये आणखी एक प्रचंड प्रयोग शेतीच्या दृष्टीनं, गंगा नदी कावेरीला जोडून गंगा–यमुनेचं पाणी या सबंध देशामध्ये खेळविण्याचा योजनाकारांच्या डोक्यामध्ये आहे. परंतु या प्रचंड योजनेला लागणारे जे शास्त्रीय सिद्धांत आहेत ते झटक्यात अमलात आणावयाचे असतील तर या पोखरण सारख्या, ज्या ठिकाणी भूमिगत अशा प्रकारचे स्फोट करण्यात आले. त्या प्रकारच्या आण्विक शक्तीची गरज लागणार आहे. हा विचार त्याच्यामागे आहे. ज्यावेळी आपण म्हणतो, शांततेसाठी, समृद्धीसाठी या अणुशक्तीच्या आम्ही मागे

लागलेलो आहोत त्यावेळेला त्याचा निश्चित काय अर्थ असतो हे बऱ्याच वेळेला माहित नसतं. बऱ्याच लोकाना आनंद होतो आणि अणूबाँबचा स्फोट केला. आता आम्ही बऱ्याच वरती जाऊन बसलो. किती अज्ञान असतं. आपल्याला आता असं वाटतं की आम्ही चीनसारखे अणुबाँबयुक्त झालो. आणि फरॉन्स, जर्मनी, ब्रिटन, अमेरिका, रशिया आणि चायना यांच्या बरोबरीने जाऊन बसलो हा केवळ आनंद मिळविण्यासाठी ही गोष्ट झालेली नसते. उद्या वेगवेगळ्या प्रकारच्या नागरिक योजना आखायच्या आहेत त्यामध्ये या शक्तीचा कसा उपयोग करायचा या दृष्टीने त्याचा पायाभूत अशा प्रकारचा अंदाज घेण्यासाठी म्हणून हे प्रयोग झालेले असतात. म्हणजे वरच्या क्षेत्रांमध्ये पंडितजींनी जी नवी दृष्टी शास्त्राची आणून दिली त्याचे दर्शन, त्याची फळं आज आपण पहातो आहोत. म्हणून आज अवजड कारखाने दिसतात आपल्याकडे. ज्या वेळी पंडितजींवरती फार मोठी टीका होत असे, या गरिबांना पोटभर खायला मिळत नाही अशा वेळेला तुम्ही त्या पोलादाच्या भट्ट्या कशाला बांधता ? राऊरकेला, भिलाई, ते दुर्गापूर आणि त्या जमशेटपूरच्या टाटांच्या पोलाद लोखंडाच्या भट्ट्या हे हवं कशाला ? परंतू त्या दूर दृष्टी असलेल्या माणसाने जगाच्या स्पर्धेमध्ये हा देश टिकून राह्यचा असेल, या देशाचं स्वातंत्र्य टिकवायचं असेल, आणि याची सर्व संरक्षणाची फळी जर मजबूत करायची असेल, तर आवश्यक अशा प्रकारच्या ज्या पायाभूत गरजा या देशातच पूर्ण झाल्या पाहिजेत म्हणून अत्यंत आवश्यक अशा प्रकारच्या गरजांना देखील दुसरं प्राधान्य देऊन राष्ट्राच्या दृष्टीनं महत्त्वाची जी असलेली गरज पहिल्यांदा हातात घेतली. म्हणूनच आज आपण पोलादाच्या आणि लोखंडाच्या बाबतीत स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करू शकलेलो आहोत. या दृष्टीने ज्या वेळी आपण पहातो त्या वेळी ज्ञानाची एक कक्षा राष्ट्राच्या कार्यक्रमाच्या आलेखामध्ये कुठेतरी आपल्याला स्पष्टपणे उमटलेली दिसते. त्याचा आपणाला अभिमान वाटला पाहिजे.

आणि विकसनशील देश म्हणून जरी आपण ओळखलो जात असलो तरी या देशाकडून तंत्रज्ञान, शास्त्रज्ञ, वेगवेगळ्या प्रकारची उपकरणे वेगवेगळ्या प्रकारच्या मशिनरींचा पुरवठा 'आम्हाला करा हो' म्हणून इतर राष्ट्रं आता आमचेकडे येऊ लागलेली आहेत. बंगलोरचा आमचा हिंदुस्थान मशिन टूल नावाचा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये लागणारी यंत्रे निर्माण करणारा प्रचंड अशा प्रकारचा प्रकल्प आहे. अलीकडे इराकने तिथल्या शास्त्रज्ञांच्या मदतीने, तिथल्या तंत्रज्ञांच्या मदतीने आपल्याही देशामध्ये तशा प्रकारचा कारखाना काढण्यासाठी नुकताच करार केल्याचे आपण कदाचित वाचले असेल. आपणाला कदाचित ठाऊक नसेल की अनेक देशांना वेगवेगळ्या कच्या मालाची गरज असल्यामुळे ती माणसे आज आमच्याकडे करारासाठी येत आहेत. अल्युमिनियमसाठी इराणसारखं राष्ट्र आज आमच्याकडे येत आहे.

तेव्हा हा विचार ज्ञानाच्या एका विशिष्ट पातळीवरती या देशामध्ये चाललेला असताना त्याच्या खालच्या पातळीवरती मात्र हा ज्ञानाचा प्रवाह जितका झिरपायला पाहिजे होता तितका झिरपलेला आपल्याला दिसत नाही. आणि म्हणून हे नवं ज्ञान, ही नवी वैज्ञानिक दृष्टी, ऐहिकतेची दृष्टी, नव्या कल्पना शोधण्याची दृष्टी, आपल्या लहान मुलांना उपजतच मिळाली पाहिजे. त्यांच्या कुटुंबामध्ये जर खोटयाच समजुती आज असतील, भुतेखेते, जादुटोणे, नवससायासाचे आणि व्रतवैकल्याचेच जर त्यांचे वरती संस्कार असतील तर त्यांची मनं त्या बंधनातून कधीच मुक्त होणार नाहीत आणि जगाच्या चाललेल्या या स्पर्धेतल्या ज्ञानाची ही शिदोरी आहे. ती त्याला कधीच अवगत करता येणार नाही आणि त्यांची मनं सतत मागासलेली राहतील. म्हणून वरच्या राष्ट्रीय पातळीवरती निर्माण झालेल्या ज्ञानाचा प्रवाह हा जेव्हा झरत झरत खालपर्यंत येईल त्यावेळी युरोपमध्ये एक धर्मनष्ट कुठल्याही बाह्य बंधनापासून मुक्त अशा प्रकारचा समाज निर्माण

झाला तशा प्रकारचा समाज आपल्याला या ठिकाणी निश्चितच निर्माण करता येईल. म्हणून या अज्ञानासंबंधी आपण जितका खोलवर विचार करू तर तुमच्या असं लक्षात येईल की ते फारच प्रचंड आहे. आणि पुरुषांच्या साक्षरतेकडून तुम्ही स्त्रियांच्या साक्षरतेकडे वळलात तर २० टक्कयांची साक्षरता. त्या २० टक्कयांमध्ये तशा खऱ्या अर्थाने सुशिक्षित, सुसंस्कृत, ज्ञानवंत अशा किती स्त्रिया मिळतील? आपल्या देशाच्या पंतप्रधान इंदिराजी आहेत म्हणून स्त्रियांनी सगळंच कर्तृत्व गाजवलं आहे असं म्हणून अपवादाला नियम समजण्याची चूक आपण करू नये असे मला वाटते हे आपल्याच देशामध्ये दिसतं. ज्या प्रमाणामध्ये स्त्रियांमध्ये बुद्धीचा, ज्ञानाचा साठा पोहोचायला पाहिजे तितका अजून नाही पोहोचलेला. अजून लिहावाचायलासुद्धा आपल्या स्त्रिया शिकलेल्या नाहीत. ग्रामीण भागामध्ये पुरुषांची गुलाम याच्या पलीकडे स्त्रीला महत्त्व नाही.

राष्ट्रात जो नवा विचार येत असतो त्या नव्या विचाराला जुळवून घेणारी मन:स्थिती लोकांची नसेल तर लोक पुढे जात नाहीत. फॅमिली प्लॅनिंगचे उदाहरण घ्या, कुटुंब नियोजनाच्या बाबतीत किती अडथळे खेडयांतून आपल्याला येतात? लोकांना नानातऱ्हेने समजावून सांगावं लागतं तरी देखील त्यांच्या मनावरती जुनी असलेली दडपणं, पुरुषांचा असलेला त्यांच्या मनावरती दाब कमी होत नाही कुटुंबनियोजनाच्या शिबिरामध्ये पुरुषांचे शिबीर असले की पुरुष लोक येतच नाहीत आणि स्त्रियांचं शिबिर असलं की स्त्रिया येत असल्या तरी अडवणारे पुरुष असतात. हे प्रत्यक्ष वास्तव चित्र दिसतं, हे अज्ञानातून निर्माण झालेलं आहे. राष्ट्राच्या समस्यांच पूर्ण ज्ञान न झाल्यामुळे, पुढे एक संकट आपल्याला गिळणार आहे याची कल्पना न आल्यामुळे, हे निर्माण झाले आहे. हे समाजाला सांगायचं कोणी ? हे अज्ञानाचं पटल आहे. असे अनेक क्षेत्रांमध्ये आहे. काल मी देवीच्या रोगासंबंधी उदाहरण दिलं आपल्याला रस्त्यावर लिहावं लागतं, " देवीची केस कळवा

नि हजार रुपये मिळवा" हे कशाचं प्रतीक आहे? हा सिंबॉल आहे, आमच्या अज्ञानाचा ! आमच्या अज्ञानाचे, धर्मभोळेपणाचे, आमच्यामध्ये असलेल्या संस्कारांतून बाहेर न पडण्याच्या वृत्तीचे ते दर्शन असल्यामुळे हे भेदण्याचे काम शासनाने व सामाजिक कार्यकर्त्यांनी, संस्थांनी जर हातांत घेतलं नाही तर सगळे फरक फक्त कागदावर घडताना दिसतील. प्रत्यक्ष जीवनात दिसणार नाहीत. म्हणून या अज्ञानाचा या ठिकाणी मुद्दाम मी उल्लेख केला.

दुसरा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आणि तो म्हणजे दारिद्रय, दारिद्रय या देशाच्या पाचवीला अगदी शतकानुशतकं पुजलेलं आहे. एक काळ असा होता की देशातले प्रत्येक खेडं स्वयंपूर्ण होतं. आणि महात्माजींसारख्या थोर पुरुषानं या देशाचं जे स्वप्न रंगवलेलं होतं, ते स्वयंपूर्ण खेडयांतून निर्माण झालेल्या स्वयंपूर्ण राष्ट्राचं होत. ते कितपत यशस्वी झालं असतं या चर्चेत आपणाला शिरायचं नाही. परंतू त्याच्या मागची भावना मात्र निश्चित समजावून घेता येईल. त्यांना त्यावेळी म्हणायचं होत की या देशातला खरा माणूस हा खेड्यामध्ये राहतो. त्याची सुखदु:खं ही वेगळी आहेत. त्यांचे प्रश्न वेगळे आहेत. म्हणून त्यांची उत्तरे वेगळी शोधली पाहिजेत. मोठे कारखाने घालून त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. म्हणून खेड्यापासून विकासाला सुरवात करा आणि ग्रामोद्योगाची संघटना बांधा. म्हणून वेगवेगळया प्रकारच्या ग्राम शिक्षणाची योजना आणा. आणि या ग्रामापासून सुरवात केली की या ग्राम–राज्यातून सुराज्य निर्माण होईल. त्यांच्यामागे हा स्वयंपूर्णतेचा आणि स्वयंपूर्णतेतून तिथल्या माणसाचं जीवन सुसह्य करण्याचा प्रयोग होता.

आपण, मी काल म्हटल्याप्रमाणे, राजकीय क्षेत्रामध्ये समन्वय–वादी धोरण स्वीकारलं. आपण असे म्हटलं, की या देशामध्ये लोकशाहीसुद्धा असेल आणि त्याच बरोबर समाजवादसुद्धा

असेल. युरोपच्या इतिहासात असे घडलेलं नाही. मार्क्सने सांगितलेल्या तत्त्वाप्रमाणे रशियाने एक पक्षीय हुकूमशाही स्थापना करून समाजवाद आणला. चायनामध्ये शेतकऱ्यांचं राज्य निर्माण झालं आणि तिथं समाजवाद आला तर पश्चिम युरोपमध्ये भांडवलशाहीवरती आधारलेला अशा प्रकारचा समाजवाद निर्माण झाला. आणि त्या भांडवलशाहीवरती आधारलेल्या समाजवादातून साम्राज्यवादी अशा प्रकारची राष्ट्रं निर्माण झाली. पंडितजींमुळे सर्व समावेशक अशा प्रकारची घटना या देशाला मिळाली. आणि सर्व समावेशक करीत असताना आपण अनेक गोष्टी हळू हळू गमावत गेलो. आपण लोकशाही आणली, आपण समाजवाद आणला. एक पक्षीय लोकशाही करून समाजवाद आणता आला असता पण आपण म्हटलं की आम्हाला समाजवाद हवा, समाजाचं कल्याण हवं पण काही वर्गावरती अत्याचार करून, रक्तपाती क्रांती करून, दुसऱ्याचं हिसकावूनघेऊन दुसऱ्याला मारून तो आम्हाला नको. प्रत्येकाला मतस्वातंत्र्य असलेली लोकशाही घेऊन आम्हांला समाजवाद आणायचा आहे. समाजवाद आणला रशियाकडून आणि लोकशाहीची कल्पना घेतली पश्चिम युरोपकडून. नंतर आम्ही म्हटलं की व्यक्तिस्वातंत्र्यसुद्धा हवं. मानवी प्रतिष्ठेवरती आमचा विश्वास आहे. रशियातली चीनमधली व्यक्तीची जी गळचेपी आहे ती आम्हांला नको. व्यक्तिस्वातंत्र्य दिल्यानंतर त्याला मूलभूत हक्क असतील, मालमत्तेचे, वेगवेगळ्या प्रकारचे, धनार्जनाचे, वेगवेगळ्या प्रकारचे स्वतःचे हक्क मिळवून घेण्याचे असे मूलभूत हक्क त्याला असतील. व्यक्तिस्वातंत्र्य देत असताना आम्ही असं म्हटलं की हे कुठल्या धर्माचे राज्य असणार नाही. म्हणून धर्मनिरपेक्ष आमचं राज्य राहील अशी संकल्पना त्याच्या मध्ये मांडली. आम्ही असे म्हटलं की इतल्या राष्ट्रातल्या प्रत्येक सुजाण नागरिकांना मताचा हक्क असेल, तो शिकलेला असो किंवा नसो– आणि म्हणून त्यांना आम्ही मताचा हक्क दिला. स्त्रीला दिला, पुरूषाला दिला. अशा रीतीने जगातलं

जेवढे जेवढे चांगलं होतं ते ते आणून, एक नवा प्रयोग या देशामध्ये १९४७ सालापासून आम्ही सुरू केला. परंतू हे करत असताना या कल्पना मी मघाशी म्हटल्यांप्रमाणे ज्या खालच्या थरापर्यंत जायला हव्या होत्या, त्या न गेल्यामुळे व्यक्ति-स्वातंत्र्याचे चुकीचे अर्थ लावले गेले. समाजवादाला लोकशाहीची जोड दिल्यामुळे, सर्व समन्वय साधण्याचा प्रयोग करण्यात आल्या-मुळे समाजवाद साधायच्या ऐवजी आपण भांडवलशाही समाज निर्माण करण्याकडे हळू हळू झुकत गेलो. आणि धर्मनिरपेक्षतेच्या कल्पनेचा आपण अट्टाहास धरत असताना धर्मनिरपेक्षतेचा धर्म-हीनता असा अर्थ लावून आपण आपल्या सगळ्या समाजामध्ये एक प्रकारची नैतिक शिथिलता कोणत्याही जबाबदारीची जाणीव नसलेली अशा प्रकारची आत्मकेंद्रित भावना आपण समाजामध्ये हळू हळू आणायला लागलो आणि दुःष्परिणाम आपल्याला भोगावे लागले. चांगल्या कल्पनेतले चांगलं तेवढं आपण टाकून दिलं, त्याचं वाईटपण आपल्या हाताला आलं असे हे विरोधाभासाचं चित्र आपल्याला दिसतं.

समाजवाद म्हणजे काय ते मी काल सांगितलं. मनुष्यमात्रामध्ये असलेली एकत्वाची भावना मनामध्ये जागी झाली की प्रत्येक माणसाने आपल्या कल्याणाचा वाटा दुसऱ्याला देण्याची तयारी ठेवणं, याला समाजवाद असे म्हणतात. आणि या देशा-तील समाजवाद हा व्यक्तिस्वातंत्र्यावरती आघात करणारा अस-णार नाही. तो वर्गविग्रहातून निर्माण होणार नाही. श्रीमंत आणि गरिब, जमिनदार आणि त्याचा शेतकरी, कारखानदार-भांडवल-दार आणि त्याचा कामगार, त्यांच्या लढाई होऊन, रक्तमय क्रांती होऊन, समाजवाद निर्माण होईल अशी हिंसेची भाषा आम्ही बोललो नाही आणि म्हणून आम्ही सगळ्यांना मुक्तद्वार ठेवलं. पण झालं काय या मुक्तद्वारामुळे? व्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ वेग-ळाच लावला गेला आणि त्या व्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ वेगळा लावला गेल्यामुळे धनार्जन हेच माझं मुख्य उद्दिष्ट आहे. स्वार्थ

हेच माझं व्यक्तिस्वातंत्र्याचं अंतिम अशा प्रकारचं साध्य आहे. नैतिकताही आयुष्यामध्ये पाळलीच पाहिजे असं नाही. आणि म्हणून नैतिकता ही जीवनामध्ये दुय्यम आहे. सामाजिक जबाब–दारी पाळावयाचे माझ्यावरती बंधन नाही कारण मी व्यक्ती म्हणून स्वतंत्र आहे. अशा प्रकारच्या कल्पना रुजत गेल्यामुळे ज्या उदात्त विचाराने आपण समाजवादाची लोकशाहीशी सांगड घातली तो उदात्त विचार बाजूला राहिला आणि या समाजवा–दाची निर्मिती होण्याच्या ऐवजी आपण भांडवलशाही– मूठभर लोकांच्या हातांमध्ये संपत्तीचं केंद्रीकरण – मूठभर लोकांच्या हातांमध्ये कारखानदारीचं केंद्रीकरण, मूठभर लोकांच्या हातामध्ये सगळं हक्कांचं केंद्रीकरण अशा एका परिस्थितीला पोहो-चल्यामुळे आज ज्या वेळी आपण आकडेवारी पाहतो. तेव्हा या देशाचं उत्पन्न वाढलेलं दिसतं परंतू माणसाचं दरडोई उत्पन्न रु. ४००।– च्या पलीकडे गेलेलं दिसत नाही. आणि काही लोक दिवसाला चार आणे सुद्धा कमवत नाहीत. असं ज्या वेळी आपण दृष्य पाहतो आणि अशा प्रकारचे लोक ६० टक्क्यांहून अधिक या देशामध्ये आहेत. त्या वेळी मनाला विचार पडतो की समा–जवादाच्या ज्या कल्पनेमध्ये गांधीजी रमले, त्यांनी तर त्याच्या पुढची सर्वोदयवादाची कल्पना मांडलेली होती. सर्वोदयवादाच्या कल्पनेमधील ज्या घटनांमध्ये पंडितजी रमले ती समाजवादाची कल्पनाही नव्हती आपण कुठेतरी चुकलो. आपली काहीतरी गफलत झाली हे आपल्या लक्षात येतं. गफलत कुठे झाली हे जर आपण शोधण्याचा प्रयत्न जर केला तर तुमच्या असं लक्षात येईल की मी मघाशीं म्हटलं की व्यक्ति स्वातंत्र्याचे चुकीचे अर्थ लावले गेले, लोकशाहीच्या शक्तीचा फार वाईट रीतीने वापर केला गेला. त्यामुळे पंडितजीसारख्यांचं स्वप्न इतकी वर्षे होऊन सुद्धा पुरं होऊ शकत नाही. आणि महात्माजींनी जी विश्वस्ताची कल्पना मांडली ती विश्वस्तांची कल्पना सुद्धा या देशात रुजली नांही. व्यक्तिस्वातंत्र्य ही मूलभूत अशा प्रकारची भावना अस–ल्यामुळे तिला आपण धक्का लावायचा नाही परंतू समाजाचा

उत्कर्ष ही देखील महत्त्वाची गोष्ट असल्यामुळे समाज तर सतत पुढे गेला पाहिजे. तेव्हा धनार्जन करणारी जी माणसे असतील, जी आपल्या कर्तृत्वानं आपल्या हिंमतीनं संपत्ती वाढवतील की, समाजाने विश्वासाने माझ्या स्वाधीन केलेली ही समाजाची संपत्ती आहे, ती तू गरजेप्रमाणे वापर. आणि समाजाला ज्या ज्या वेळेला गरज लागेल त्या त्या वेळेला ती विश्वस्त म्हणून परत दे. धनवान हा निधिधारक आहे, हा ट्रस्टी आहे, हा विश्वस्त आहे. अशी खाजगी क्षेत्रासंबंधीची, व्यक्तिगत स्वातंत्र्यातून निर्माण होणाऱ्या धनार्जनाची सांगड समाजवादाशी घालण्याच्या दृष्टीने हा असा विश्वस्त मार्गाचा निधिधारकांचा सिद्धांत महात्माजीने मांडला होता. पण प्रत्यक्षात आपणाला दिसतं काय ? तर कामगारांवरती ज्यास्तीत ज्यास्त जुलूम कसे करता येतील. शेतकऱ्याला वेठबिगारीमध्ये ज्यास्तीत ज्यास्त कसा बांधून घेता येईल, हरिजनांवरती ज्यास्तीत ज्यास्त अत्याचार कसे करता येतील. गरीब दुबळ्या अशा जनतेला लुबाडून आपला फायदा कसा करता येईल, कर कसा चुकवता येईल, स्मगलिंग करून या देशाची संपूर्ण अर्थ व्यवस्था कशी कोलमडून पाडता येईल, याच्या मध्ये ज्यांच्या हातात धनार्जनाची सूत्रं होती, धनार्जनाची साधनं होती अशी माणसं सतत गुंतल्यामुळे त्या थोर महात्म्यांची स्वप्नं सगळी धुळीला मिळाली. आणि म्हणून मी काल जाता जाता माझ्या भाषणामध्ये म्हटलं की राजकीय विचाराच्या पातळीवर ज्या कोणाला वाद घालायचा असेल तर त्याला तो घालू द्या. या देशात गेल्या सहा महिन्यांमध्ये आणीबाणीची परिस्थिती पुकारून त्याला एक निश्चित अशा प्रकारच्या कुठल्यातरी एका बंदिस्त अशा प्रवाहामध्ये आणून सोडण्याचा हा जो प्रयोग होतोय तो जर या देशात चांगल्या गोष्टी आणणार असेल तर खरोखरच आपण त्याचं स्वागत केले पाहिजे. संपत्ती मिळविण्याचे, जमीन बाळगण्याचे, कारखानदारी निर्माण करण्याचे, वेगवेगळ्या प्रकारचे मूलभूत हक्क आम्हाला दिलेले असताना घटनेने ते काढून घेतले जातात म्हणजे काय ? अशा प्रकारचे प्रश्न ज्या वेळी विचारले

जातात त्या वेळी आपल्याही मनांत संभ्रम निर्माण होतो. मूल-भूत हक्कासारखी पवित्र अशा प्रकारची गोष्ट ! व्यक्तिस्वातंत्र्या-सारखी अत्यंत पवित्र अशी गोष्ट ! आणि त्याच्यावरती अन्याय होतो! ! विचार करताना थोडं आपल्याला सुद्धा चुकल्या चुकल्या सारखं वाटतं. पण जरा खोलात गेला तर त्यातील सत्य तुमच्या लक्षात येईल.

श्रेष्ठ मूल्यांच्या, व्यक्तिस्वातंत्र्याच्या बुद्धिवादाच्या मूलभूत हक्काच्या नावाखाली स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी ही आपली बुद्धी कशी वापरावयाची आणि खोटया गोष्टी कशा दडवायच्या व साधायच्या याचे प्रयोग करणारे लोक या जगामध्ये ज्यास्त हुषार असतात. ही माणसं अशा प्रकारचा आभास नेहमीच निर्माण करत आलेली आहेत. या माणसांनी ज्या गरिबाच्या पोटाला दोन वेळच काय, एक वेळेला सुद्धा खायला मिळत नाही, त्या माणसा-च्या आयुष्याचा कधी विचार केलेला नाही. गिरणीत काम करून घाम गाळणाऱ्या माणसाला आपल्या मुलाचं शिक्षण कसं होईल याची भ्रांत कशी पडते याचा ज्यांनी कधी विचार केला नाही. शेतामध्ये घाम गाळणाऱ्या माणसाच्या पोटामध्ये दोन अन्नाचे कणही जात नाहीत, याचा ज्यांनी कधी विचार केला नाही त्यांनी स्वतःच्या हक्काची, स्वतःच्या स्वातंत्र्याची, स्वतःच्या विचारांची प्रौढी मिरवावी आणि कुठल्यातरी बुद्धिवादाच्या, युक्तिवादा-च्या जोरावरती आमजनतेची, दिशाभूल करण्याचा प्रयत्न करावा ही खरं तर दुर्दैवाची गोष्ट आहे. या विषयावरती मी मुद्दाम बोलणार आहे. मूलभूत कल्पनेचा अर्थ काय? मूलभूत हक्काची संकल्पना खरोखरच पवित्र आहे काय? समाजाचा इतिहास जरा पहाः या मालकी हक्काच्या कल्पना कुणी निर्माण केल्या? मालकी हक्काच्या कल्पना या जुन्या जमान्यातल्या कल्पना आहेत. ज्या जमान्यामध्ये अर्थार्जनाची साधनं अत्यंत दुर्बळ व किरकोळ होती. निसर्गाचे माणसांवर जबरदस्त बंधन होतं. तुम्ही ठरवलं तरी तुम्हाला वाटेल तितके निर्माण करता येत नव्हते. अशा काळामध्ये

व्यक्तीला प्रेरणा देऊन त्याच्याकडून उत्पादन काढण्यासाठी म्हणून ही कल्पना जन्मली होती. आजचा काळ बदलेला आहे. आजच्या काळामध्ये धनार्जनाची साधनं इतक्या प्रचंड प्रमाणांत वाढलेली आहेत, इतक्या प्रचंड गतीने वाढलेली आहेत, आणि इतक्या वेग-वान रीतीने ती सतत वाढत आहेत की अशा प्रकारची साधनं जर काही मूठभर लोकांच्या हातात ठेवली तर बहुसंख्य समाज बेकार बनल्याशिवाय राहणार नाही. बहुसंख्य समाजाचं स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठी, बहुंसंख्य समाजाला प्रगतीचे मार्ग प्राप्त करून देण्यासाठी, प्राथामिक संधी प्राप्त करून देण्यासाठी, मूठभर लोकांच्या हक्कावरती कधी - कधी जर नियंत्रण घालावं लागलं तर ती आवश्यक गोष्ट आहे. अशी काळाप्रमाणे बदललेली ही कल्पना आहे. आणि दुसरा विचार असा की ज्यावेळेला मूलभूत हक्कासंबंधी आपण बोलतो तर खरोखर कशासंबंधी बोलतो ? ज्यावेळेला असं म्हणतो की सगळे समान आहोत! त्याचा अर्थ काय ? एखाद्या शर्यतीमध्ये सोळा वर्षांचा मुलगा आणि सहा वर्षांचा मुलगा यांना उभं करायचं आणि आपण म्हणायचं की तुम्हाला समान हक्क दिलेले आहेत. धावण्याची समानसंधी आहे. शर्यतीचे अंतर सारखंच धावायचं आहे, शंभर मीटरच धावायचं आहे. वेळ तुम्ही घ्याल तितका आहे. त्यामुळे या शर्यतीमध्ये कोण जिंकेल हे तुम्ही आपोआपच मनाशी ठरवू शकाल. सहा वर्षांचा मुलगा त्या सोळा वर्षांच्या मुलाबरोबर धावूच शकणार नाही. कारण त्याच्या पायांमध्ये ती ताकदच अजून निर्माण झालेली नाही. आणि म्हणून या समान हक्काचा, या मूलभूत हक्काचा त्याच्या दृष्टीने काडीचाही उपयोग नाही. आणि म्हणून मग समाजाची जबाबदारी अशी पडते, राज्ययंत्रणेची जबाबदारी अशी पडते की या सहा वर्षांच्या मुलाच्या मध्ये ज्या वेळेला सोळा वर्षा-च्या मुलाची पात्रता निर्माण होईल, त्याच्या पायामध्ये ज्या वेळी धावण्याची शक्ती निर्माण होईल, त्याच्या मध्ये त्या स्पर्धेचा खरा गुण त्याच्या अंगातून, रक्तातून, धमन्यांतून वाहायला लागेल त्या

वेळेला मग आम्ही सांगू आता धावायला लागा म्हणून त्याला. पहिल्यांदा हात देऊन वर काढण्यासाठी त्या १६ वर्षाच्या मुलाला सांगाव लागेल, की ज़रा थांब जरा मागे रहा, इतक्या अंतरावर उभा रहा आणि नंतरच या स्पर्धेमध्ये तू भाग घे. मूलभूत स्वातंत्र्याच्या कल्पनेमध्ये हा जो विरोधाभास दिसतो त्या विरोधाभासाचे उत्तर आपल्याला इथं सापडतं.

मला असं नेहमी वाटत आलेलं आहे की आपण ज्या मूलभूत हक्काचा विचार करतो ते मूलभूत हक्क किती लोकांना मिळालेले असतात? संपत्ती राखण्याचा हक्क, जमिनी संपादनाचा हक्क, अर्थार्जन साधन गोळा करण्याचा हक्क. हे हक्क सर्वांना बहाल केलेले आहेत पण तशी सर्वांची परिस्थिती आहे का? सर्वांनाच तशा प्रकारची संधी आहे काय? ' धनार्जनाच्या साधनांच्या प्रचंड वाढी मध्ये मी ते करू शकत नसल्यामुळे या स्पर्धेत बहुसंख्य दुबळा समाज उभाच राहू शकत नाही. फक्त कागदावरती मला मूलभूत हक्क दिला आहे. जमीन संपादनाचा तुला हक्क दिला आहे अरे, पण संपादन करण्याची कुवतच माझ्याकडे नाही. तेवढी संधीच कुणी मला या आयुष्यात दिली नाही. आणि म्हणून तुम्ही मला फक्त तोंडानंच सांगणार की तुला दिला आणि उपभोग घे त्याचा मी कसा उपभोग घेऊ शकणार? अशा दुबळ्या समाजाला पहिला हात देणं त्याच्या संरक्षणासाठी फळी निर्माण करणं ही आज आवश्यक गरज निर्माण झाल्यामुळे या हक्कांवरती बंधन घालण्याची वेळ आलेली आहे. आणि म्हणून याच्यात वाईट वाटून घेण्याचं कारण असावं असं मला वाटतच नाही. पण ज्यानी खूप कमावलं त्यांनी समाज भावनेनं धर्म भावनेनं जर थोडंसं आपल्या बांधवासाठी काढून दिलं तर तो माणुसकीचा, खरा समाजवादाचा, लोकशाहीचा अर्थ आहे आणि म्हणून लोकशाहीच्या रक्षणासाठी, समाजवादाची संकल्पना खऱ्या अर्थाने या देशामध्ये रूजविण्यासाठी, त्याग म्हणून ही बंधने आपण स्वीकारली पाहिजेत. अशा प्रकारचा आग्रह अशा बंधनामध्ये असतो असे मला प्रामाणिकपणानं वाटतं.

दुसरी गोष्ट व्यक्ती स्वातंत्र्यासंबंधी ! विचार स्वातंत्र्यासंबंधी ! विचार स्वातंत्र्याची बऱ्याच वेळेला गळचेपी होते अशा प्रकारचा विचार अनेक बुद्धिवंत मांडतात. माझ्या देखील मनामध्ये अनेक वेळेला संभ्रम निर्माण होतो. की मला जर एखादा विचार मांडायचा असेल आणि तो सरकार विरोधी असेल तो काही प्रचलित धोरणाच्या विरूद्ध असेल तर तो मांडण्याचं स्वातंत्र्य मला का असू नये ? याच उत्तर मीच ज्यावेळेला माझ्या मनाशी शोधतो त्यावेळेला माझ्या लक्षात येतं, की गेली २५ वर्षे आम्हाला इतकं स्वातंत्र्य होतं, त्या स्वातंत्र्यात आम्ही काय केलं? कुठल्या सामाजिक उत्थानासाठी कुठला नवा विचार समाजासाठी दिला. आणि ज्यांनी गेल्या २५ वर्षांमध्ये विचारांचं वांझपण दाखवलं, ज्यांनी कसलीच प्रसूती केली नाही गेल्या २५ वर्षामध्ये, त्यांना एकदम या सहा महिन्यांच्या काळामध्ये प्रसूतिवेदना व्हायला लागल्या आणि आता " आम्हाला स्वातंत्र्य दिलं नाही तर आम्ही आता मेलो हो " असं ज्या वेळी म्हणण्याची पाळी आली त्यावेळी २५ वर्षे स्वातंत्र्याचा समाजासाठी तुम्ही कधीही लाभ घेण्यासाठी पुढे आला नाही तेव्हा मग माझ्या लक्षात येतं की वांझ असलेलं विचार स्वातंत्र्य हे विचार स्वातंत्र्यच असू शकत नाही आणि म्हणून ते समाजाच्या कल्याणासाठी कधी लाभू शकत नाही. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या आमच्या खंडप्राय देशामध्ये दारिद्र्यांत आणि अज्ञानात खितपत पडलेल्या दुबळया समाजामध्ये विचारच जिथं पोहोचलेला नाही. तिथं विचाराचं स्वातंत्र्य त्याच्यापर्यंत कुठलं पोहोचणार ? विचार स्वातंत्र्याची कल्पना मूठभर लोकांसाठी अगदी ३% लोकांसाठी असेल परंतू ९५% समाज! त्याच्यापर्यंत विचारच गेलेला नाही. विचार कोठून जाणार ? पोटाची भाकरीच गेलेली नाही, कामासाठी उद्योगच गेलेला नाही, त्या अशा दुबळया समाजासाठी जिथं पोटाची भाकरी जात नाही, तिथं विचार गेला नाही, त्याला विचार स्वातंत्र्याच्या घोषणा दिल्या, विचार स्वातंत्र्याची मोठ -

मोठी आकर्षक शब्दांची आतषबाजी केली तर त्याचे पोट भरणार नाही! हा विचार लक्षात आला की माझ्या सारख्याला असं वाटतं की काही जरी सांगावंसं वाटलं तरी जर त्याचं भलं होणार असेल तर क्षणभर माझे हे जे कांही उन्मळून येतंय ते थोडं गिळलेलं बर, असं म्हणून थोडीशी गिळण्याची तयारी ठेवली, तर मला असं वाटतं की आमच्या समाजाचा दुबळ्या थरापर्यंत जे काही जाणार असेल ते जाण्यातला मोठा अडथळा दूर होईल. तेव्हा या विचारात व्यक्ति स्वातंत्र्याच्या कल्पनांच्या विरोधी असं कांही नाही. व्यक्ति स्वातंत्र्याच्या कल्पनेचा विकास करण्यासाठी, मालमत्ता हक्काच्या कल्पनेचा विकास करण्यासाठी, हक्क कल्पना मूठभर लोकापर्यंत न राहता ती अधिक लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे, विचार करण्याचं स्वातंत्र्य मूठभर लोकापुरतं मर्यादित न राहता विचार करण्याची पात्रता अनेक लोकांमध्ये निर्माण झाली पाहिजे, म्हणून जर कदाचित त्या विशाल करण्यासाठी क्षणभर जर माझ्या विचाराला जर काही कुठे बंदिस्त असं ठेवावं लागलं तर समाज हिताच्या दृष्टीने ते केलं तर वावगं आहे अस मला स्वतःला प्रामाणिकपणाने वाटत नाही.

समाजाचं परिवर्तन घडत असताना अनेक प्रकारच्या मूल्यांची पुनर्रचना करावीच लागते. नवे आकृतिबंध बांधावे लागतात. अणूंच्या रचनेमध्ये काय असतं? वेगवेगळ्या ज्या वस्तू दिसतात त्या वस्तूमध्ये अणूंचे वेगवेगळे रचनाबंध तयार झालेले असतात. त्या रचनांमधून वेगवेगळी वस्तू वेगवेगळे आकार घेते. माणसाच्या समाजाच्या जीवन रचनेमध्ये सुद्धा वेगवेगळ्या प्रकारची मूल्ये, वेगवेगळ्या प्रकारचा आकार घेऊन ते तयार होत असते. कधी कधी अशी वेळ येते की या रचनेमध्ये त्यांची आलटापालट करावी लागते. समाज जर कुरूप दिसत असेल, समाज जर विरूप दिसत असेल, समाज जर दरिद्री दिसत असेल, समाज जर अधःपतित दिसत असेल तर ही रचना बदलली पाहिजे. मूल्यांची पुनर्रचना केली. पाहिजे. याचे प्राधान्य त्याला त्याचे याला असं

करून त्याची रचना बदलण्याचा प्रयोग झाल्यानंतर काही सुव्य–वस्था येईल असा विश्वास बाळगून या पुनर्रचनेला आपण मना–पासून प्रतिसाद दिला पाहिजे असं मला वाटतं, आजच्या या बदलत्या परिस्थितीमध्ये जे चित्र दिसतं, बदललेलं, बरेचसे आशादायक चित्र दिसतं, ते चित्र पाहिल्यानंतर कदाचित या आपल्या परिवर्तनाला अधिक गती येईल, विचाराची बैठक मिळेल आणि ज्या समाजवादाचा सर्व समावेशक अशा प्रकारचा विचार आपण करतो, त्याच्या शेवटच्या टप्प्याचा विचार प्राधान्याने आपण करायला लागू ज्या वेळीं असा विचार मनात येईल त्या वेळी सगळ्या कार्यक्रमाचे अर्थ आपणाला समजायला लागतील. मग शेतकऱ्याला देशात काय प्राधान्य मिळाले पाहिजे, कामगाराला प्राधान्य मिळाले पाहिजे, बेठबिगारी करणाऱ्या मजुराला प्राधान्य मिळालं पाहिजे, गरिब थरातून येणाऱ्या विद्यार्थ्याला प्राधान्य मिळाले पाहिजे, गुलामीमध्ये अडकलेल्या स्त्रीला प्राधान्य मिळाले पाहिजे, .कर्जामध्ये अडकलेल्या कर्जदाराला प्राधान्य मिळाले पाहिजे. या सगळ्या प्राधान्यांचा अर्थ या परिवर्तनाच्या संदर्भा–मध्ये आपल्याला कळायला लागेल. परिवर्तन हे चार–पाच माण-सांतच झालं म्हणजे सबंध समाजाचं परिवर्तन झाले असे होत नाही. ज्या वेळी सबंध समाज आतून ढवळून निघतो, सबंध समाजामध्ये मंथन घडतं, त्यावेळी त्याच्यातून निर्माण होणारे अमृततत्त्व हेच खरे कल्याणमय तत्त्व असते. ते संजीवक असते म्हणून सर्व समाजाला ढवळून टाकणारं अस हे तत्त्वज्ञान आर्थिक सामाजिक, राजकीय स्तरावरचे, आपली मूलभूत अशा प्रकारची निष्ठा न गमावता आपल्याला करता येण्यासारखं आहे. असं मला प्रामाणिकपणे वाटतं.

या माझ्या विषयामध्ये मी जे अनेक संदर्भ घेतले त्यात ऐतिहा–सिक संदर्भ होते, वेगवेगळ्या राष्ट्राचे संदर्भ होते, वेगवेगळ्या तत्त्वज्ञानाचे संदर्भ होते, तरी माझ्या मनामध्ये वर्तमानकालीन

संदर्भ हा अत्यंत महत्त्वाचा होता. आणि मला असं प्रामाणिकपणे वाटायला लागलं की लोकांमध्ये विचारक्रांती झाल्याशिवाय, मानसिकक्रांती झाल्याशिवाय या राजकीय परिवर्तनाला, सामाजिक परिवर्तनाला, सांस्कृतिक परिवर्तनाला, शैक्षणिक परिवर्तनाला खरा अर्थ प्राप्तच होणार नाही. तर दिशाहीन अशा रीतीने भटकण्यापेक्षा कुठलीतरी दिशा निश्चित आखून त्या दिशेला जाणं हे महत्त्वाचं असल्यामुळे ती दिशा कोणती हे विचाराच्याच आधाराने लोकांना आपण दाखवून दिले पाहिजे आणि म्हणून हा विचार आणि त्या विचारावरती आधारलेला आचार या दोन गोष्टी राष्ट्र उभारणीच्या कार्यामध्ये अत्यंत महत्त्वाच्या आहेत असं मला वाटतं. या परिवर्तनामध्ये विचारांचं परिवर्तन हे अत्यंत महत्त्वाचं मी मानतो. अशा प्रकारच्या प्रचलित विषयासंबंधाने मोकळ्यापणाने चर्चा व्हायला पाहिजे. मोकळेपणाने त्याच्यामध्ये भाग घ्यायला पाहिजे. कोणत्याही प्रकारचं दडपण त्या अर्थाने मनावरती ठेवण्याचं कांही कारण नाही. परंतू काही संयम म्हणून काही पथ्य म्हणून जर काही काळापुरता आपल्याला आपल्या मनाचा एखादा कोपरा जर बंद करून ठेवण्याची वेळ आली तर समाजहिताच्या दृष्टीनें, राष्ट्रहिताचे दृष्टीने ती क्षणभर आपण पाळली पाहिजे. अस मला मनापासून वाटतं.

काल कुणी तरी मला माझे भाषण संपल्यानंतर एक प्रश्न विचारला, तुम्ही जपानसंबंधी याच्यामध्ये काहीच का उल्लेख केला नाही. अर्थात उल्लेख न करण्यामध्ये तसा माझा काही हेतू नव्हता परंतू जपान हा पूर्वेकडचा देश, गौतमबुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा देश, या जपाननेही ऐहिक - सामर्थ्यावर इतकी आघाडी संपादन केलेली आहे की जगातल्या कुठल्याही यच्च्यावत गोष्टीवरती जपानचं नांव नाही असं आज तरी आढळत नाही. अशा या जपानचा उल्लेख मी केला नाही याचं कारण अगदी स्पष्ट होतं. कारण या जपानने आपल्या उत्कर्षासाठी अवलंबलेली सगळी तत्त्वं ही पाश्चात्य तत्त्वज्ञानाचीच होती. त्यांना स्वतःचं तत्त्वज्ञान

सोडावं लागलं. बुद्धाच्या तत्त्वज्ञानावरती ते उभे राहिलेले नाहीत. जपानला युरोपातलंच औद्योगीकरण स्वीकारावं लागल. युरोपातलीच ऐहिकनिष्ठा घ्यावी लागली. युरोपचा सुखवाद स्वीकारावा लागला आणि युरोपच्या तत्त्वज्ञानाला टक्कर देण्यासाठी युरोपचे तत्त्वज्ञान, स्वतःच तत्त्वज्ञान कोपऱ्यात टाकून त्याला उभं रहाव लागल्यामुळे ते जगामध्ये त्या तत्त्वज्ञानास तोंड देऊन आज उभे राहिलेले दिसतात परंतू बाकीच्या तत्त्वज्ञानाची जी परिस्थिती झाली, जो साम्राज्यवाद निर्माण झाला, तो जपानमध्ये सुद्धा झाला. आणि गौतमबुद्धाला ते नेमके त्या क्षणाला विसरले. पहिल्या, दुसऱ्या महायुद्धा मध्ये जपानचं अंग किती होते हे मी तुम्हांला सांगितलं पाहिजे अस नाही या महायुद्धाच्या काळामध्ये जपानसारख्या देशाला गौतमबुद्धाचा, सत्य - अहिंसेचा सदेश देण्याचं भान राहिलं नाही आणि त्यामुळे जपानकडे आज जरी पाश्च्यात्य लोक आशेचाकिरण म्हणून बघत असले तरी भारताला त्या देशाकडे बघण्याची गरज नाही. जपानकडून मुद्दाम जाणीवपूर्वक घेण्यासारखं असंकांही वेगळं नसल्यामुळे, त्याचा मी उल्लेख जरी मुद्दामहून टाळलेला नसला तरी आवर्जून असा केला नाही.

तुम्हांला माहित असेल की बांगलादेशाच्या प्रकरणामध्ये या देशाची मूल्ये तावून सुलाखून निघाली. असा प्रचंड क्रांतीचा, मानवतावादी इतिहास जगातल्या कुठल्याच राष्ट्रामध्ये घडलेला नसेल. दुसऱ्या राष्ट्रामध्ये होणाऱ्या गळचेपीपासून त्याचं संरक्षण करण्यासाठी आणि त्याच्या स्वातंत्र्याच्या उर्मीला अर्थ देण्यासाठी त्याग केला तो आम्ही केला. साम्राज्यवादी पिपासनेने केला नाही, हे लक्षात घ्या. तुम्हाला आम्ही सोडवायला येतो अस म्हणून त्यांनाच घशात घाल असं आमच्या देशाने केलं नाही. बाकीच्या देशांनी सगळ्या इतिहासाच्या काळामध्ये हेच केलेलं आहे. अगदी रशियासकट. हंगेरी पोलंडचा इतिहास ताजा आहे. फ्रान्सने काय केलं, ज्यांनी स्वातंत्र्य समता आणि बंधुता अशी

तत्त्वं दिली, त्या फ्रान्सने सुद्धा साम्राज्यशाही धोरण स्वीकारूनच पुढचा महायुद्धाचा घाट घातला. इंग्लंडची तीच परिस्थिती. लोकशाहीचा बडेजाव मिरवून साम्राज्यवादी, भांडवलशाही असे स्वरूप स्वीकारलं. या राष्ट्राचं अर्थशोषण केलं. या राष्ट्राचं सगळ्यात मोठं नुकसान कोणी केलं असेल तर इंग्लंडने केलेलं आहे. त्यांनी आम्हाला नव्या कल्पना दिल्या, नवं तत्त्वज्ञान दिलं, नवे विचार दिले हे सगळ खरं आहे. पण हे सगळ देत असताना आमचं रक्त सगळं त्यांनी शोषून घेतलं ते विसरता येत नाही याची जाणीव दादाभाईनी आम्हांला करून दिली, त्याची जाणीव रानडयांनी आम्हांला करून दिली, त्याची जाणीव आम्हाला टिळकांनी करून दिली. नवे विचार, नव्या कल्पना हात राखून दिल्या होत्या, मनापासून दिलेल्या नव्हत्या याचं एक उत्तम उदाहरण सांगायचं म्हणजे लॉर्ड कर्झन हा जो त्या वेळेचा गव्हर्नर होता. कलकत्ता विद्यापीठामध्ये त्यावेळेला फ्रेंच रिव्हाव्ह्यूलेशन हे पुस्तक लावलेलं होत हे ज्यावेळी त्याच्या लक्षात आलं त्या वेळी ते पुस्तक ताबडतोब रद्द करावं अशा प्रकारचा खलिता त्यानं पाठविला होता. आणि बंगालच्या अभ्यासक्रमामध्ये इंग्लडचा इतिहास शिकवला जात होता तो यापुढे शिकवला जाऊ नये अशा प्रकारचा खलिता पाठवून ते शिकवणं बंद केलं म्हणजे ज्या गोष्टींच्या आधारावरती इंग्लंड उभं राहिलं तो इतिहास या देशातील लोकांना कळता कामा नये. ज्या तत्त्वावरती फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली ती लोकशाहीची तत्त्वं या देशाला कळता कामा नयेत म्हणून विचार करणारे इंग्रज राज्यकर्ते आमचं अर्थशोषण करीत होते. तिकडे स्वातंत्र्याच्या, लोकशाहीच्या वलगना करीत होते. तेव्हा त्यांच्या देशामध्ये ते काय करतात या वरून त्यांची योग्यता ठरविण्यापेक्षा ते इतर राष्ट्राकडे कोणत्या दृष्टीने पहातात हे महत्त्वाचं असल्यामुळे आपण त्यांच्या कडून शिकायच्या गोष्टी शिकल्यानंतर आणखी त्यांचे पाय धरण्याची पाळी येऊ नये त्याची दक्षता आपण घेतली

पाहिजे. अमेरिकेसारखं राष्ट्र श्रीमंत असेल, फ्रान्ससारखं राष्ट्र श्रीमंत असेल, जर्मनीसारखं राष्ट्र श्रीमंत असेल पण श्रीमंतीच्या पलीकडे त्यांच्या मागे असलेली जी विकृती आहे. ती जोपर्यंत नाहीशी झालेली नाही, वसाहतवादावरती अजूनही त्यांना किती लोभ असतो, वर्णद्वेषामध्ये ते किती बरबटलेले आहेत आणि दुसऱ्या राष्ट्रांमध्ये लक्षावधी टनांचे बॉंब टाकताना ज्यांचे अंतः-करण यत्किंचित्‌ही द्रवत नाही. – व्हिएतनामचं अत्यंत उत्तम उदाहरण आहे. स्वातंत्र्याची केवळ एक दैदिप्यमान प्रेरणा, जगा-तल्या सर्वश्रेष्ठ, शस्त्र संपन्न अशा राष्ट्रापुढे नमू शकत नाही अशा प्रकारचं उदाहरण असताना, जगाला एक उत्तम आदर्श घालून दिला बांगला देशाच्या संदर्भात भारतीय लोकांनी. एक कोटी अशा प्रकारचे निर्वासित आम्ही पोसले. आमचे लोक उपाशी राहिले. त्या बरोबर आमच्या राज्यकर्त्यांना, आमच्या या देशातील धुरीणांना दोषी धरण्यात आलं. आमच्या लोकांना उपाशी ठेवून दुसऱ्याची पोटं कशाला भरता? ज्यांनी माणुसकीचा संदेश जगाला द्यायचा त्यांनी अमानुष बनावे, त्यांनी राक्षस बनावे अशा प्रकारची अपेक्षा सुद्धा ठेवणारे लोक या देशामध्ये होते. त्यामुळे आमची अर्थव्य-वस्था कोसळली. आम्हांला प्रश्न निर्माण झाले. अन्नधान्याचे, वेग-वेगळ्या प्रकारच्या रोगराईचे. पण आम्ही माणुसकीच्या आमच्या आमच्या प्राचीन परंपरेला जागलो. आणि जगापुढे एक मोठा आदर्श घालून दिला. इतका आदर्श घातला की त्या बांगलादेशा मध्ये वैचारिक परंपरा न निर्माण झाल्यामुळे, म. गांधी आणि जवाहरलाल नेहरूंसारखं वैचारिक नेतृत्व न लाभल्यामुळे, अत्यंत हीन अशा प्रकारचं स्वरूप तेथील राजकारणाला आलं तर त्या राजकारणामध्ये सुद्धा नंतर आम्ही ढवळाढवळ केली नाही. नाहीतर बाकीच्या देशांचे इतिहास बघा. चिलीमध्ये कसं शिरता येईल क्यूबा मध्ये कसं शिरता येईल, कोरीयामध्ये कसं शिरता येईल, आफ्रिकेतल्या वेगवेगळ्या राष्ट्रांमध्ये कसं शिरता येईल. पाकिस्तानात कसं शिरता येईल, आणि भारतातसुद्धा कसं शिरता

येईल. या उलाढाली मध्येच गुंतलेली ही साम्राज्यवादी राष्ट्रे लोकशाही समाजवाद वगैरे सगळया संकल्पनाचे बुरखे घेऊन वावरत असलेली पाहून आपल्याला आपण मागे आहोत या बद्दल दुःख वाटून घेण्याचं काही कारण नाही. ऐहिकदृष्टया जरी आम्ही मागे असलो तरी नैतिक आणि धर्मभावनेच्या दृष्टीने आम्ही खरोखरच फार पुढे आहोत. आणि त्या मुळे बर्ट्रांडरसेल सारख्या तत्त्ववेत्त्याला, पाश्चात देशाला सांगावे लागले की तुमची आता भौतिक प्रगती पुरे झाली. तुमची विमाने आता पुरी झाली, तुमचे बॉंब आता पुरे झाले. तुमच्या या भौतिकतेला आणि त्यातून नीतिमत्तेच्या ऱ्हासाला जर तुम्हाला खीळ घालायची असेल आणि नवा प्रकाश बघायचा असेल तर जरा पूर्वेकडे चला. बर्ट्रांड रसेल सारख्या तत्त्ववेत्त्याला असे सांगावं लागलं. आणि आजही तिकडचे तत्त्वज्ञानी भारताच्या तत्त्वज्ञानासंबंधी पुस्तके लिहितात आणि आवर्जून सांगतात की तुम्हाला ज्ञानाचा प्रकाश हवा असेल, माणूसकीचा प्रकाश हवा असेल, निरनिराळ्या प्रश्नांची उत्तरे हवी असतील तर पूर्वेकडील आशियाई देशांकडे चला. आशियातील एक आशास्थान म्हणून भारताचं जे कर्तृत्व आहे हे या परिवर्तनाच्या दृष्टीने फार मोलाचं आहे असा विचार मी माझ्या भाषणाच्या प्रारंभीच मांडला होता. परिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वाचा विचार आहे. सगळ्या जगाची दृष्टी आमच्याकडे लागलेली आहे. एक कसोटीचा दगड म्हणून. इथं लोकशाही घासली जाते. समाजवाद इथं घासला जातो व्यक्ति स्वातंत्र्य इथं घासलं जात आहे. धर्मनिरपेक्षता इथे घासली जात आहे. बाकीच्या देशांनी गुंडाळून ठेवलंय सगळं. फक्त शोभेसाठी म्हणून अक्षरांमध्ये लिहून ठेवलेलं आहे. प्रत्यक्षामध्ये माणुसकीचा जिथे जिथे चक्काचूर करता येईल तिथे तिथे तो चक्काचूर करण्याचीच स्पर्धा लागलेली आहे. पण या देशामध्ये दारिद्रय असताना, अज्ञान असताना, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा प्रकारच्या अनेक समस्या असताना सुद्धा हा प्रयोग यशस्वी करण्याची एक जिद्द आहे, सामान्य

माणसामध्ये एक प्रकारचा त्याच्या बद्दल आत्मविश्वास आहे आणि म्हणून या प्रयोगाचं काय होणार आहे, याच्यातून काय निष्पन्न होणार आहे. याची काय फलश्रुती होणार आहे, याच्याकडे सगळ्या जगाचं लक्ष लागलेलं आहे. आमच्या राजकारणामध्ये सगळेजण लक्ष घालतात, रस घेतात, ते बिघडवण्याचाही प्रयोग करतात. सुधारण्याचाही प्रयत्न करणारे लोक आहेत. जगामध्ये आपल्याला मित्र नाही असे नाही इतके आम्ही दुबळे झालेलो नाही इतके एकाकी आज आपण पडलेलो नाही आफ्रिकेतील राष्ट्रे, मध्य आशियातील राष्ट्रे मोठया आशेने भारताकडे बघतात. तुम्हाला माहित असेल की अलिकडच्या काळामध्ये, राजकारणामध्ये आंतरराष्ट्रीय समतोल असतो, त्यामध्ये भारताला एक फार मोठं स्थान प्राप्त झालेलं आहे. प्रचंड लोकसंख्येचा देश, खंडप्राय देश आणि वेगवेगळ्या मूल्यांची कसोटी दाखवणारा देश म्हणून आज त्याला महत्त्व प्राप्त झाल्यामुळे ही बारीक बारीक राष्ट्रे आशेचा किरण म्हणून या देशाकडे पाहतात. सिलोनचं आमच्याकडं लक्ष आहे इराणचं आमच्याकडं लक्ष आहे. इजिप्तचे आमच्याकडं लक्ष आहे, ते मदतीसाठी आमच्याकडे येतात. आमच्याकडे सामंजस्याच्या दृष्टीची अपेक्षा करतात आणि आमच्या परंपरेला धरून आम्ही ती देतो आहोत. आक्रमणांचा विचार आपल्या कधीच मनात येत नाही. आपण असं म्हटलेलं नाही आणि आमच्यावर जर देशातील लोकसंख्येचा, अन्नधान्याचा प्रश्न सोडवायला आला तर पाकिस्तानला गिळंकृत करून टाकूया, त्यांची जमीन मिळेल, त्यांचं अन्नधान्य आपल्याला मिळेल. त्याच्या पलिकडे आणखी जाऊया. जे ब्रिटनने केलं, जे फरांसने केलं, जे अमेरिकेने केलं ते करावं असा आमच्या मनांत विचार आलेला नाही. समर्थ आहोत नाही म्हणण्याचे कारण नाही. बारीक सारीक राष्ट्रं गिळण्यास आम्ही समर्थ आहोत, पुढे आंतरराष्ट्रीय राजकारणांत महायुद्ध झालं तरी त्याची पर्वा करण्याचं काय कारण आहे? अशा विचारांपर्यंत आम्ही येऊन पोहोचलो नाही हे खरो–


खरच आमचे भाग्य आहे. आणि या भाग्याचे सगळं श्रेय या देशातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उभारणी ज्यांनी ज्यांनी केली त्या नेत्याच्या व्यक्तिमत्त्वांना आणि त्यांच्या परंपरेला, सांस्कृतिक अधिष्ठानाला आहे.

आजच्या माझ्या शेवटच्या भाषणामध्ये मला वाटतं माझ्या विषयाचे बहुतेक महत्त्वाचे मुद्दे जितक्या स्पष्टपणे मांडता येतील तितक्या स्पष्ट रीतीनं आपणापुढे मांडले आहेत. मी केवळ हा विचार जो तुमच्यापुढे मांडला, तो या देशाचे आपण एक जबाबदार नागरिक या दृष्टीने तुमच्या मनामध्ये सुद्धा विचाराची एक साखळी निर्माण व्हावी, तुमच्या मनामध्ये विचारांचं मंथन सुरू व्हावं या हेतूने ज्यावेळी या देशामध्ये प्रत्येक माणसाच्या मनामध्ये राष्ट्राच्या समस्यासंबंधी, राष्ट्राच्या सामर्थ्यासंबंधी विचार सुरू होईल, त्याच्यातून त्याला या देशाला नवीन काही द्यावंसं वाटेल. माझी अशी खात्री आहे की या मनातून आलेल्या क्रांतीचा परिणाम, आज जो आपल्याला आर्थिक – राजकीय आणि सामाजिक क्षेत्रामध्ये मंदगतीने झालेला आणि म्हणून लुप्त होत असलेला दिसतो, तो तसा झालेला असणार नाही. अधिक जलदगतीने तो झालेला असेल, अशा प्रकारचा आत्मविश्वास, अशा प्रकारचा आशावाद, मी मनामध्ये बाळगला तर तो चुकीचा ठरणार नाही.

अेक अत्यंत महत्त्वाचा आणि फार मोठा आवाका असलेला असा विषय मी घेतला. कदाचित त्याच्यांत त्रुटी राहिल्या असतील. कांही उणीवा असतील. परक्याच्या दृष्टीने त्याच्यात तर्काची गल्लत असेल, परंतु त्यामध्ये समाजासंबंधी आणि या देशासंबंधी जे चिंतन मनामध्ये घडत होतं त्याचा प्रामाणिकपणा निश्चित होता. तो तुम्हाला निश्चत जाणवलेला असेल. तेव्हा या यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेच्या निमित्ताने कराडमध्ये येण्याची संधी मला मिळाली. सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये

काम करीत असताना समाजाचे जितके जवळून दर्शन मला घेता आलं त्या दर्शनाचे जे वेगवेगळे पैलू मी पाहिले, त्याच्यातून मला जे जाणवलं ते मी आपल्या पुढं मांडलं ते मांडण्याची संधी इथल्या नगरवाचनालयामार्फत मला मिळाली. त्यांच्या संयोजकांनी आग्रहपूर्वक बोलावलं. माझं नांव त्यांना कसं सुचलं कुणास ठाऊक, परंतू मला या ठिकाणी व्याख्यानासाठी बोलावलं आणि हा जो माझा सन्मान केला त्याबद्दल व सगळया श्रोत्यांचे दोन दिवस अत्यंत शांतपणाने माझं भाषण ऐकून घेतल्याबद्दल हार्दिक आभार मानून माझं भाषण संपवितो.

जयहिंद !



# ‘राजर्षि शाहु छत्रपती आणि नवभारताची मागणी’



पद्मभूषण धनंजय कीर

## नवभारतातील सामाजिक परिवर्तनाचे प्रवर्तक राजर्षि शाहु छत्रपती

शाहू हे केवळ राजे नव्हते, केवळ छत्रपती नव्हते, केवळ समाज सुधारक नव्हते; केवळ लोकोत्तर पुरुष नव्हते तर इतिहासाला कलाटणी देणारे आणि नवा इतिहास घडविणारे नवयुगातले एक महान समाजपुरुष होते.

त्यांच्या मृत्युनंतर लिहिलेल्या अग्रलेखात केसरीने असे म्हटले आहे की, “शाहू पूर्वीच्या काळात जन्माला आले असते तर त्यांनी साम्राज्य स्थापन केले असते. निरुपाय म्हणून व काही वेळा इंग्रजांच्या दडपणाखाली शाहू छत्रपतींना तत्कालीन ब्रिटिश शासनाचे हुकूम पाळावे लागले तरी सुद्धा तशा परिस्थितीत मागासवर्गीयांच्यासाठी व दलित समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी जे काम केले ते नवभारताच्या इतिहासात अपूर्व व मार्गदर्शक ठरले.” या बाबत खुद्द शाहू छत्रपतींनी असे म्हटले आहे की, “गरिबांच्या उद्धाराचे कार्य करण्याची माझी अनिवार इच्छा झाली आहे. मी त्यांना सर्व मानवी हक्क मिळवून देण्यासाठी शक्य तो सर्व उपाय योजित आहे. ती माझी एक प्रकारची आत्मिक पवित्र भावना आहे. मागासवर्गीयांच्या उन्नतीच्या कार्यात मी थोडा जरी यशस्वी झालो तरी माझे जीवन अंशतः सफल झाले असे मी मानीन” छत्रपतींच्या हृदयात खऱ्या राष्ट्रोन्नतीची ज्योत किती प्रज्वलित झालेली होती हे वरील उद्गारावरून दिसून येते.

## पद्मभूषण अनंत विठ्ठल उर्फ धनंजय कीर

जन्म : २३ एप्रिल १९१३ रत्नागिरी येथे
शिक्षण : मॅट्रिक १९३५ मध्ये
या कालात रत्नागिरीस चालू असलेल्या क्रांतिकारी विचारांचा आणि कार्याचा त्यांच्यावर संस्कार झाला.
१९४५ मध्ये "फ्री हिंदुस्थान" मध्ये महत्त्वाच्या राजकीय पुढाऱ्यांची व्यक्तिचित्रे लिहिली.
१९५० साली त्यांचा पहिला चरित्रग्रंथ (सावरकर चरित्र). इंग्रजी मध्ये प्रसिद्ध झाला.
१९३८ ते १९६२ पर्यंत मुंबई महानगरपालिकेत शिक्षण समितीवर नोकरी.
त्यांनी इंग्रजीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, महात्मा जोतीराव फुले, महात्मा गांधी आणि राजर्षि छत्रपति शाहू हे चरित्र ग्रंथ लिहिलेले आहेत.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतीराव फुले, लोकमान्य टिळक, राजर्षी शाहू महाराज एक मुल्यमापन, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही त्यांनी लिहलेली मराठी चरित्रे.
महात्मा फुले समग्र वाङ्मय, शेतकऱ्यांचा आसूड ही दोन पुस्तकें सहकार्याने संपादित.
त्यांच्या सावरकर या इंग्रजी चरित्र ग्रंथाचाही मराठी अनुवाद प्रसिद्ध झाला आहे.
'श्री नामदेव चरित्र आणि कार्य' हे मराठी चरित्र दुसऱ्याच्या सहकार्याने प्रसिद्ध.
सध्या पं. जवाहरलाल नेहरू आणि मानवेंद्रराय यांची इंग्रजी चरित्र लिहित आहेत.
प्रौढ वाङ्मय विभाग–चरित्र आत्मचरित्र–लेखन प्रकाराच्या स्पर्धेसाठी 'महात्मा जोतीराव फुले' या ग्रंथास सन १९६८–६९ साली राज्य पुरस्कार मिळालेला आहे.
१९७१ साली भारत सरकारकडून 'पद्मभूषण' हा किताब.
सामाजिक व शैक्षणिक कार्याची आवड असून बऱ्याच संस्थेचे ते पदाधिकारी आहेत.
मराठी संशोधन मंडळ, मुंबई या संस्थेचे गेली चार वर्षे अध्यक्ष आहेत.
गेली १० वर्षे सावित्रीबाई जोतीराव फुले गर्ल्स नाईट हायस्कूल ही संस्था चालवित आहेत.

धनंजय कीर

ही व्याख्यानमाला यशवंतरावजी चव्हाण यांच्या नावाने यशस्वी-रीत्या चालविण्यात या संस्थेने मोठेच कार्य केले आहे. त्यात सम-यसूचकता व यथार्थताही दाखविली आहे. ज्ञानी आणि प्रबुद्ध लोकांना आपल्या अचूक ज्ञानाने प्रभावित करणारे नि उत्तररात्रीही तन्मयतेने जुन्या व नव्या विचारवंतांच्या विचारांत मग्न होणारे यशवंतरावजी चव्हाण यांचे एखाद्या प्रबोधनाच्या कार्यास नाव देणें ही यथार्थ अशीच कल्पना आहे. यशवंतराव चव्हाण आपल्या कर्तृत्वाने व बुद्धिसामर्थ्याने, देशभक्तीने व संघटना चातुर्याने दिल्लीच्या राजकारणात, महादजी शिंदे यांच्यानंतर, पराक्रमी मराठा म्हणून चमकले. तसेच दुसरे एक यशवंतराव त्यापूर्वी दिल्लीच्या राजकारणापर्यंत पोचले होते. ते राजर्षी शाहू छत्रपती या नावाने इतिहासात प्रसिद्ध झाले.

आज आपल्या राष्ट्राने जनतेपुढे वीस कलमी कार्यक्रम ठेवलेला आहे. तो का? तर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंचवीस वर्षे होऊन गेली, तरी देशाचा जो बहुसंख्य दुर्बल घटक आहे त्याच्यापर्यंत स्वातंत्र्याचे लोण पोचले नाही म्हणून. मागासवर्गीय व अस्पृश्य समाजाच्या उन्नतीचे कार्य शाहू छत्रपतींनी पन्नास वर्षांपूर्वी केले. ' मागासवर्गीय व बंधुभगिनींना आणि अस्पृश्य समाजाला मी एकाच जातीचें समजतो व त्यांना वर आणायचा प्रयत्न करतो हे माझे पवित्र कर्तव्य आहे असे मी समजतो. ते मी न करीन तर मी कर्तव्यविन्मुख झालो असे माझे मन मला टोचील' त्या ध्ये-याने प्रेरित झालेले शाहू छत्रपती मद्रास, हुबळी, नाशिक, कानपूर भावनगर, नागपूर व दिल्लीपर्यंत मागासवर्गीयांना आणि अस्पृश्य वर्गांना सामाजिक समतेने वागविले पाहिजे, त्यांची मानवी प्रतिष्ठा व मानवी हक्क त्यांना मिळालेच पाहिजेत. असे भारतीयांना ओरडून सांगत, ते आक्रोश करीत फिरले.

त्या काळी राजकीय चळवळ करणारे देशातील महान पुढारी लो. टिळक, पंजाब केसरी लाला लजपतराय, बॅ. सुरेंद्रनाथ बॅनर्जी व सर फिरोजशहा मेथा यांच्या राजकीय ध्येयधोरणाला फारसा सामाजिक आशय होता, असे दिसत नाही. त्यांच्या राष्ट्रवादाला नकारात्मक (Negative) स्वरूप आले होते. ब्रिटिशांचे राज्य आम्हांला नको असा त्यांचा सूर ोता. त्याचे एक उत्तम उदाहरण येथे सांगता येईल.

पहिल्या महायुद्धाचे वेळी देशभक्त लाला लजपतराय हे आपल्या स्वदेशगमनबंदीच्या काळात अमेरिकेत हिंदी स्वातंत्र्याच्या प्रचारासाठी सभा घेत असत. अशाच एका न्यूयॉर्क येथील सभेत ते बोलत असता एका कामगार कार्यकर्त्याने त्यांना विचारले की, 'तुम्हांला स्वातंत्र्य पाहिजे हे आम्हांला कळले. पण हिंदुस्तानातील राष्ट्रवादी नेते हिंदी जनतेच्या दारिद्र्याचा नायनाट कसा करणार आहेत ते तुम्ही आम्हांला सांगाल काय ?' त्याप्रश्नावर उत्तरे – प्रत्युत्तरे झाली. रागारागाने लजपतराय उद्गारले, "प्रथम आम्हाला आमच्या घराचे स्वामी तर होऊ द्या. नंतर काय करायचे ते आम्ही पाहू!"

ही प्रश्नोत्तरे ऐकून मार्क्सच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेल्या त्या कार्यकर्त्याने लजपतरायांना दुसरा प्रक्षोभक प्रश्न केला. तो म्हणाला, 'परकीय भांडवलदार हिंदी जनतेचे शोषण करण्याऐवजी स्वदेशी भांडवलदार जर त्यांची पिळवणूक करणार असतील तर त्या दोघांत फरक तो काय?' त्यावर तितक्याच त्वेषाने लालाजी उत्तरले, 'स्वकीय बंधूंच्या लाथा आणि परकीय दरोडेखोरांच्या लाथा ह्यांत मुळीच फरक नाही हे खरे!' उपरोक्त सभेतील वादविवाद ऐकून लाला लजपतरायांच्या सभेत उपस्थित असणारे क्रांतिकारक. नरेंद्र भट्टाचार्य हे स्तिमितच झाले. नरेंद्र भट्टाचार्य हे बंगालचे क्रांतिकारक अनेक वेषांतरे करून स्वदेशातील क्रांतीच्या चळवळीसाठी शस्त्रे आणावयास अमेरिकेत गेले होते. ते काही दिवस लजपतरायांच्या सहवासात

होते. वरील संवाद ऐकून नरेंद्र भट्टाचार्य हे त्या दिवसापासून लढायचे का व कशासाठी याचा विचार करू लागले. आणि ते सशस्त्र क्रांतीच्या मार्गावरून मार्क्सच्या तत्त्वज्ञानाकडे वळले. पुढे ते एम्. एन्. रॉय म्हणून प्रसिद्ध झाले.

महाराष्ट्रातील विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून स्फूर्ती घेतलेले राजकीय पुढारी हे चिपळूणकरांप्रमाणे हरपलेल्या स्वराज्याकडे लक्ष देऊन बोलत असत आणि राजकीय चळवळ करीत असत. ते इतिहासाकडे तोंड करून, सद्यःकाळाकडे किंवा भविष्य काळाकडे पाठ करून बोलत असत. महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे व शाहू छत्रपती हे येणारे स्वराज्य कसे असावे यासंबंधी विचार करणारे होते. त्यांचे लक्ष सद्यःस्थितीकडे व भविष्यकाळाकडे होते. येणारे स्वराज्य सामाजिक न्याय व सामाजिक समता ह्या दोन गुणांवर अधिष्ठित झाले पाहिजे असे त्यांचे ध्येयधोरण होते. त्या काळी राष्ट्रसभेला नवसमाजनिर्मितीचे निश्चित असे ध्येयधोरण होते असे म्हणता येणार नाही. शाहू छत्रपती यांनी मद्रास, पुणे, नाशिक, नागपूर, भावनगर, कानपूर व दिल्ली येथे भाषणे केली, तेव्हा ते गरिबांची आणि दलितांची बाजू मांडीत असत.

छत्रपतींच्या म्हणण्याचा गोषवारा असा असे की, " जे स्वतःला भारतीय जनतेचे पुढारी समजतात त्यांनी येणाऱ्या राजकीय स्वातंत्र्याचा उपयोग, अनेक शतके मानसिक गुलामगिरीत पडलेल्या आपल्या देशबांधवांचा उद्धार करण्यासाठी करावा आणि त्यांनी असे दिवस आणावेत की, जेव्हा प्रत्येक हिंदी मनुष्य हा दुसऱ्याशी समान मानण्यात येईल आणि हिंदी समाजाची पुनर्रचना अशी होईल की मनुष्याला मिळणारे मोठेपण व आदर हे जन्माधिष्ठित नसून ते गुणाधिष्ठित असेल. " हे तत्त्वज्ञान सांगणारे शाहू छत्रपती हे एक तत्त्ववेत्तेच असले पाहिजेत.

त्या वेळी महाराष्ट्रात अशी परिस्थिती होती की, पाच टक्के

ब्राह्मण हे ब्रिटिशांच्या खालोखाल राज्यकारभारात अधिकाराच्या जागा बळकावून बसले होते आणि राज्यकारभारात त्यांचा प्रचंड भरणा होता. " जरी राज्यसत्ता इंग्रजांचे हाती असली तरी कित्येक महत्त्वाच्या नोकऱ्या पटकावण्यात ब्राह्मण समाजाला यश मिळाल्यामुळे ब्राह्मणेतर समाजाचा जळफळाट सुरू झाला." असे वा. रा. गुळवणे यांनी 'ब्राह्मण सभेची गेली ६० वर्षे' ह्या आपल्या ग्रंथात मान्य केले आहे. ह्या वरून त्याकाळची परिस्थिती लक्षात येते. त्या काळी ब्राह्मण्याची भावना ब्राह्मण लोकांत तीव्र होती. ब्रिटिशांच्या छत्राखाली ती एक प्रकारची ब्राह्मणशाहीच अस्तित्वात होती. अस्पृश्य हे आपले धर्मबंधू आहेत, राष्ट्रबंधू आहेत व त्यांना समान हक्क मिळाले पाहिजेत ही गोष्ट टिळकांसारख्या महान पुढाऱ्यांनाही कळली नाही, हे आश्चर्य नव्हे काय? मागासवर्गीयांना आणि अस्पृश्य समाजाला राज्यकारभारातील पन्नास टक्के जागा देण्याची शाहूंनी घोषणा केल्याबरोबर, असे करणे शहाणपणाचे नाही व ती जातीय दृष्टीने केलेली घोषणा आहे. अशी लो. टिळकांनी शाहूंवर केसरीत टीका केली.

वेदोक्त प्रकरणात सनातनी आणि वर्णवर्चस्ववादी ब्रह्मवृंदांची बाजू घेऊन जसा चिपळूणकरांनी महात्मा जोतिरावांवर हल्ला केला, तसाच शाहूंना शूद्र ठरवून टिळकांनी त्यांचे वर हल्ला चढविला. एका बाजूने लो. टिळकांनी, शिवाजी ही राष्ट्रीय विभूती आहे असे सर्व राष्ट्राला पटविण्यासाठी शिवाजी उत्सव सुरू केला व दुसऱ्या बाजूने जो शंकराचार्य शिवाजीचा व त्यांच्या वंशजांचा जाहीरपणे शूद्र म्हणून धिक्कार करतो, त्याची मिरवणूक टिळकांनी पालखीतून काढून ती पालखी मोठया अभिमानाने खांद्यावरून मिरवली.

विष्णूशास्त्री चिपळूणकरांना सत्यशोधक समाज, आर्य समाज, ब्राह्मसमाज का निर्माण झाले हे जसे कळले नाही, तसेच टिळकांनाही वेदोक्त प्रकरणातील ब्राह्मणेतरांच्या सामाजिक समतेची,

सामाजिक प्रतिष्ठेची व समानधर्माची चळवळ कळली नाही. ते त्यावेळी म्हणाले, ‘मराठयांनी वेदोक्तरीतीने संस्कार करण्यात काही शौर्य आहे काय?’ आपल्याच धर्मबांधवांपैकी ८० टक्के लोकांना आपल्यासारखेच धार्मिक व सामाजिक हक्क नसावेत असे त्यांना वाटले. असे म्हणण्यात कोणते ऐक्याचे व राष्ट्रवादाचे तत्त्व होते? ऋग्वेदाचे संपादन करणारे जर्मन पंडित मॅक्समुल्लर यांच्याविषयी टिळकांना अभिमान वाटे व त्या ग्रंथापासून टिळकांनी स्फूर्तीही घेतली होती. वैदिक धर्माचे सर्व अधिकार सर्वांना समान असावेत व सर्वांनी सामाजिक समता मानावी असे शाहूंनी महाराष्ट्राला दिलेले आव्हान ब्राह्मण समाजाने धुडकावून लावले.

शाहू महाराजांनी तीन अभूतपूर्व व क्रांतिकारक घोषणा केल्या. पहिल्या घोषणेप्रमाणे त्यांनी असे जाहीर केले की, ‘आपल्या संस्थानातील मागासवर्गीयांना आपल्या राज्याच्या कारभारात ५० टक्के नोकऱ्यांसाठी जागा राखून ठेवण्यात येतील’ त्यामुळे कोल्हारच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ३ टक्केही लोकसंख्या नसणाऱ्या ब्राह्मणांच्या हाती जी कोल्हापूरच्या राज्यकारभारात सत्ता होती ती त्यांची सत्ता कमी होऊ लागली. त्या वेळी संस्थानामध्ये साठ ब्राह्मण अधिकारी होते, तर पाच-सहा ब्राह्मणेतर अधिकारी होते. सहाशे कारकुनांपैकी पाच-सहा जणच ब्राह्मणेतर होते व बाकीचे इतर व तत्सम समाजापैकी होते. बहुतेक ठिकाणी शिपाईसुद्धा ब्राह्मणच होते. शाहूंनी ब्राह्मणेतर समाजाला ही नवीन संधी मिळवून देताच अनेक ब्राह्मणेतर तरूण राज्यकारभारात अधिकारी होऊ लागले. ते अधिकारी स्वतः बहुजन समाजापैकी असल्यामुळे लोककल्याणासाठी अधिक झटू लागले. ब्राह्मणांच्या एकाच जातीच्या हाती जी राज्यकारभाराची सत्ता होती, ती कमी होऊन त्यात समतोलपणा येऊ लागला. राज्यकारभारात आपला ही काही भाग आहे असा ब्राह्मणेतरांना आनंद व अभिमान वाटू लागला.

शाहू छत्रपतींनी केलेली दुसरी घोषणा अशी की to enthrone the Indian Nation, we must dethrone Brahminism. जर आपणास राष्ट्रवादाची स्थापना करावयाची असेल, तर आपण ब्राह्मणशाहीचा नायनाट केला पाहिजे. ही ब्राह्मणशाही म्हणजे ब्राह्मणधर्म-इतर समाजास कमी लेखणारा, अस्पृश्यांस कमी लेखणारा, त्यांची मानवी प्रतिष्ठा न मानणारा, त्यांची मानवी समानता न मानणारा. यास्तव हिंदी नेत्यांना खरा राष्ट्रवाद स्थापावयाचा असेल तर त्यांनी अस्पृश्य गणलेल्या कोटयावधी लोकांना शिक्षण देऊन त्यांची उन्नती केली पाहिजे. अस्पृश्यांचा उद्धार केला तरच राष्ट्राची खरी प्रगती होईल, असे शाहूंना वाटे.

तिसऱ्या घोषणे प्रमाणे छत्रपतींनी असे जाहीर केले की, the peace and prosperity of the nation depends upon the elevation of the Backward and Depressed cla–sses. ह्या देशाची शांतता आणि उन्नती ही मागासवर्ग व अस्पृश्य वर्ग यांच्या उन्नतीवर अवलंबून आहे. ज्या प्रमाणात ह्या वर्गांची उन्नती होईल त्या प्रमाणात राष्ट्राची उन्नती होईल, असे त्यांना वाटे. हल्ली वीस कलमी योजना भारतीय सरकारने जारी केली आहे. तिचे सूत्र हेच आहे. आशय तोच आहे, हे सांगावयास नको. ह्या तिन्ही घोषणा म्हणजे शाहू छत्रपतींनी केलेल्या नवभारताची मागणी होय. आणि नवभारताची मागणी म्हणजे नवा भारत सामाजिक समता, समान संधी आणि मानवी हक्क सर्व वर्गांना समान असावेत अशा तत्त्वावर अधिष्ठित झाला पाहिजे ही होय.

त्या काळचे राष्ट्रवादी ब्राह्मण पुढारी कसे होते ते पाहा. टिळकांचे ध्येय - धोरण कसे होते ते वर सांगितलेच आहे. राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ करणारे प्रा. विष्णु गोविंद विजापूरकर यांचे धोरण कसे होते ते पाहा - त्यांच्या समर्थ विद्यालयामध्ये जातिभेदाची कडक बंधने पाळण्यात येत असत. प्रा. विजापूरकर यांनी राष्ट्रीय

शाळा व सरकारी शाळा यांतील फरक सांगितला आहे. ते म्हणतात, ' ब्रिटिश सरकारी शाळा व राष्ट्रीय शाळा यात अंतर काय असे विचारणारे लोक आहेत. बळजबरीने धर्म सोडला जातो ती सरकारी शाळा, आणि चातुर्वर्ण्य व पुनर्जन्म या मूळ तत्त्वांवर अवलंबून असणाऱ्या सनातन धर्माप्रमाणे चालणारी ती राष्ट्रीय शाळा, असे एक भेदक लक्षण पुरे लक्षात घ्यावे.'

विष्णू गोविंद विजापूरकर यांचे चरित्रकार गं. दे. खानोलकर यांनी विजापूरकरांच्या शाळेत कशी कडक जातिबंधने पाळली जात असत ते सांगून म्हटले की, ' परस्परांच्या मनोभावना दुखवणारा जातिभेद व स्पृश्यास्पृश्य भेद राष्ट्रीय शिक्षण देऊ इच्छिणाऱ्या संस्थांनी कायम ठेवणे हे राष्ट्रहितवर्धक कार्य नव्हे, राष्ट्रविघातक कार्य आहे म्हणून समर्थ विद्यालयाचे नाव बदलून त्या विद्यालयाचे नाव द्रविड ब्राह्मण विद्यालय असे ठेवले असते तर चालले असते ' आपल्या देशबांधवांना कमी लेखणारी ही राष्ट्रभक्ती कसली? विजापुरकरांनी सांगितलेले ' चातुर्वर्ण्य व पुनर्जन्म यांचे मूळ तत्त्व याचा अर्थ पुन्हा उघड करून सांगण्याची जरूरी नाही. चातुर्वर्ण्यामुळे सामाजिक मतभेद व उच्चनीचता पाळली जाऊन माणसाची माणुसकी हिरावून घेतली जाते. पण पुनर्जन्माचे हे तत्त्व फार मोठे भयंकर आहे. पुनर्जन्म तत्त्वाप्रमाणे महार – मांगादी अस्पृश्यांना सांगण्यात येई की, ' तुमचे पूर्वसंचितच खोटे आहे; तुम्ही मागील जन्मात काही पापे केल्यामुळे ह्या जन्मात तुम्ही महार, मांग झालात. तेव्हा तुम्ही ह्या जन्मात नशिबाप्रमाणे आलेले दैन्य भोगले पाहिजे.

लो. टिळक म्हणत ' ह्या वर्गांनी (महार-मांग) स्वातंत्र्य मिळविले तर मी त्यांच्या पंक्तीला बसेन. ' टिळक हे आशियातील त्या काळचे महान पुढारी. ब्रिटिश सम्राज्याबरोबर टक्कर देणारे भारतातील महापुरुष. ह्या आपल्या धर्मबांधवांची बंधुता, माणुसकी टिळकांनी मानली नाही. त्यांचे मानवी हक्क, स्वातंत्र्य व

प्रतिष्ठा त्यांनी नाकारली. शिवाजीसंगे टिळकांचे नाव घेतले जाते. त्यांच्या एवढे चारित्र्यसंपन्न व त्यागी पुरुष थोडेच झाले असतील. पण त्यांची सामाजिक दृष्टी अशी होती.

शाहूंचे नवभारत उभारणीचे काम कसे होते ते पाहा. त्यांनी महार, मांग, मुसलमान ह्यांना मराठा वसतिगृहामध्ये आश्रय दिला- त्यांनी अनेक वसतिगृहें काढून काढून कनिष्ठ वर्गाला शिक्षणाची संधी दिली. त्यांच्या मते एलिव्हेशन ऑफ दी मेजॉरिटी म्हणजे बहुसंख्य लोकांचे उन्नतीचे कार्य आणि ते त्यानी मोठ्या तळमळीने केले. आपल्या राष्ट्रात बहुजन समाज मागासलेला असून दारिद्र्यात पिचत आहे. तो विद्या, वस्त्र व वित्त यांना मुकलेला आहे. शाहूंनी म्हटले की, मी त्यांना विद्या, वस्त्र व वित्त मिळ-विण्यास समर्थ करणार. त्यांना मानवी प्रतिष्ठा, मानवी हक्क मानवी स्वातंत्र्य मिळवून देणारच. त्यांनी आपले हे बोल, आपल्या राज्यात त्यांना तसे संपूर्ण मानवी हक्क देऊन खरे केले. असे होते हे नवभारताचे घोषणा करणारे छत्रपती शाहू!

टिळक म्हणत, जातिभेद जरी मोडला नाही तरी जातिद्वेष मोडणे इष्ट आहे. शाहूंचे म्हणणें खोटे आहे. जातिभेदाचे असू द्या, जाति-द्वेष नको हे म्हणणे खोटे आहे. जातिभेदाचे कार्य जातिद्वेष आहे. कार्य नाहीसे करावयाचे असेल तर कारणही काढून टाकले पाहिजे. शाहू म्हणत : ' जातिभेद पाळणे पाप आहे. देशोभतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हिंदुस्तानच्या गुलामगिरीस जातिभेद कारणी-भूत आहे. आम्हालाही स्वराज्य पाहिजे आहे व त्यामुळे आम-च्यात चैतन्य निर्माण होईल. पण मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाऊ नये म्हणून जातवार मतदानाचा हक्क द्यावा. कित्येक म्हणतात की राजकारणाचा व स्पृश्यास्पृश्यतेचा काय संबंध आहे? पण मी म्हणतो अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणे वागविल्याशिवाय राज-कारण कसे होणार? ज्यांना राजकारण करावयाचे आहे, त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशात वागवितात त्याप्रमाणे

वागविले पाहिजे. आम्हाला तोंडाने बडबडणा कोत. वृत्तीने जातिभेद मोडून आम्हास मनुष्याप्रमाणे वागवतील असे पुढारी पाहिजेत.'

शाहूंची धार्मिक रुढीसंबंधीचो मते जहाल होती. राष्ट्र संकटात असता अन्नाच्या अभावी हिंदूंनी गायसुद्धा कापून खावी असे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटले तेव्हा महाराष्ट्रात व इतर ठिकाणीही मोठी खळबळ उडाली. पण त्यापूर्वी म्हणजे पहिल्या महायुद्धाच्या वेळी मराठा पलटण कूट-एल-आमारा येथे अन्नाचा पुरवठा होत नसल्यामुळे उपाशी मरत असता छत्रपतींनी त्या सैनिकांना निरोप पाठविला की 'जातीच्या निर्बंधानुसार कोणते खाद्य व कोणते अखाद्य ठरवित न बसता घोडयाच्या मांसाचा उपयोग करावा. जातिनिर्बंध मोडल्याबद्दल तुम्हास यत्किंचितही दूषण लागणार नाही. तुम्ही परत आल्यावर तुमच्या लग्न-कार्यात व इतर धार्मिक समारंभात तुम्हांला गैरसोय भोगावी लागणार नाही असे मी देवाला स्मरून वचन देतो.'

अशा ह्या समाजक्रांतिकारकाच्या मृत्यूनंतर त्यांच्या तत्त्वाप्रमाणे त्यांचे अंत्यसंस्कार ब्राह्मणाने न करता ब्राह्मणेतर पुरोहिताने केले ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

१९१९ साली शाहू छत्रपतींनी महारांची गुलामगिरी कायद्याने नष्ट केली. त्यांची वतनाची जागा व जमीन त्यांच्या नावावर करून दिली. ती वेठबिगारीची जुलमी गुलामगिरी नष्ट करून टाकली. ती गुलामगिरी तुम्ही स्वतंत्र भारतात १९७४ साली नष्ट केली. कुलकर्णी वतने नष्ट केली ती तुम्ही स्वातंत्र्याच्या काळात महाराष्ट्राच्या इतर भागातून नष्ट केली. ग्रामीण विभागातील ही कुलकर्णी वतने म्हणजे ा णशाहीचा किल्ला! कुलकर्ण्यांची ती सत्ता ेग गरीब आणि अज्ञान लोकांना फसविण्यात होई.

राज्यशकट यशस्वीरीतीने हाकावयाचा असेल तर राज्यकारभारात सर्व तऱ्हेचे लोक असावेत. एकाच जातीचा त्यात भरणा नसावा. इंग्रज वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाहूंना एकदा पत्र लिहून कळविले की, तुमच्या राज्यप्रतिनिधी मंडळामध्ये एकाच जातीचे कौन्सिलर नेमू नका. सर्व जातींच्या लोकांना शाहूंनी राज्यकारभारात घेतल्यामुळे राज्यकारभारात समतोलपणा आला व सर्वांच्या हिताकडे ते अधिकारी लक्ष देऊ लागले. मद्रासमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात तीन टक्के असणाऱ्या ब्राह्मणांचे हाती सत्ता होती. राजपत्रित नोकऱ्या त्यांना सत्तर टक्क्यांवर मिळत असत. तेथे ब्राह्मणांनी पारियांना म्हणजे अस्पृश्यांना ७० फूटांवर उभे केले तर शूद्रांना आपल्यापासून ३० फूटांवर उभे केले. त्याची प्रतिक्रिया कशी झाली ते आपण पाहतो. ती तशी होऊ नये पण झाली हे खरे. मद्रास प्रांतात ब्राह्मणांचे विरूद्ध नायर आदी नेत्यांनी सामाजिक समतेची आणि सामाजिक प्रतिष्ठेची ज्वलंत चळवळ केल्यामुळे ब्राह्मणांची सभा व प्रतिष्ठा तेथे नष्ट झाली.

दक्षिण भारतात नर्मदेच्या खाली भारतात दोन ब्राह्मणेतर चळवळी झाल्या. महाराष्ट्रात महात्मा फुले आणि शाहू यांनी केलेली चळवळ व मद्रासमध्ये डॉ. नायर आणि मुदलीयार यांनी केलेली चळवळ. ह्या दोन्ही चळवळींमध्ये थोडा फरक आहे. दोन्हीमध्ये साम्य म्हणजे ब्राह्मणांची सत्ता व सामाजिक जुलमी रूढी यांविरूद्ध त्यांनी केलेला झगडा व सामाजिक समता व मानवी हक्क हे ब्राह्मणेतरांना मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेला झगडा यात साम्य आहे. परंतु मद्रासकडील चळवळीत ब्राह्मणांचा अतिशय द्वेष केला गेला. तो इतका की त्यातील धग शाहूंनाही सोसवली नाही. कारण शाहूंनी वर्णवर्चस्ववादी ब्राह्मणांचा व ब्राह्मण्याचा द्वेष केला. ब्राह्मण समाजाचा द्वेष केला नाही. कारण १९२२ साली सुद्धा कोल्हापुरात काही ब्राह्मण अधिकारी होते व शाहूंचे मित्र व सल्लागार हे ब्राह्मण होते पण ते ब्राह्मणवर्चस्ववादी नव्हते.

मद्रासकडील ब्राह्मण चळवळीने आर्य व अनार्य असे आपल्या झगडयाला स्वरूप दिले. त्याचे कारण रामायणातील द्रविड लोकांचा उल्लेख वानर म्हणून केला आहे. म्हणून त्यांचा आर्यांवर राग आहे. फुले यांचा राग ब्राह्मण्यावर होता ब्राह्मणावर नव्हता. त्यामुळे त्यांनी आपल्या चळवळीस दिलेले मानवतावादाचे स्वरूप महाराष्ट्रात परिणामकारक ठरले. हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या शिवछत्रपतींचे शाहू वारस होते, शाहू, फुले यांनी राष्ट्रात फुटीरपणाची वृत्ती जोपासली नव्हती. दक्षिणेकडील चळवळीने फुटाळ वृत्ती दाखविल्यामुळे त्यांचे मंत्रीमंडळही त्या कारणाने बरखास्त करावे लागले असे म्हणतात. शाहू तर महान देशभक्तांचे मोठे पाठीराखे होते, टिळकांना व अरविंदाना त्यांनी हजारो रुपयांची मदत केली. हे सर्वांना माहीत आहेच.

शाहू हे देशभक्त, राष्ट्रभक्त होते, त्यांच्या मृत्यूनंतर केसरीने म्हटले की, शाहू पूर्वीच्या काळात जन्माला आले असते तर त्यांनी साम्राज्य स्थापन केले असते. निरुपाय म्हणून व काही वेळा इंग्रजांचे मांडलिक म्हणून शाहूछत्रपतींना काही इंग्रजांचे कायदे व हुकूम पाळावे लागत. परंतु त्यांनी त्या परिस्थितीतसुद्धा मागासवर्गीयांच्या व अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी जे महान कार्य केले, ते नवभारताच्या इतिहासात अपूर्व व मार्गदर्शक असे ठरले. "गरिबांच्या उद्धाराचे कार्य करण्याची माझी इच्छा अनिवार झाली आहे. मी शक्यतो सर्व हक्कासाठी उपाय योजित आहे. ती माझी एक प्रकारची आत्मिक पवित्र भावना आहे आणि ती मंगल भावना मला पुढे जाण्यासाठी स्फूर्ती देत आहे. मी मागासवर्गीयांचे उन्नतीचे कार्यात थोडा जरी यशस्वी झालो, तरी मी माझे अंशतः जीवितसाफल्य झाले असे मानीन. आपण लक्षात ठेवा की, ज्या बोलक्या आणि चळवळ करणाऱ्या लोकांची भीती सरकारलाही वाटते, त्यांची मी खुशामत केली असती तर माझ्या वैयक्तिक जीवनात शांतता लाभून मी सुखी झालो असतो.

पण मी तसे केले असते तर माझ्या कर्तव्यास मी चुकलो अशी माझी मनोदेवता मला सांगते." असे ब्रिटिश राज्यपालाला लिहिणारा हा छत्रपती हृदयात खऱ्या राष्ट्रोन्नतीची किती चिंता वाहत होता हे यावरून दिसत नाही काय? मागासवर्ग व दलित वर्ग यांची उन्नती प्रथम केली पाहिजे हे सांगणारे शाहू नव-भारताचेच उद्गाते होते.

हिंदू संहिता १९२० साली संमत करून विधवा विवाह, व्यक्ति-स्वातंत्र्य, सामाजिक सुधारणा, वारसा हक्क, दत्तक घेण्याचे स्वातंत्र्य,आंतरजातीय विवाह यांना मान्यता देऊन त्यांनी भारता-पुढे आदर्श मांडला. शाहूंनी नवीन हिंदू संहिता संमत करून १९२० साली जे नवीन समाजरचनेचे कार्य केले, ते स्वतंत्र भारतातील नेत्यांनी १९५२ सालच्या सुमारास नवीन हिंदू संहिता मान्य करून केले. यावरून शाहूंच्या नव आणि दूर दृष्टीची थोरवी कळते. ज्या काळी टिळक आणि त्यांचे सहकारी ह्यांनी हिंदूंच्या नवसमाजरचनेला (सुधारणेला) विरोध केला, त्या काळी शाहूंनी हे कार्य केले. शि. म. परांजपे यांच्या सारख्यांनी विधवा विवाहाच्या प्रश्नाची आणि अस्पृश्यता निवारणेची टिंगलच केली आहे. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांना सुधारक म्हटले म्हणून त्यांना त्या काळी अपमान वाटत असे.

कायद्यापुढे प्रत्येक हिंदू समान मानून छत्रपतींनी वरिष्ठ जातींच्या सर्व क्षेत्रांतील मक्तेदारीला जबरदस्त तडाखा दिला. गरिबांना व दलितांना आपला उत्कर्ष करण्याचे सर्व मार्ग मोकळे झाले. कोल्हापूर संस्थानात अभूतपूर्व अशी क्रांती झाली महारकीची गुलामगिरी बंद झाली. छत्रपतींच्या पाहुण्यांचे आदरातिथ्य करणारे, सरकारी डाक नेणारे हे अस्पृश्यांपैकी महारच असत. त्यांचा माहूत महारच होता. महाराजांचा ड्रायव्हर यल्लाप्पा महारच होता. सरकारचे चाबुकस्वार व कोचनमन हेही महारच होते. महाराजांचे निकटचे पहारेकरी हेही महारच असत.

महाराजांचे शिकारीतील सोबतीही महारच होते. कँपमधील महालक्ष्मीची पूजा करणारा पुजारीही महारच असे. महार - मांगांपैकी हुशार लोक शिक्षक झाले, वकील झाले, अधिकारी झाले, नगरपालिकेचे सभासद व अध्यक्षही झाले.

संस्थानातील अस्पृश्य मुलांना इतर स्पृश्य मुलांबरोबर शाळेच्या इमारतीत बसवू लागले. शाळा, सरकारी इमारती खाजगी उपयोगासाठी दिलेल्या नसल्यामुळे त्यांत अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नाही असा हुकूम निघाला. शिक्षण संस्थांतून गरीब व दलितांना समतेच्या पायावर वागणूक मिळाली पाहिजे अशी शाहूंची अंतःकरणपूर्वक इच्छा होती. अनुदान मिळणाऱ्या सर्व खाजगी व सरकारी शाळांत अस्पृश्यांना जास्ती ममतेने व आदराने वागवावे असा हुकूम काढण्यात आला. ज्यांना हुकूम मान्य नसेल त्यांनी सहा महिन्याचे आत आपला राजीनामा पाठवावा अशी घोषणा जाहीर झाली. सर्व सरकारी रुग्णालयांना आज्ञा देण्यात आली की, तेथील डॉक्टर्स, परिचारिकांनी व नोकरांनी स्पृश्य रुग्णांची जोपासना व रोग निदान करण्याचेवेळी अस्पृश्य लोकांना आत नेऊन त्यांची तपासणी व काळजी घेतली पाहिजे असे फर्मान निघाले.

राज्यातील महसूल न्यायखात्यातील अधिकाऱ्यानी अस्पृश्यांबरोबर प्रेमाने, ममतेने व समतेने वागले पाहिजे. ज्यांना हा हुकूम मान्य नसेल त्यांनी एक आठवडयाच्या आत राजीनामा द्यावा. सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, विश्रांतीगृहे, सरकारी अन्नक्षेत्र, नदीचे पाणवठे, सार्वजनिक विहीरी येथे कोणत्याही मनुष्याचा विटाळ मानावयाचा नाही, अशी ही आज्ञा निघाली. महाराजांनी महार, मांग, रामोशी, बेरड या चार जातींची हजेरी बंद केली. हया समाजापैकी ज्यांना शिक्षा झाली होती त्यांनाच काही काळ हजेरी ठेवली. सर्व भारतात अशी नवसमाज रचना व्हावी की ज्यात सामाजिक असमता नाही. सामाजिक अन्याय होणार

नाही, असे त्यांचे हे ध्येयधोरण होते.

एकदा असे घडले की, गंगाराम कांबळे नावाच्या गृहस्थानें कॅंप-मधील विहिरीवरून पाणी घेतले म्हणून मराठयांनी त्याचेवर चोरीचा आळ घातला व त्याला खूप मारहाण केली. शाहू छत्रपती त्यावेळी दिल्लीत होते. ते परत आल्यावर कांबळेने आपल्या पाठीवरचे वळ महाराजांना दाखवले. ते पाहून छत्रपती संतापाने बेहोष झाले व ज्या मराठ्यांनी त्याला जनावराप्रमाणे मारले होते त्यांना बोलावून त्यांची शाहूंनी चाबकाने पाठ फोडली. हे उदाहरण लक्षात घेतले म्हणजे अन्याय करणाऱ्याची ते जातपात ओळखत नसत असे यावरून स्पष्ट होते.

समाजसुधारकांच्या कार्यात व शाहू व फुले यांच्या कार्यात महत्त्वाचा फरक आहे. तो हा की, सुधारकांनी माणसाची समानता हा प्रश्न कधीही धसास लावला नाही. तो प्रश्न शाहू व फुले यांनी धसास लावला. मानवाची समानता पारमार्थिक वा धार्मिक क्षेत्रात संतांनी समान मानली तरी माणसाची सामानता सामाजिक क्षेत्रात प्रस्थापित करण्याचे भानगडीत ते पडले नाहीत. मनुष्यधर्माने वागावे असे ते दयेच्या पोटी म्हणत असत. मनुष्य-धर्म वा मानव धर्म हा शब्द आता गुळगुळीत झाला आहे. त्यामुळे काही वेळा लोकांची फसगत होते. आताची समाजरचना ही कोणाच्या दयेवर अवलंबून नाही, ती समान अधिकारावर अवलंबून आहे. आता मनुष्यधर्माने वागावे असे भोंगळपणे वा भूत-दयेपोटी बोलून चालणार नाही. मानवाची प्रतिष्ठा, मानवाचे स्वातंत्र्य व मानवी समानता ही मान्य केली तरच खरा मनुष्य धर्म वा मानव धर्म पाळला गेला आहे असे समजले पाहिजे. मला जे हक्क आहेत ते माझ्या धर्म बांधवांना व देश बांधवाना मिळालेच पाहिजेत, असे शाहू छत्रपती व म. फुले यांचे तत्त्वज्ञान सांगते.

हिंदुधर्म व्यवस्थेत पुरोहितपणा हा जन्माधिष्ठित होता. त्यात

एकाच विशिष्ट जातीचे पुरोहित असतात. इतर धर्मात तसे नसते. फुले व शाहू छत्रपती यांनी ह्या धार्मिक मक्तेदारीविरूद्ध प्रचंड चळवळ केली. कोणत्याही जातीच्या लोकांना पुरोहित व्हायचा अधिकार असला पाहिजे, हा हक्क त्यांनी प्रस्थापित केला. म. फुले यांनी जन्माधिष्ठित पुरोहितगिरीच्या तत्त्वांशी न्यायालयात झुंज देऊन ते यापूर्वीच यशस्वी झाले होते. शाहूंनी मराठे व इतर समाजातील व्यक्तींना पुरोहित केले. त्यासाठी त्यांनी संस्कृत, वैदिक शाळा काढल्या नी जन्माधिष्ठित पुरोहितशाहीला मूठमाती दिली. जन्माधिष्ठित पुरोहितगिरी नसावी हे तत्त्व पुढे वीर सावरकर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही मान्य केले.

खऱ्या थोर पुरुषाची सहानुभूती ही व्यापक असते. समाजाची सर्वांगीण उन्नती व्हावी हीच शिवाजी महाराजांची जशी इच्छा होती. तशीच छत्रपती शाहूंची होती. हिंदवी स्वराज्याचीही तीच कल्पना होती. शाहूंना वाटे, मुसलमानांचेही शिक्षण झाले पाहिजे. राष्ट्राचे ते ही अंग सुधारले पाहिजे. त्यांचे जीवन अज्ञानाच्या अंधःकारातून बाहेर पडले. पाहिजे. असे तत्त्व सांगणारा शाहू हा आधुनिक भारताला पहिलाच हिंदु राजा होय. त्यांनी मुसलमानांना शाळा काढून दिल्या, वसतिगृहे स्थापन केली. त्यांच्या शाळांना जमिनी व अनुदान दिले. एवढेच नव्हे तर त्यांच्या शिक्षण संस्थेचे ते अध्यक्षही झाले.

दुसरे असे की, शाहू छत्रपतींचे धार्मिक धोरण अत्यंत सहिष्णू होते. मुसलमानांच्या बाबतीतही ते सहिष्णू होते, पक्षपाती नव्हते. धार्मिक सहिष्णुता हे मोठ्या माणसाचे लक्षण आहे. आपल्या वंशातील महापुरुष शिवाजी यांच्या सहिष्णु धोरणाचे शाहू छत्रपती मोठे अभिमानी. शिवाजीला लुटीत वा लढाईत कुराण सापडले तर ते आदराने मुसलमान संस्थांना अर्पण करी. शिवाजी मुसलमान संतांना वंदन करी. शाहूंची कारकीर्द अशीच सहिष्णुतेविषयी प्रसिद्ध होती. १८९४ साली शाहू छत्र-

पती आपल्या वयाच्या २४ व्या वर्षी पुण्याला गेले होते. तेथे मुसलमानांचा दंगा नुकताच होऊन गेला होता. पुण्यातील सत्काराला उत्तर देताना शाहू म्हणाले, "आपल्या प्रजेच्या बाबतीत व महाराष्ट्राच्या बाबतीत आपले कोणते कर्तव्य आहे हे सांगून त्यांनी त्या मुसलमानांच्या प्रश्नाकडे पुण्यातील नेत्यांचे लक्ष वेधले आणि ते म्हणाले, 'आपण ह्या प्रश्नाच्या विवेकाने विचार करावा आणि शांततापूर्ण तडजोड घडवून आणावी." धार्मिक सहिष्णुता दाखवणारे शिवाजी व अकबर हे शाहूंना आदर्श राजे वाटत असत, त्याचे कारण शाहूंच्या अंगची धार्मिक सहिष्णुता ही होय. हे नवभारताला एक आदर्श उदाहरणच ठरावे.

धर्माच्या बाबतीत शाहू छत्रपतींनी आणखी एक क्रांतिकारक अशी सुधारणा केली. हिंदू लोक देवाला पैसे, सोने व संपत्ती अर्पण करतात. देवाला दागिन्यांची जरूरी नसते. आज त्या पैशांचा लक्षावधी गरिबांच्या दारिद्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठी उपयोग होणार आहे. ह्या बाबतीत नवभारताला मार्गदर्शक ठरावी अशी शाहू छत्रपतींनी एक गोष्ट केली. आपल्या राज्यातील सर्व देवस्थाने दरबारच्या ताब्यात घेतली. देवस्थानांचे उत्पन्न हे समाजाची मालमत्ता आहे असे जाहीर केले. तेथील नोकर सरकारी नोकर गणले जाऊ लागले. अहो, एका तिरुपती मंदिराचे उत्पन्न लाखो रुपये ! भारतातील सर्व देवस्थानांची संपत्ती समाजोद्धारासाठी सरकारने घ्यायचे ठरविले तर राष्ट्राची एक पंचवार्षिक योजना तडीस जाईल.

शाहू छत्रपतींनी देवस्थानचा पैसा जनतेच्या शिक्षणासाठी उपयोगात आणला. जनार्दनाचा पैसा जनता जनार्दनासाठी वापरला. पिराचे उत्पन्नातून महालक्ष्मीच्या देवळात दिवाबत्ती करावयास लावले. हे धार्मिक ऐक्य ! धर्माचे व हृदयाचे ! देवस्थानच्या इमारतींचा काही भाग शाळेकरता व चावडीकरता राखून

ठेवला. आमचे पंतप्रधान कै. जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले की, शिक्षणाचे कार्य तुम्ही झाडाखाली केले तरी चालेल. कारण लक्षावधी मुलांची सोय करावयाची म्हणजे लक्षावधी शाळागृहे पाहिजेत.

आता दुसऱ्या एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे मी वळतो. प्रश्न आहे कामगारांच्या हिताचा, उत्कर्षाचा. १९१७ सालच्या आक्टो-बरमध्ये रशियात क्रांती झाली. त्या क्रांतीकडे बोट दाखवून शाहू छत्रपती मुंबईतील कामगारांच्या प्रचंड सभेत नोव्हेंबर १९१८ साली म्हणाले, ' पाश्चात्य देशात भांडवलवाले व मजूर ह्या पक्षांचे भांडण चालले आहे. ह्या युद्धाचा परिणाम मजूर पक्षाच्या हाती सत्ता जाण्यात झाला आहे. रशिया व जर्मनी ही निरंकुश सत्तेची मोठी पीठे होत. त्या ठिकाणी मजूर पक्षाच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताक राज्ये स्थापन झाली आहेत. इंग्लंडातही मजूर पक्षाचा जोर वाढत आहे. हॉलंड वगैरे तटस्थ राष्ट्रांवरही ह्या लाटेचा परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. येथेही बहुसमा-जाच्या मनाप्रमाणे चालला पाहिजे. येथेही इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ झाले पाहिजेत व सर्वास आपले हक्क काय आहेत हे कळले पाहिजे. '

कामगारांनी मजूर संघ काढून त्यांनी आपली शक्ती वाढवावी असे सांगणारा हा अभिनव राजा. ब्रिटिश साम्राज्यातील मांड-लिक राजा आणखी स्पष्ट काय सांगणार ? कामगारांच्या हाती राजसत्ता यावी असे सांगणारा त्याकाळी भारतात सार्वजनिक नेता दुर्मिळच होता आणि राजा तर अगदी दुर्मिळच असणार असे म्हटल्यास चालेल. त्याकाळी पं. जवाहरलाल नेहरू, श्री. अ. डांगे किंवा मानवेंद्र रॉय यांचा भारतीय राजकारणात उदय झाला नव्हता. जोतीराव फुले व नारायणराव लोखंडे यांचे कामगार कार्य शाहूंनी पुढे नेले असेच म्हणावे लागेल. त्यावेळी टिळक म्हणाले होते की, आमच्या वेदान्तात कम्युनिझम आहे.

शाहूंचे लक्ष जगात कोणते विचार पुढे चालले आहेत, कोठे काय घडते आहे याकडे कसे बारकाईने लक्ष होते व ते कसे दूर-दृष्टी होते हेही दिसून येते एवढे सांगून शाहू छत्रपती थांबले नाहीत. त्यांनी सांगितले की, पुरोहित गेले, आता पुढे राजेही जाणार !!

भारतात आता सर्व भारताचे असे वरिष्ठ (Supreme Court) न्यायालय आहे. ते तसे असावे अशी नरेंद्र मंडळाच्या वतीने छत्रपतींनी मागणी केली होती. त्यासाठी त्यांनी अनेक खटपटी केल्या. भारतमंत्री मॉन्टेग्यूसाहेब यांच्यापुढेही ती मागणी मांडली. हेतू हा की, इंग्रजी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अरेरावांना कुठेतरी दणका द्यायची संधी असावी. त्यांच्या निर्णयाविरुद्ध न्याय मागण्यासाठीही जागा असावी.

१६९० पासून १८३२ पर्यंत तंजावरच्या भोसल्यांच्या राजवाड्यात मराठी नाटके होत असत. तेथेच मराठी नाटकाचा पाळणा हालला. तेथील व्यंकोजी भोसल्याच्या वंशजाने नाटके लिहिली. विष्णूदास भावे यांनी १८४३ पासून नाटके सुरू केली. छत्रपती शाहूंनी मराठी रंगभूमीचे संवर्धन केले. मराठी रंगभूमीच्या विकासात शाहू छत्रपतींनी महत्त्वाची कामगिरी बजावली. बाल-गंधर्व, केशवराव भोसले, दत्तोपंत हल्याळकरादी अनेक नटांना त्यांनी उत्तेजन दिले. गंधर्वांनी जेव्हा नाटकात पहिले काम केले तेव्हा स्वतः शाहू छत्रपती रंगपटाच्या कडेला बसलेले होते. छत्र-पतीनी रंगभूमीला सामुग्री पुरविली. ज्या काळी महाराष्ट्रातील नटांना समाज एखाद्या महारोग्याप्रमाणे बहिष्कृत मानी त्याकाळी शाहू छत्रपती त्यांना जवळ करून त्यांच्या पंक्तीला जेवत असत. गायन क्षेत्रात तर त्यांनी फारच मोठी कामगिरी केली आहे. अलादियाखाँ यांना राजाश्रय देऊन त्यांनी केसरबाईना उत्तेजन दिले. खाँसाहेबांना सूरश्री केसरबाईना तालीम द्यावयास सांगितले. प्रसिद्ध गायिका अंजनीबाई मालपेकर यांनाही उत्तेजन दिले व

त्यांना अनेक वस्तू देऊन त्यांचा गौरव केला. कोल्हापूर हे सांस्कृतिक दृष्टचा कलापूर बनविले.

शाहू हे महापुरुष होते. महापुरुष कोणाला म्हणावे? जो पुरुष आपल्या काळातील वाईट, अनिष्ट व अन्यायी मूल्ये काढून त्या जागी काळाला अनुरूप व न्याय्य अशी मूल्ये रूजविण्यासाठी अत्यंत कळकळीने, धैर्याने व त्यागाने झगडतो तो महापुरुष! समाजास हितकारक; कामगार, शेतकरी व दलित समाजाचा उत्कर्ष साधणारी व त्यांचे मानवी हक्क मान्य करणारी मूल्ये शाहू छत्रपतींनी आपले जीवित व तक्त धोक्यात टाकून रुजविण्याचा प्रयत्न केला, म्हणूनच ते महापुरुष होत.

शाहू छत्रपतींनी सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन का केले हे आपण समजून घेतले पाहिजे. जेव्हा वर्णवर्चस्ववादी ब्रह्मवृंदांनी व त्यांच्या पाठीराख्या ब्राह्मण समाजाने वेदोक्त प्रकरणात छत्रपतींना हैराण केले, त्यांचा अपमान केला व महाराजांची मागणी धुडकावली तेव्हाच ते सत्यशोधक समाजाकडे वळले. महाराजांची ती मागणी कोणती? वैदिक धर्माला सामाजिक समतेची बैठक देऊन वेदोक्ताचा अधिकार सर्व हिंदूंना देऊन वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करावे अशी छत्रपतींची मागणी होती. ह्यास्तव त्यांनी वरिष्ठ समाजासा मानवी समानतेविषयी कळकळीने आवाहन केले. वेदोक्ताचे निमित्ताने महाराष्ट्रातील ब्राह्मणांना त्यांनी नवीन समाजरचनेच्या निर्मितीसाठी आवाहन केले. परंतु ते त्यांनी आपल्या वर्णवर्चस्ववादी वृत्तीमुळे धुडकावून लावले. नवीन विचारांची नवीन प्रेरणांची त्या धर्ममार्तंडांनी अशी वाताहत केली.

त्यामुळे साहजिकच शाहू छत्रपती सत्यशोधक समाजाकडे वळले. त्यांनी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची जी ज्योत तेवत होती ती प्रज्वलित केली. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना पैसा दिला, राजवाडयावरील विठ्ठलराव डोणे यांचे मासिक वेतन

चालू ठेवून सत्यशोधक समाजाचे कार्य करावयास सांगितले. संस्थानचे मोठे अधिकारी भास्करराव जाधव, म. ग. डोंगरे, आण्णासाहेब लठ्ठे हे सर्व सत्यशोधक समाजाचे पदाधिकारी म्हणून कार्य करू लागले. जातिभेद व मूर्तिपूजा न मानणारा, 'मानवाचा धर्म सत्यनीती एक' असे मानणारा तो सत्यशोधक समाज. अस्पृश्यांचे निर्मूलन करून अस्पृश्यांना मानवी हक्क द्यावेत असे मानणारा तो समाज. त्यात ते पडले ब्राह्मण पुरोहिताशिवाय विवाह व इतर धार्मिक संस्कार करणारे. महाराज साहजिकच सत्यशोधक समाजाकडे वळले. सत्यशोधकांना त्यांनी स्फूर्ती दिली. पैसा दिला. पाठिंबा दिला. छत्रपतींनी ब्रिटिश सरकारकडे त्यांची बाजू मांडली. सत्यशोधक चळवळ ही ग्रामीण भागापर्यंत सुधारणा व ज्ञान घेऊन जाणारी भारतातील पहिली सामाजिक चळवळ होय. त्यांनी ग्रामीण भागात जागृती केली व यथामती शिक्षण प्रसाराचे कार्य केले.

पण महाराज आर्यसमाजाकडे का वळले! सत्यशोधक समाजाचे कार्य जितके पुढे जावे तितके गेले नव्हते. त्याचे कार्यकर्ते मोठे प्रतिष्ठित बुद्धिवान पुढारी नव्हते. त्यांचे प्रचारकार्य ग्रामीण भागातच चाले. मोठ्या शिक्षणसंस्था ते उभ्या करू शकले नाहीत. आर्यसमाजिस्ट कार्यकर्ते हे मोठ्या शिक्षणसंस्था चालविणारे मोठे पंडित व विद्वान. सत्यशोधकांप्रमाणे अस्पृश्यता निवारण व सामाजिक समता ही तत्त्वे प्रस्थापित केली पाहिजेत असे ते मानीत. त्यामुळे शाहूंना ते आपल्या ध्येयाजवळचे वाटत. दयानंदांना म. फुले यांनी सहानुभूती दाखवली होती. शिवाय शाहूंचा हेतू असा होता की, आर्यसमाजिस्ट सत्यशोधकांना समाजकार्यात साहाय्य करतील व शिक्षणप्रसार झपाट्याने होईल. त्याकाळी आर्यसमाज राजकारणात लक्ष देत नसे. ब्रिटिश सरकारही त्यांच्या शिक्षणसंस्थांना साहाय्य करी.

कुलकर्णी वतने शाहूंनी नष्ट केल्यामुळे, सत्यशोधकाची चळवळ

वाढल्यामुळे व मॉन्टेग्यूच्या जाहीरनाम्यानंतर मद्रासकडील व त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील सत्यशोधक समाजाच्या चळवळीने राजकीय स्वरूप धारण केल्यामुळे राष्ट्रवादी ब्राह्मण पुढारी खवळले. ते ब्राह्मणेतरांशी धार्मिक व सामाजिक बाबतीत ब्राह्मण पुढारी म्हणून झगडले. शाहूंच्या चळवळीचा महाराष्ट्रातील राष्ट्रीय पुढाऱ्यांना अडथळा होऊ लागला. त्यामुळे टिळकांनी चिडून जाऊन रागाच्या भरात वा. द. तोफखाने यांच्याबरोबर शाहू छत्रपतींना 'तुमचा रँड करू' असा निरोप पाठविला. असे व्हायला नको होते. टिळकांनी रागाच्या भरात महाराज्यपाल मिंटो यांच्याविषयी असेच उद्‌गार काढले होते. लजपतराय-सारखा देशभक्त हद्दपार होतो आणि मिंटो जिवंत कसा राहतो! टिळकांनी आपणास धमकी दिली आहे असे शाहूंनी मुंबई सर-कारास कळविले व हुबळीच्या भाषणात त्यांनी तसा उल्लेखही केला. शाहूंनी टिळकांना उलट निरोप पाठविला की, "माझा प्राण गेला तरी मी हे गरिबांचे कार्य सोडणार नाही. ही गरिबांच्या उद्धाराची चळवळ थांबविणार नाही! I shall fight for the poor at the risk of my life and crown!"

शाहू छत्रपती स्वदेशीचे मोठे पुरस्कर्ते होते. स्वदेशी उद्योगधंद्यांचे पाठीराखे होते. 'स्वदेशी पेपरमील, चे ते भागीदार होते. ते स्वदेशी कागद वापरीत. मुलीला स्वदेशी पातळे विकत आणून देत. स्वतःचे कुडते स्वदेशी कापडाचे वापरीत. घोंगडया व इतर बैठकीचे कापड स्वदेशी असे. कोल्हापुरात कापडाची गिरणी निघाली तेव्हा त्यांनी त्या गिरणीकरता तलाव व जमीन देऊन आर्थिक साहाय्यही केले आणि व्यवस्थापकांना असे बजावले की, 'ही गिरणी लक्षाधीशांच्या ताब्यात जाता कामा नये. जे भाग-धारक आहेत त्यांच्या हितासाठी जपा व गिरणी चालविणे हे मुंबईचाच मक्ता आहे हे म्हणणे खोटे पाडा.' छत्रपतींनी कऱ्हाडला निघालेल्या आगपेटीच्या कारखान्यातीलच आगपेटया

वापराव्यात असे जनतेला व संस्थानातील व्यापाऱ्यांना आवाहन केले होते. किर्लोस्कर कारखान्याला तर जुन्या तोफा देऊन व दुसरी सामग्री पुरवून त्या कारखान्याच्या पडत्या काळात चालकांना अमोल सहाय्य केले, धीर दिला व उत्तेजनही दिले.

राज्यकारभारात सुधारणा व्हावी, आपण कायदे करतो त्याचा फायदा गरिबापर्यंत पोचावा, त्याप्रमाणे अधिकाऱ्यांनी त्या बाबतीतले कर्तव्य निष्ठेने करावे म्हणून छत्रपतींनी बरेच कडक नियम केले होते. दौऱ्यावर जाणाऱ्या अधिकाऱ्यांनी धान्य वगैरे वस्तू बरोबर न्याव्या. जे काही सामान गावकऱ्यांपासून घेतले असेल त्याचे पैसे पोलिस पाटील किंवा पोलिस अधिकाऱ्यांसमोर ग्रामस्थांना द्यावेत, कोणतीही वस्तू गावकऱ्यांकडून पोलिसाना आणावयास सांगू नये. अधिकाऱ्यांनी आपल्या किंवा आपल्या नातलगांच्या नावावर गहाण खते वा इस्टेट विकत घेऊ नये, व्यापार करू नये, असा नियम केला होता,

शाहू कित्येक वेळा मित्रांच्या सांगण्यावरून आधिकाऱ्यांची नेमणूक करीत. अशाच एका अधिकाऱ्याच्या घरी त्याच्या स्नेह्याला घेऊन शाहू गेले. त्याचे वैभव पाहून त्याच्या मित्राला शाहूंनी विचारले, ' तुझ्या मित्राच्या मासिक वेतनात हे सर्व वैभव मिळाले काय?' लाचलुचपत करणाऱ्या व भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना ते बडतर्फ करीत. मग त्यांची जातपात ते पाहात नसत. लाच खाणाऱ्या एका अधिकाऱ्याला ते आपल्या दिवाणखान्यात कुत्र्या मांजराप्रमाणे फिरत असलेल्या वाघ सिंहाकडे सोडून हळूच आत गेले. वाघ सिंहाच्या तडाख्यात सापडलेला तो अधिकारी गर्भगळित झाला आणि ओरडला, " महाराज, मी, माझा गुन्हा कबूल करतो पण ह्या जनावरांपासून माझा प्राण वाचवा!"

राज्य कारभारात गोंधळ होऊ नये, काढलेले हुकूम कार्यवाहीत येतात की नाही, गरिबांचे अर्ज किंवा गाऱ्हाणी येतात त्यांचे निर्णय झाले की नाही, ती प्रकरणे कोठे आहेत, निर्णय झाले ते संबंधि-

नांना कळविले की नाही, हे पाहण्यासाठी त्यांनी एक अधिकारी नेमला होता. त्याचा हुद्दा ' इन्स्पेक्टर ऑफ ऑर्डर्स ' असा होता. शासकीय विभागात गरिबांचे कागद बहुधा हरवतात, त्यांचे अर्ज वा फायली भ्रष्टाचारामुळे बेपत्ता होतात. ही सर्व जगात कमी अधिक प्रमाणात सारखीच परिस्थिती असावी. अर्जदारांना दोन वर्षांनंतर सांगण्यात येते की, " अहो, तुमचे कागद गहाळ झाले आहेत! " ज्यांनी ज्यांनी महत्त्वाचे कागद हरवले, त्यांना त्यांना शाहू छत्रपतींनी बडतर्फ केले.

शाहू छत्रपतींनी केलेल्या राजकीय, सामाजिक व धार्मिक सुधा-रणेमुळे चिडलेल्या ब्राह्मण पुरोहितांनी, ब्राह्मण नेत्यांनी नि ब्राह्मण पत्रकारांनी त्यांचे चारित्रहनन करण्याची एकही संधी वाया दव-डली नाही शाहू छत्रपती बदफैली आहेत असे त्यांनी त्यांचे अवास्तव व अतिरंजित चित्र नि चरित्र रंगविले. ज्या टिळक सहकाऱ्यांनी वा त्या पक्षातील कार्यकर्त्यांनी शाहू छत्रपतींचे चारित्र्य-हनन करण्यासाठी त्यांजवर हल्ला चढविला, त्यांपैकी टिळकां-सारखे चारित्र्यवान त्यात किती होते हे टिळकांना माहीत नव्हते असे नाही. ब्राह्मण स्त्रियांकडून खोटे अर्ज लेडी मिंटोकडे ब्राह्म-णांनी शाहूंच्या विरूद्ध पाठविले. पण रेसिडेंटने भारतमंत्र्यापर्यंत कळविले की ' शाहू हे बदफैली नाहीत- ' त्यांच्या तीन-चार उपस्त्रिया होत्या हे खरे. त्यांपैकी काही गायिका होत्या. ही गोष्ट जगजाहीर होती.

राजांनी झनानखाने ठेवण्याचा तो काळ. काही पुढारीसुद्धा त्याकाळी उपस्त्रिया ठेवीत. शाहूंनी अनेक विवाह केले असते. पण अशा काळात शाहूंनी एकच विवाह केला हे लक्षात ठेवले पाहिजे व त्यांचे गृहजीवन सुखी होते- १९०६ साली शाहूंनी टिळक नि त्यांचे सहकारी यांना आव्हान दिले होते की त्यांनी सहा महिने कोल्हापुरात येऊन राहावे आणि स्वत: सर्व तथाकथित प्रकरणांची चौकशी करावी. चौकशी काळात आपण कोल्हापूर सोडून बाहेर दुसरीकडे राहू. पण जर चौकशी अंती

ती प्रकरणे खोटी ठरली तर त्यांनी कोणती शिक्षा भोगावी हे अगोदर ठरले पाहिजे. आपल्यावरील आरोप सिद्ध झाले तर ते सांगतील ती शिक्षा भोगावयास आपण तयार आहोत, असे त्यानी रेसिडेंटला लिहिले. आपण एकाद्या घराचा विध्वंस केला, कुणाची अब्रू घेतली असे सिद्ध झाले तर आपणास चाबकाने चौकात फोडा, असेही ते आपल्या एका मित्रास म्हणाले होते. एकूण हा राईचा पर्वत करण्यात आला होता असेच म्हणावे लागेल.

टिळक, फुले नि आंबेडकर हे चारित्र्याच्या बाबतीत पवित्र पुरूष होते. शाहू त्यांच्या सारखे चारित्र्यवान असते तरी त्यांच्या सामाजिक क्रांतिकार्यामुळे ते निंदेतून सुटले नसते. एवढे मोठे बलाढय टिळक त्यांना बदनाम करण्याचा खटाटोप ताई महाराज प्रकरणात ब्रिटिशांनी केलाच की नाही?

आपल्या राज्यकर्त्यांनी महार – मांगादी हरिजनांना व बुद्धजनांना नोकऱ्यात बढती द्यावी तेही इतरांप्रमाणे बुद्धिवान असतात असे मिशनऱ्यांनी आपले मत लिहून ठेवलेले आहे. सैनिक विभागात बढती गुणांवर अवलंबून असावी. कारण, तेथे राष्ट्राच्या जीवनाशी संबंध असतो. तेथे त्यांना गुणवत्तेवरच बढती द्या. पण इतर खात्यांत अनुभवाने ते कोणतेही काम करू शकतात. खनगराच्या मुलाचे ' मेरिट ' म्हणजे परीक्षेतील गुणांचे प्रमाण पाहू नका. अनेक शतके ज्यांच्यावर विद्येचे संस्कार झालेले नाहीत त्यांना ह्या नवीन जातिभेदाची म्हणजे ' मेरिट ' ची कसोटी लावू नका! तुम्ही स्वतःच्या मुलाच्या शिकवणीसाठी मासिक शंभर रुपये खर्च करू शकता. ती मुले पहिल्या वर्गांत उत्तीर्ण होतात व वैद्यकीय, वित्त व विज्ञान विभागात सहज प्रवेश मिळवू शकतात. तरी आत्मपरीक्षण करा. ही लबाडी थांबली पाहिजे.

आपल्या राज्यात धरणे व कालवे बांधले पाहिजेत, पावसाच्या लहरीवर जनतेस अवलंबून ठेवू नये असा निर्धार करून छत्रप-

तींनी हे प्रचंड कार्य हाती घेतले. त्यासाठी लाखो रुपये अनेक वर्षे खर्च केले. ते आपले जीवित कार्य मानले. दुष्काळापासून जनतेला अभय मिळावे म्हणून हा सर्व खटाटोप केला. त्यांनी मुंबई सरकारकडे त्या योजनेसाठी कर्जही मागितले होते. परंतु ते त्यांना मिळाले नाही. ही धरणे बांधून त्यांनी पुढील हिरव्या क्रांतीचा पाया घालून ठेवला. त्यांनी ज्या कालव्यांच्या योजनेला सहकारी संस्थांची व सहकारी पतपेढयांची जोड दिली. त्यामुळे शेतकरी व कामगार ह्याना सावकऱ्यांच्या व पठाणांच्या कचाटयातून सोडविले, सहकारामुळे शेतकरीही संघटित झाले. त्याना कर्ज मिळू लागले.

छत्रपतींचे दुसरे एक निरीक्षण लक्षात ठेवण्यासारखे आहे. त्यांचे म्हणणे असे की, आपल्या ग्रामपंचायती, नगरपालिका व जिल्हा लोकल बोर्ड ह्या संस्था जातिभेदाच्या भावनेपासून मुक्त नाहीत. त्यामुळे त्यांचे कार्य व्हावे तसे परिणामकारक होत नाही आणि गरिबांना त्या साहाय्यक होत नाहीत. त्यांचे म्हणणे काही खोटे नाही. स्वातंत्र्याच्या काळात काही जिल्हा परिषदांनी social-welfare करता दिलेली रक्कम सरकारकडे परत केल्याची बातमी प्रसिद्ध झालेली आहे त्याचे कारण ही जातीय पक्षपाती बुद्धी व दलित वर्गाकडे पाहाण्याचीं बेपर्वाओची वृत्ती हेच होय. शाहू छत्रपती आधुनिक भारतातले एक महापुरुष होत. जो समाजाला योग्य मार्गदर्शन व कालमानाबरोबर धैर्याने पुढे नेतो तो महापुरुष. शाहू भारतीय समाजक्रांतीचे एक नेते होते. The peace and progress of the nation depends upon the elevation of the Backward and Depressed classes हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. त्यांनी हिंदी राष्ट्रवादाला विस्तृत नि व्यापक तत्त्वाचे अधिष्ठान दिले. ते लोकशाहीचे व सामाजिक न्यायाचे मोठे कैवारी होते. त्यांचे नाव मागास वर्गीय व दलित वर्ग ह्यांची उन्नती सूचित करते. मागासवर्गीयांना व अस्पृश्य वर्गाला त्यांचे मानवी हक्क, मानवी स्वातंत्र्य व मानवी

समानता मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले तत्त्व व प्राण पणास लावले. हरिजन, अस्पृश्य, बुरुड यांच्या पंगतीस जेवणारा राजा दोन हजार वर्षांत निर्माण झालेला नाही. येशू ख्रिस्त व बुद्ध कुणाच्याही हातचे अन्न खात असत. शाहू आपले अन्न गरिबांना देऊन त्यांचे अन्न त्यांच्या पंगतीस बसून जेवत असत. आपल्या राजवाड्यावरही त्यांचेबरोबर अन्न ग्रहण करीत असत. जेव्हा भारताचा सामाजिक क्रांतीचा इतिहास सत्यनिष्ठेने लिहिला जाईल तेव्हा शाहू छत्रपतीचे नाव सुवर्णाक्षरात लिहिले जाईल.

मी जे काही आता टिळकांसंबंधी बोललो त्यामुळे माझ्याविषयी गैरसमज करून घेऊ नका. ते पवित्र नाव आहे. चरित्रकार ह्या नात्याने मला सत्यकथन केलेच पाहिजे म्हणून काही गोष्टी मी सांगितल्या. जो निर्भय नाही तो नेता नाही; तसेच जो निर्भय नाही तो चरित्रकार नाही. चरित्रे खुशामतीसाठी लिहावयाची नसतात. चरित्रलेखन हे पवित्र काम आहे. ते एक पवित्र ध्येय आहे. कलेसाठी कला ह्या ध्येयापेक्षा ते श्रेष्ठ ध्येय आहे. मग कले-करता कला म्हणणारे लेखक काहीही म्हणोत.

धनंजय कीर

या व्याख्यानमालेतील यापूर्वीचे व्याख्याते नि विषय :-

| व्याख्याते | विषय |
|---|---|
| वर्ष : पहिले<br>१९७३ : | |
| श्री. देवदत्त दाभोळकर<br>प्राचार्य,<br>फर्ग्युसन कॉलेज पुणे. | राजकारण आणि समाजजीवन |
| आमदार<br>मा. पं. मंगुडकर<br>पुणे. | भारतीय समाजवाद कांही विचार |
| प्रा. गं. बा. सरदार<br>पुणे. | भारतीय समाजवाद आणि ऐहिक निष्ठा |
| वर्ष : दुसरे<br>१९७४ : | |
| प्रा. ए. एम्. खान<br>श्री शाहू मंदीर महाविद्यालय<br>पुणे. | भारतीय लोकशाही : कांही विचार |
| श्री. वि. अ. नाईक<br>न्यायमूर्ती, पुणे. | लोकशाही समाजवाद |
| श्री. सदाशिव बागाईतकर<br>पुणे. | अविकसित देशातील समाजवादाचे स्वरूप |

MUMBAI 400 021

| व्याख्याते | विषय |
| --- | --- |
| **वर्ष : तिसरे** | |
| **१९७५ :** | |
| **श्री. भा. शं. भणगे**<br>प्राचार्य,<br>चिनाई कॉलेज ऑफ् कॉमर्स अँड<br>अिकॉनॉमिक्स, मुंबई. | **आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग** |
| **श्री. त्र्यं. कृ. टोपे**<br>कुलगुरु,<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई. | **समाज सुधारणेच्या समस्या** |
| **डॉ. प्र. चिं. शेजवलकर**<br>संचालक,<br>इन्स्टिटयूट ऑफ् मॅनेजमेंट<br>डेव्हलपमेंट अँड रिसर्च, पुणे. | **सद्यःस्थिती** |
| **वर्ष : चौथे** | |
| **१९७६ :** | |
| **श्री. गोपाळराव मयेकर**<br>माजी शिक्षण मंत्री, गोवा<br>व प्राचार्य,<br>देवगड कॉलेज, देवगड. | **"भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग"** |
| प्रसिद्ध चरित्रकार<br>**पद्मभूषण धनंजय कीर**<br>मुंबई. | **"राजर्षी शाहू छत्रपती आणि नवभारताची मागणी"** |


– आणि यंदाच्या (१९७८) व्याख्यानमालेत

| | |
| --- | --- |
| **डॉ. भालचंद्र फडके**<br>[illegible] मराठी विभाग<br>पुणे विद्यापीठ, पुणे. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती** |

RAO CHAVAN LIBRARY MUMBAI 400 021

कराड नगरपरिषद –

– नगरभवन व ग्रंथालय




# प्रीतिसंगमावरील सांस्कृतिक केंद्र

हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविले जी झाड ।।
तरि अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ।।